भारत इतिहास संशोधक मंडळ, पुण

त्रैमासिक

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १४

वर्ष ५२ : अंक १-४

संपादकसमिती

विनंति

हें मंडळ आजही मुख्यत: लोकाश्रयावर अवलंबून आहे. म्हणून आम्ही सर्व वाचकांस अत्यंत नम्र व कळकळीची विनंती करतों कीं, त्यांनीं

(१) आपल्याजवळ असलेल्या ताम्रपट, नाणीं, कागदपत्र, पोथ्या, हत्यारें, इ. वस्तू मंडळास देऊन,

(२) या मंडळाचे अधिकांत अधिक वरच्या वर्गाचे सभासद होऊन,

(३) मंडळास हस्तें परहस्तें अधिकांत अधिक मोठी देणगी देऊन,

(४) उच्च कोटीचें लिखाण प्रकाशनासाठीं पाठवून,

(६) मंडळानें स्वत: प्रकाशिलेलीं अथवा इतरांनीं प्रकाशित केलेलीं भारतीय इतिहास व संस्कृति या विषयांचीं पुस्तकें विकत घेऊन,

मंडळाची समाधानकारक प्रगति होण्यास साह्य करावें.

चिटणीस—भा. इ. सं. मंडळ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ व ओतुरकर निधि--पुरस्कृत

भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय माला १०६

वर्ष ५२] त्रैमासिक [अंक १–४

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १४


श्री. ग. ह. खरे यांना अर्पण

शक १८९३ चा जोड अंक

प्रसिद्धिवर्ष : रा. श. ३००, शा. श. १८९५, इ. १९७३.

अनुक्रमणिका

संशोधकाचे मित्र



श्री. गणेश हरी खरे

निवेदन

मंडळाच्या त्रैमासिकाचा हा शक १८९३ चा जोड अंक संशोधकांना उपलब्ध करून देण्यास अपेक्षेपेक्षा अधिक विलंब लागला त्याबद्दल प्रथम दिलगिरी व्यक्त करतों.

हाच ५२ व्या वर्षाचा जोड अंक आहे आणि तो ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १४ म्हणून आम्ही प्रसिद्ध करीत आहों. या खंडांत कांहीं वैशिष्टयपूर्ण आणि विविध स्वरूपाचीं साधनें आम्हीं प्रकाशित करीत आहों. यांत पोर्तुगीज, फार्सी, कानडी, साधनांचीं भाषांतरें, तसेंच कांहीं नवीन प्रकारचीं मराठी साधनें आलीं आहेत.

श्री. स. मा. गर्गे यांनीं कागलहून मिळविलेलीं दोन अस्सल छत्रपतींचीं पत्र येथें आलीं आहेत. उचापतीचा हिशेबदेखील पहिल्यानेंच प्रसिद्ध होत आहे. हीं सारीं संकीर्ण साधनें संशोधकास उपयुक्त ठरतील अशी अपेक्षा आहे.

कांहीं कायदेशीर अडचणींमुळें लांबलेल्या मंडळाच्या निवडणुका ऑगस्ट १९७२ ला पूर्ण झाल्या आणि नवें कारभारीमंडळ सप्टेंबरपासून काम पाहूं लागलें. मंडळा-संबंधीं चॅरिटी कमिशनरपुढें चालू असलेला खटला आतां तडजोडीनें मिटविला आहे. इतर दावे देखील लौकरच संपतील अशी आशा आहे.

या वर्षीं घडलेली एक महत्त्वाची घटना म्हणजे मंडळाशीं गेलीं ४४ वर्षे निगडित असलेल्या श्री. ग. ह. खरे यांची सेवानिवृत्ति. त्यांची उणीव भरून काढणें कठीण आहे. मंडळाच्या आजच्या विस्तारांतील कार्यांत त्यांचा हिस्सा फार मोठा आहे. त्यांज-वरील कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां म्हणून हा अंक आम्ही त्यांना सादर अर्पण करीत आहों. त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा एक छोटा लेख प्रस्तुत अंकांत समाविष्ट केला आहे. या लेखास जोडलेली सूची संशोधकास उपयुक्त ठरावी.

मंडळाची एक प्रमुख शाखा म्हणजे ग्रंथालय. आवश्यक तें द्रव्यसहाय्य नसल्यानें या ग्रंथालयाची वाढ करणें, त्याची उत्तम निगा राखणें आणि संशोधकांना या ग्रंथालयांतील दुर्मीळ ग्रंथांचा अधिक लाभ मिळवून देणें हें आतांपर्यंत शक्य झालें नाहीं. या वर्षीं महाराष्ट्रशासनानें दोन हजार रुपये ग्रंथालयासाठीं अनुदान दिलें आहे. मंडळ त्याबद्दल महाराष्ट्रशासनाचें ऋणी आहे. संशोधकास उपयुक्त असणाऱ्या ग्रंथालयांच्या यादींत आमच्या मंडळाच्या ग्रंथालयाचा समावेश केल्याबद्दल महाराष्ट्र-शासनाच्या ग्रंथालयसमितीचे आम्ही आभारी आहों.

प्रा. रा. वि. ओतुरकर हे आमच्या मंडळाचे आणि विशेषत: त्रैमासिकाचे मोठे आधारस्तंभ आहेत. मंडळाच्या विविध कार्यांसाठीं विशेषत: त्रैमासिक आणि ग्रंथालय यांसाठीं त्यांनीं सोडलेला २५ हजार रुपयांच्या निधीचा संकल्प आतां पुरा झाला आहे. आपल्या वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांनीं ह्या निधीस विनायकराव ओतूरकर निधी

असें नांव दिलें आहे. या निधीचा मंडळास निःसंशय उपयोग होणार आहे. दर्जेदार ग्रंथ प्रकाशणें, तसेंच ग्रंथालयाचें स्वरूप बदलणें यांसाठीं त्यांच्या इच्छेनुसार या निधीचा उपयोग करण्यांत येईल. आम्ही या उदार देणगीबद्दल प्रा. रा वि. ओतुरकर यांचे शतशः ऋणी आहों.

त्रैमासिकाच्या पुढील जोड अंकाची सिद्धता झाली आहे. या अंकाचें स्वरूप संमिश्र असें राहील. यांत काव्य, कागदपत्रें, निबंध यांचा समावेश केला आहे. या अंकाच्या छपाईच्या कामास त्वरेनें सुरवात होईल. हा अंक प्रसिद्ध झाला म्हणजे शक १८९४ पर्यंतचे सर्व अंक प्रसिद्ध झाले असें होईल. शक १८९५ च्या अंकाची कच्ची रूपरेषा तयार केली आहे. तेंही काम लौकरच हातीं घेऊं- या निमित्तानें सर्व संशोधकांना नम्र विनंती कीं, त्यांनीं अस्सल साधनांवर आधारित असें आपलें लिखाण आमच्याकडे पाठवावें. मंडळाचे अंक नियमित व दर्जेदार असे काढण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करूं.

महानगरपालिकेनें दिलेल्या २५ हजार रुपयांच्या अनुदानांतून मराठ्यांच्या इतिहासाच्या दालनाची आतां सिद्धता झाली आहे. या दालनाचें उद्घाटन महानगर-पालिकेचे आजी महापौर श्री. निळुभाऊ लिमये यांच्या हस्तें आणि माजी महापौर श्री. भाऊसाहेब चव्हाण यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या गुढी पाडव्यास पार पडलें.

मंडळाची वार्षिक साधारण सभा वास्तविक पाहतां जुलैमध्यें भरणें आवश्यक होतें. पण तें कांहीं कारणामुळें होऊं शकलें नाहीं. नव्या कारभारी मंडळाला मागील कामें संपविण्यास विलंब लागला. श्री. ग. ह. खरे यांस सेवानिवृत्त केलें आणि नवीन माणसाची अद्याप नियुक्ती झाली नाहीं. तरीही आम्ही वार्षिक साधारण सभा लौकर घेण्यासंबधीं प्रयत्नशील आहों.

मंडळाचे कांहीं निकटवर्ती सभासद आणि संबंधित दिवंगत झाले. त्यांत श्री. म. दा. साठे, डॉ अ. द. पुसाळकर, प्रा. दि. के. बेडेकर, डॉ. अ. का. प्रियोळकर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांच्या निधनानें मंडळाची हानी झाली आहे. त्यांच्या आत्म्यास शांती मिळो अशी आम्ही प्रार्थना करतों.

हा अंक सिद्ध करण्याच्या कामीं बऱ्याच लोकांचें सहकार्य लाभलें. श्री. खरे ह्यांनीं निवृत्तिनंतरही संपादनाचा बराच वाटा आपुलकीच्या भावनेनें उचलला. प्रा. रा. वि ओतुरकर यांनीं या अंकांत आलेल्या लेखांचे थोडक्यांत पण समर्पक असे इंग्रजी सारांश काढून दिले. लोकसंग्रह छापखान्याचे व्यवस्थापक श्री. सोनार यांनीं छपाईच्या कामांत सर्वतोपरी सहाय्य केलें. या सर्वांचे आम्ही आभारी आहों.

श. १८९५ आषाढ शु. ११
दि. ११ जुलै १९७३

अ. रा. कुलकर्णी,
चिटणीस, कार्यकारी संपादक

भारत – इतिहास – संशोधक – मंडळ, पुणें

वर्ष ५२] त्रैमासिक [अंक १–४

१. कांहीं पोर्तुगीज पत्रें – अनुवाद

(वै. ज. वि. कामत)

[आपल्या मंडळांत शकावलीचें काम चालू झाल्यावर प्रथम बाळाजी बाजीराव-कालीन शकावलीवर लक्ष केंद्रित करण्याचें ठरलें. तेव्हां या कालासंबंधीं पोर्तुगीज भाषेंतील साधनें तपासण्याचा थोडासा प्रयत्न केला. या बाबतींत कै. डॉ. पां. स. पिसुर्लेंकर यांनीं पुर्तगेज–इ–मराटाज या आपल्या षड्भागात्मक ग्रंथांत फार उपयुक्त काम केलें आहे. मराठ्यांच्या इतिहासाला उपयोगी पडणाऱ्या शेंकडों पत्रांचीं अवतरणें या ग्रंथांत आलीं आहेत. त्यांपैकीं बाळाजी बाजीरावकालीन पत्रांचे अनुवाद करवून घेण्याचें ठरलें. योगायोगानें गोव्यांतील देशभक्त वै. जनार्दन विष्णु कामत यांची भेट होऊन त्यांनीं त्या पत्रांचे मराठी अनुवाद करुन देण्याचें मान्य केलें. त्याप्रमाणें त्यांनीं वरील पुस्तकाच्या सहाव्या भागांतील क्रमानें ७, १०, ११, १४, १५ हीं पत्रें गाळून आणि ८ व्याच्या टीपांतील दोन घेऊन एकूण सोळा पत्रांचे अनुवाद करून दिले आहेत. पृ. १७ वरील क्र. १४ चें पत्र गोव्यांत भोंसल्यांसंबंधीं तहासाठीं गेलेले पेशव्यांचे वकील महिपतराव यांची माहिती देऊन गोव्याच्या व्हाइसरायानें पेशवे दरबारास लिहिलें आहे. तें मंडळांत असल्यानें त्याचें भाषांतर करण्यांत आलें नाहीं. पृ. १७ ते २२ मध्यें असलेलीं १५ क्रमांकाखालील दोन पत्रें हीं गोव्याच्या व्हाइसरायानें राणी ताराबाई व तुळाजी आंग्रे यांमधील तहांत सामील व्हावयाचे होते म्हणून फ्रेंच सेनापति मॉसिनोर बुसी, यास लिहिले व दुसरें औरंगाबादचे सुभेदार सलाबतजंग यास बुसी यानें लिहिलेलें आहे. तीं फ्रेंच भाषेंत असल्यानें भाषांतर करूं शकले नाहींत.

या भागांत बाळाजी बाजीरावकालीन आणखी १५ पत्रें आहेत; पण या पत्रांचे अनुवाद करण्याचें काम त्यांच्या हातून झालें नाहीं. तथापि झालेलें काम उपयुक्त असल्यानें तें येथें प्रकाशित करीत आहों. हें करतांना अगदीं उघड चूक असल्याची खात्री पटली तेथेंच सुधारणा केली आहे. तसेंच मिस्टर या अर्थीं असलेला पोर्तुगीज शब्द काढून टाकून त्याऐवजीं मराठींत नेहमीं वापरलेला मुसा शब्द घातला आहे. पोर्तुगीज शब्दांचे व विशेषनामांचे उच्चार एक तर मराठींत

आले तसे दिले आहेत किंवा कै. पिसुर्लेकरांचें अनुकरण शक्य तेथें केलें आहे. युरोपीय भाषिक पत्रांचा एक विशेष म्हणजे त्यांपैकीं बहुतेकांना तारखा असतात. त्याप्रमाणें या १६ पत्रांपैकीं केवळ एकालाच तारीख नाहीं. म्हणून तेथें प्रश्नचिन्ह घातलें आहे. या पत्रांत आलेल्या किंवा यांस दिलेल्या सर्व तारखा नव्या पद्धतीच्या (येथें जुनी पद्धत + ११ दिवस = नवी पद्धत) आहेत. त्या इतर पत्रांच्या तारखांशीं जुळाव्या म्हणून जुन्या पद्धतीच्या करून पत्राच्या प्रारंभीं अनुक्रमें डाव्या उजव्या बाजूस पत्राच्या आरंभीं मांडल्या आहेत. त्या पाहिल्या असतां जुनी पद्धत अकरा दिवसांनीं नवीच्या पाठीमागें आहे हें लक्षांत येईल. **ग. ह. खरे** *]

* * *

पु. १, प. १ इ. १७४० मे २	१	श. १६६२ वैशाख शुद्ध ६ इ. १७४० एप्रिल २१

गोव्याचा नवा व्हाइसरॉय मार्किस द लोवरिसाल यास तो पोर्तुगालहून निघतांना पोर्तुगालच्या बादशाहानें दिलेल्या सूचना

....उपरोक्त माहितीप्रमाणें तुम्हांला कळलें असेल कीं, गोवा शहर, त्यांतील कोट व भोंवतालचीं बेटें शत्रूच्या ताब्यांत गेलीं आहेत, कीं भरपूर आधाराविना तेच ही बातमी पसरवितात ? कारण तिचा खरेपणा वाटत नाहीं आणि ती कोठून उठली हेंही समजलें नाहीं, तरी त्या प्रदेशांत शत्रूची संख्या किती आहे याची माहिती मिळवावी आणि तदनुसार आपणांबरोबर असलेल्या लश्करी अधिकाऱ्यांच्या विचारानें ताबडतोब सैन्य उतरवून तेथील कोटांवर आणि बेटांवर हल्ला करतां आला तर पहावें. तें शक्य झाल्यास मग इतर मुलूख हस्तगत करतां येईल. अथवा उत्तर प्रदेश (वसईकडील) लढविण्यासाठीं आणि कल्याणवर किंवा इतर ठाण्यांवर छापा घालून तेथून ते महाल परत मिळविणें अधिक सोपें होईल, असेंही करावें. गोवा शहर व त्याभोंवतालचा मुलूख शत्रूच्या तडाख्यांत सांपडला नसून शत्रू फक्त सासष्टींत (साष्टींत) तळ ठोकून बसला आहे. शेवटच्या पत्रांतील मजकुराप्रमाणें गतसालच्या एप्रिलांत तेथें तो घुसला होता आणि त्यापासून बार्देश महालासही धोका निर्माण झाला आहे, असें आढळून आल्यास त्याला तेथून हुसकून लावण्याचा प्रयत्न कर. कारण, तूं सोबत लश्कर घेऊन येत असल्याची बातमी त्यांना मिळाली तर ते आपलें सैन्य व तळ वाढवितील.

शत्रू आमचे उत्तरेकडील किल्ले, त्यांलगतचा मुलूख व साष्टीबेट अद्याप सांभाळून आहेत असें आढळून आलें तर त्यांचें सैन्य किती व कोणत्या तऱ्हेचें आहे याची काँट द सांदोमीलकडून माहिती घे आणि त्याच्या विचारानें शत्रूंना हुसकून लावण्याची योग्य ती योजना आंखून बार्बरानी (Barbarsos) बळकावलेले आमचे प्रदेश परत हस्तगत होईपर्यंत लढाई चालू ठेव.

तू हिंदुस्थानांत पोंचण्यापूर्वींच तहही झाला असणें संभवनीय आहे. तसें झालें असेल तर तो कोणकोणत्या मुद्यांस धरून झाला आहे याची चौकशी कर आणि त्यांतील कलमें नीट तपासून पहा. आमच्या इभ्रतीस व हितसंबंधांस बाधक होतील अशीं कलमें असहायतेमुळें मान्य करावीं लागलीं असें आढळून आलें, विशेषतः आमच्या प्रदेशापैकीं कोणताही भाग परत मिळत नसेल तर काँट द सांदोमील (तत्कालीन-व्हाइसराय) यांशीं संगनमत करून त्याचप्रमाणें अधिकारी व्यक्तींचा अभिप्राय घेऊन, वाटलें तर तह मोडून लढाई पुन्हा सुरू कर. आमच्या मुलखांतून शत्रू हुसकला जाईपर्यंत ती लढाई चालली पाहिजे; विशेषतः उत्तरेकडील प्रदेश व सासष्टी (साष्टी) महाल हे तर मिळालेच पाहिजेत. त्यांचें महत्त्व किती आहे हें तू जाणतोस. सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन व शांतपणे विचार करून योग्य तें ठरवावें.

पृ. १ (टीप), प. २ इ. १७४१ सप्टेंबर २०	२	श. १६६३ भाद्रपद शुद्ध १० इ. १७४१ सप्टेंबर ९

गोवा व्हाइसरॉय > पोर्तुगालचा बादशाह

मागें कळविल्याप्रमाणें ७ सप्टेंबर १७४० दिनीं पुणें येथें सह्या घालून पक्का केलेला हा तह रवाना होत आहे. मराठ्यांनीं कुंकळ्ळी व असोळणें हीं गांवें, दमणच्या सत्ताक्षेत्रांत असलेलीं गांवें व ठाणीं यांसह सातही परगणे राय येथील तहानुसार सोडून द्यावीं म्हणून प्रयत्न केला होता, पण त्यांनीं फक्त २० गांवें व कांहीं बागा असलेला नायर परगणाच सोडून दिला. या ठिकाणीं परत वस्तीस आलेली प्रजा कमी असल्यानें हा परगणा १० हजार असर्फ्यांस (५. रु.) खंडानें दिला आहे. दमण भागाचें जकातीचें व इतर उत्पन्न ६० ह. कसर्फ्यांहून अधिक होत नसल्यानें वार्षिक खर्चास ६० ह. असर्फ्यांची तूट येते. किल्ल्याच्या दुरुस्तीचा व डागडुजीचा खर्च अलाहिदा आहे.

पृ. ३, प. ३
इ. १७४३ जानेवारी २८ } ३ { श. १६६४ माघ शुद्ध ३
इ. १७४३ जानेवारी १७

गोव्याच्या व्हाइसरॉयचा नायब > पोर्तुगालचा बादशाह

(दमणचा) हंगामी गव्हर्नर दॉं लुइस काइतान द आल्मैद यानें उत्तर भागांतील मराठ्यांच्या कांहीं ठाणेदारांशीं संधान बांधलें होतें. त्याचा परिणाम कसा झाला याचा अंदाज काढण्याकरितां, दमण किल्ल्याची पाहणी करण्याच्या निमित्तानें गोवा शहराचे कप्तान दों आंतोनियु द कास्त्रु–आल्मैदाचे सासरे–यांस खर्च व भत्ता यांपैकीं कांहींच न देण्याच्या अटीवर त्या प्रदेशांत पाठविलें होतें. त्यानें परत येतांच अहवाल दिला तो असा :

त्या ठाणेदारांच्या कारभाराखालीं असलेले प्रदेश ते आम्हांस परत करावयास तयार आहेत. त्यासाठीं ठाण्याचा ठाणेदार एक लाख रु. बक्षिसी मागतो. वसईचाही तितकीच रक्कम मागतो. परंतु त्या ठाणेदारांपैकीं कोणीही हें गौप्य उघड करील असें वाटल्यावरून आणि आम्ही तह मोडूं पाहतों, असें मराठयांना वाटूं नये म्हणून त्यांस सांगितलें आहे कीं, यासंबंधीं विशेष विचार करावयाचा नसता तर मागणी मान्य केली असती. तूर्त झालेला तह मराठ्यांकडूनच मोडला जातो कीं काय याची वाट पाहतों. दरम्यान शांततेच्या वाटाघाटींनीं आमचे प्रदेश परत मिळतात कीं काय तें पाहतों. एकट्यावरच ती कामगिरी सोंपविली आहे. वाटाघाटी सुरू झाल्या तर त्यांची पहिली अट अशी असेल कीं, त्या प्रदेशांत धर्मस्वातंत्र्य असावें व इन्क्विझिशनची बाधा होऊं नये. हें मान्य केल्याविना तह घडून येणार नाहीं. ते प्रदेश परत मिळतील असें ठरल्यास मराठ्यांना आधीं बरीच मोठी रक्कम द्यावी लागेल. शिवाय सर्व सरकारी उत्पन्नाचा चौथा हिस्सा दरसालचा खंड म्हणून द्यावा लागेल. आपल्या वरिष्ठांचा विश्वासघात करून ठाणेदारांनीं हवाली केलेले प्रदेश स्वीकारल्यास पुढें नानातऱ्हेच्या भानगडी उपस्थित होतील. त्यांमुळें वाटाघाटींत अडथळा निर्माण होईल आणि या (गोवा) राजधानीवर मराठे सर्व सामर्थ्यानिशीं कोसळतील असें वाटतें. इ. १७३९ त याचा अनुभव आलाच आहे. मराठे तेव्हां राजधानीच्या परिसरांत पोंचले म्हणून वसई मिळविणें त्यांना सोपें गेलें. आमच्या राजधानीस शह दिला कीं, आमचा कोणताही प्रदेश सोपेपणीं मिळवितां येतो हें त्यांस अनुभवानें कळून चुकलें आहे. म्हणून आम्ही ठाणेदारांचें म्हणणें मान्य केलें नाहीं.

आमचे प्रदेश परत मिळविण्यासंबंधीं वाटाघाटी पूर्ण झाल्या तर त्या कमी दुष्परिणामकारक असतील. कसेंही असलें तरी बादशाहांच्या अनुज्ञेविना आम्ही कांहीं करूं शकत नाहीं. यास्तव ही माहिती दिली आहे. योग्य ती आज्ञा व्हावी.

पृ. ४, प. ४
इ. १७४३ नोव्हेंबर ८ } ४ { श. १६६५ कार्तिक वद्य ७
इ. १७४३ ऑक्टोबर २८

आलेशांद्री गुझमाव
तोमे जुआकीं दा कोस्त कोर्ति रैयाल > **गोव्याचा गव्हर्नर**

हिंदुस्थानच्या राज्याच्या गव्हर्नरांना बादशाही आज्ञेवरून कळविण्यांत येत आहे कीं, तुमच्या गेल्या १७ जानेवारीच्या पत्रावरून आमचे गेलेले उत्तरेकडील प्रदेश आमच्या हवालीं बक्षीस घेऊन करण्याचा मराठ्यांच्या ठाणेदारांचा हेतु कळून आला. त्यावर कायदे सल्लागारांचा अभिप्राय घेऊन विचारार्थ तो सागरोत्तर प्रदेश मंडळाकडे पाठविला. निर्णय असा मिळाला कीं, आमच्या तेथील राज्यास धोका येईल असें नवीन कांहीं करूं नये.

पृ. ४, प. ५
इ. १७४४ मार्च २५ } ५ { श. १६६६ चैत्र शुद्ध १२
इ. १७४४ मार्च १४

पोर्तुगालचा बादशाह > **गोव्याचा नवा व्हाइसरॉय**
दों पेद्रू मिगेल द आलमैद

आमचे उत्तरेकडील प्रदेश परत मिळाविण्याच्या बाबतींत, हिंदुस्थानच्या राज्याची माहिती असलेल्या येथील सर्व मंडळींचा अभिप्राय असा आहे कीं, बळाचा वापर करून सध्या तो हेतु साध्य होण्यासारखा नाहीं. कारण, मराठ्यांशीं लढून ते प्रदेश घ्यावयाचा म्हटलें तर आमच्यापेक्षां त्यांची सेना अधिक आहे. आमच्या सत्तेखालीं ते प्रदेश आल्याखेरीज आमचें तेथील राज्य स्थिर होऊं शकणार नाहीं हेंही तितकेंच खरें आहे. तेथील प्रजाही निर्भय होणार नाहीं. कसेंही असलें तरी मार्किस द लोवरिसालनें ठरविलेल्या योजनेनुसार दमण व दीव येथील किल्ले सुस्थित व सज्ज ठेवावे. आम्हांस आशा आहे कीं, काळाच्या आघातांनी आम्हांस एखादी सुसंधि मिळेल. मग ती मराठ्यांच्या प्रमुखांच्या मरणाचीही असेल. असें घडल्यास त्यांची सध्याची राज्यव्यवस्था कोलमडून पडेल. बंडहि उद्भवेल किंवा आजच त्यांच्या सेनाधिकाऱ्यांमध्यें शिजत असलेली लढाईही होईल. त्यावेळीं आमची सेना कमी पडणार नाहीं. एखादे वेळीं तेच मराठे काळवेळ ओळखून तहासाठीं आमच्याशीं हात पुढें करितील आणि मग आम्ही त्या तहानुसार आमचे गेलेले सर्व किंवा कांहीं प्रदेश त्यांच्या परगण्यांसह परत मिळवूं.

पृ. ५, प. ६
इ. १७४५ जानेवारी २२ } ६ { श. १६६६ पौष वद्य ५
इ. १७४५ जानेवारी ११

क. काइतान द सौझा पेरैर > गोव्याचा व्हाइसरॉय

कोणत्या मार्गांनीं उत्तरेकडील प्रदेश परत मिळवितां येईल, यासंबंधीं आम्हा सर्वांची इच्छा काय आहे, म्हणणें काय आहे तें या पत्रानें निवेदन करितों. कांहीं म्हणतात कीं, आधीं वसई घ्यावी. कांहीं ठाणें घ्यावें सांगतात. ज्यांना पूर्ण माहिती आहे ते कोंडी करून किंवा बक्षिसांच्या लालचीनें दोन्ही घ्यावीं म्हणतात. कोणताही मार्ग स्वीकारला तरी दोन हजार पोर्तुगीज लश्कर तयार असलें पाहिजे. कांहीं जण ज्यास्ती असावें म्हणतात तर कांहीं कमी चालेल असें प्रतिपादितात. त्यांचा अंदाज असा कीं, लांबत चाललेल्या वाटाघाटी पूर्ण होऊन अमलांत यावयाच्याच राहिल्या असतील. त्यांत विश्वासू व फितूर मिळून भाग घेत असल्यानें ते सर्व एकाच प्रवृत्तीचे आहेत असें वाटतें. कांहीं जण ठाण्याचे अमलदार फितूर केल्याचें, कांहीं वसईच्या किल्लेदारांना, कांही साबाय येथील, तर कांहीं करंजें येथील ठाणेदारांना वश करून घेतल्याचें सांगतात. त्या सर्वांना कमी नाहींत अशा ठराविक रकमा देऊन वर मानमरातबासह वास्तव्यासाठीं आमच्या सत्तेखालील गांव जागीर म्हणून दिले पाहिजेत. शेवटीं ही भानगड विविध पद्धतींची व कधींच न संपण्यासारखी असल्यानें माझें मत बनलें आहे कीं, हे आमचे मार्ग व हेतु समजून घेऊन सावधगिरी राखण्याकरितांच मराठ्यांनींच हे डाव मांडले आहेत व ते सदोदित अवलंबितात, त्यांची मला जाणीव व अनुभवही आहे. अधिकारवाणीनें मी सांगू शकेन कीं, मराठ्यांनीं आमचे उत्तरेकडील प्रदेश घेतले ते सैनिकी बळापेक्षां भेदनीतीनेंच विशेषतः घेतले आहेत. याहून विरुद्ध अभिप्राय असलेल्यांना माझें विचारणें आहे कीं, हे मराठे कोणत्या प्रेमानें आणि स्वार्थानें ते प्रदेश आमच्या हवालीं करूं इच्छितात? ते सर्व शाहू राजा आणि बाजीरावाचा पुत्र नाना यांच्या जातीचे व नात्यागोत्यांपैकीं आहेत. त्यांना आपल्या समाजांत मानमरातबानें राहण्यास पैसा कमी नाहीं, स्वतंत्र दर्जा आहे, परक्याच्या धनदौलतीवर डल्ला मारण्याचे अधिकार आहेत, जो सैतानी धर्म ते आचरितात त्यांविषयीं त्यांना स्वातंत्र्य आहे. आमच्या सत्तेखालीं आपण गेलों तर आपली काय दशा होईल हें त्यांना ठाऊक आहे. ते इतके मूर्ख नाहींत कीं, आपल्या राष्ट्राविरुद्ध दुसऱ्यांना फितूर झालों तर वागणूक कशी मिळेल याची त्यांना जाणीव नसेल! फितुरांना मिळणाऱ्या शासनापासून आपलें रक्षण करण्यास कोणी समर्थ मिळणार नाहीं असेंच त्यांना वाटत असेल.

हा उत्तरी प्रदेश परत मिळविण्यास लढाई हा एकच मार्ग आहे असा या कॅप्टननें आपला अभिप्राय दिला व त्यासाठीं आरमारी काफिला, एक सैन्याची

पलटण, एक कोसारियु गलबत, चार पालस (लहान गलबतें) 'सहा मांचुअस व गालिअस' (विशिष्ट गलबतें) बाँबफेंक्यांची एक तुकडी असा एक आरमारी काफिला, लहानशी लष्करी तुकडी असलेला आणि रसद व रुग्णालयाकरितां दुसरा एक काफिला शिवाय सहाशें पोर्तुगीज आणि दमण व दीव येथील ख्रिस्त्यांपासून जन्मलेले एक हजार गांवठी शिपाई असलेले शस्त्रास्त्रयुक्त असे तीस गोलव्हेतस (गलबतें) असावी असें सुचविलें.

पृ. ८, प. ८ च्या पोटांत इ. १७४६ एप्रिल ३	७	श. १६६८ चैत्र शुद्ध १२ इ. १७४६ मार्च २३

गोवा व्हाइसरॉय > बाळाजी बाजीराव

दमणहून मला कळविण्यांत आलें आहे कीं, शंकराजीपंतानें त्या शहरालगतच्या खाडींत प्रवेश करून आंत कोणतीही वस्तु आयात करण्यास अडथळा निर्माण केला आहे, जमिनीवरूनही तसेंच करण्याचा त्याचा बेत आहे व हें सर्व तुमच्या आज्ञेनें होत आहे असें तो म्हणतो. तुमच्या थोर लौकिकास हें कृत्य शोभेल काय ? चिमणाजी आपांनीं वसईच्या कराराच्या प्रसंगीं घालून घेतलेल्या अटी प्रामाणिकपणानें पाळल्या. त्याबद्दल त्यांचे गोडवे पोर्तुगालांत गायले जातात. आपण त्यांचे वारस आहां. कमीपणा येईल असें कांहीं करूं नये. तुमची योग्यता व न्यायबुद्धि थोर आहे. आमच्या बाजूनें तहाच्या अटी पाळण्यास कधींच चुकारपणा झाला नाहीं. याहून विशेष माहिती हवी असल्यास ती दों आंतोनियुज्झे येन्हिक्य हे सांगतील.

पृ. ७, प. ८ इ. १७४७ फेब्रुवारी २	८	श. १६६८ माघ वद्य ७ इ. १७४७ जानेवारी २२

गोवा व्हाइसरॉय मार्किस द आलोर्न > लिस्बनचा राज्य सेक्रेटरी आंतोनियु गेदिस पेरैर

याच पत्रीं कळविण्यांत येत आहे कीं, उपर्युक्त लश्कर रवाना करण्यांत मी गुंतलों असतां मराठे तीस हजार घोडदळानिशीं घाटमाथ्याच्या रोखानें येण्यास निघाले आहेत अशी सूचना मिळाली. खालीं उतरून सासष्टी महालावर हल्ला करण्याचा त्यांचा हेतु असल्याचें साधार म्हणतां येतें. वाटेंत अडथळे निर्माण करण्याची जरुरी भासून घाटाचे मार्ग रोखून धरले, झाडें तोडून आडवीं घालण्यास आणि खंदक खणण्यास लावलें. कदाचित्, हुलकावणी दाखवून तिकडे दमणच्या

किल्ल्यावर हल्ला करितील म्हणून तेथेंही सूचनापत्रें पाठाविलीं. कारण बऱ्याच काळापासून मराठ्यांची नजर त्या किल्ल्यावर आहे. ही स्वारी चालू राहिली तर मला आवश्यक त्या पूर्वतयारीसाठीं रायतुर किल्ल्यांत जावें लागेल. आतांच माहिती मिळाली आहे कीं, आंग्रे ७ पालें व ६० गलबतें असें आरमार घेऊन दक्षिणेस गेला आहे. त्या बाजूस पोर्तुगालच्या व माकावमधील गलबतावर हल्ला चढवील अशी भीति वाटत आहे. त्यांच्या संरक्षणास एकेक लश्करी गलबत असणें आवश्यक आहे. येथील काम सावकाश व कंटाळावाण्या स्थितींत चाललें आहे. त्यांना दंड केला तरी तें झटपट होणें कठीण वाटतें.

बादशाहांनीं लढायांसाठीं केलेल्या खर्चाची भरपाई व्हावी म्हणून उत्तरेकडील प्रदेश परत मिळविण्यास संबंधितांकडे नव्या वाटाघाटी करणें अपरिहार्य आहे असें वाटतें. कारण, मराठे या भागांत आहेत तोंवर आम्हांस उत्पन्न मिळणार नाहीं असें बादशाहांनीं म्हटलें तें आम्हां सर्वांस यथार्थ वाटतें म्हणूनच नव्हे, तर यापूर्वींही कांहीं वर्षें उत्पन्न मिळालें नव्हतें, तरी ते प्रदेश परत मिळवावेच असें जें बादशाहांनीं मागें निक्षून सांगितलें होतें त्याप्रमाणें सर्वांचें मत आहे. म्हणून गलबतें, लश्कर व दारूगोळा पाठविण्यासाठीं बादशाहांस जो खर्च येईल त्याची भरपाई करण्यास आणि इतर रीतीनें सहाय्य करण्यास येथील आपली प्रजा सिद्ध आहे. ते प्रदेश परत मिळतांच, शत्रूस नामोहरम करण्याकरितां झालेला खर्च परत घेतांना त्या ठिकाणच्या रहिवाशांनीं अपरिमित नुकसान सोसलें आहे या सबबीवर बादशाह जर घेणार नसेल तर ते आपलें निम्में किंवा तिसरा हिस्सा इतकें उत्पन्न देण्यास राजी आहेत. आपल्या दौलतीचा उपभोग पूर्वींप्रमाणें घ्यावयास मिळाला तर आपली बिघडलेली सांपत्तिक स्थिति लवकरच सुधारेल अशी त्यांना आशा वाटते. मात्र एक खरें कीं, एव्हांच त्यांशीं हीं बोलणीं करतां येणार नाहींत. कारण बहुतकरून ते तेथीलच रहिवासी आहेत. त्यांचा संशय येऊन नाना (साहेबां) नीं आमच्या वाटेस जाऊं नये म्हणून सर्व गोष्टी धिमेधिमे हाताळल्या पाहिजेत. कांहीं गलबतें आणि दीड हजार गोरें सैन्य आहे तें भरपूर असें वाटलें तर याच वर्षी देवावर भरवंसा ठेवून (आणि त्यावरच हें अवलंबून आहे) ते प्रदेश सोपेपणीं परत मिळवीन. कारण आलोनेचा (पेडणें महालांतील) किल्ला हस्तगत केल्यापासून आमच्या सैनिकांचा दरारा वाढला आहे व शत्रु भयभीत झाला आहे. भावी यश या गोष्टीवर अवलंबून आहे. आशा बाळगण्यास कठीण वाटत नाहीं कीं, वसई व ठाणें या ठाण्यांसमोर आमचें सैन्य दिसलें म्हणजे रेड्डी किल्ल्यांत असलेलें आणि भोंसल्यांचें आरमार मीं पकडलें याची माहिती असणारे तेथील कारभारी गर्भगाळेत होऊन जातील. या संबंधाच्या वाटाघाटींत प्रदेश परत मिळविण्याविषयीं अडचणी आहेत.

त्याचप्रमाणें पुढें ते रक्षण करण्याच्या बाबतींतही आहेत. त्या इतरांना माझ्यापेक्षां ज्यास्तच वाटतील. देवाला स्मरून अंतःकरणपूर्वक मला वाटतें कीं, आमच्या किल्ल्यांच्या संरक्षणाची जरा काळजी घेतली कीं, हे आशियाचे शत्रु आमचें कोणतेंच नुकसान करूं शकणार नाहींत. त्यांचे अचानकपणें यशस्वी हल्ले करणें, मध्येंच गोंधळ उडवून देणें अथवा निर्लश्करी भागावर हल्ला चढविणें इत्यादि गनिमी प्रकार भयंकर आहेत. हे वगळले तर छातीस छाती भिडवून लढणारे ते नाहींत. छोटासा मारा आणि घोड्यांची नुकसानी ते टाळतात. यास वसईचें उदाहरण देतां येईल व तें माझ्या म्हणण्यास पुष्टि देणारें आहे. हा किल्ला घेण्यासाठीं शत्रूला सहासात वर्षें तयारी करावी लागली. खर्चही बेसुमार करण्यांत आला. माझ्या माहितीप्रमाणें जवळ जवळ तीन वर्षें त्या ठिकाणीं वेढा बसवावा लागला. धान्यसंग्रह व दारूगोळा आंत कमी नव्हता. जर तो किल्ला इतक्या लवकर खालीं केला नसता तर शत्रु श्रम व मरणभय यांस कंटाळून थोडक्याच दिवसांत वेढा उठवून निघून गेला असता. तात्पर्य, या शत्रूशीं विशेषेंकरून त्यांच्या अफाट सैन्याशीं टक्कर देण्यास चिवट, दक्ष व मौल्यवान असें लश्कर पाहिजे. एखाद्या जनसमूहास किंवा सैन्यास शासन करावें असें देवाच्या मनांत आलें तर तो आधीं त्याच्या विचारांत गोंधळ निर्माण करील व भीति संचरवील. मग यांच्यापुढें मान वांकविणें भागच पडतें.

ठिकठिकाणांहून मला माहिती पुरविण्यांत आली आहे कीं, मराठे घाट उतरून येऊन एकदम दोन बाजूंनीं हल्ला करूं पाहात आहेत. त्यांना वरचढ होणार अशी व्यवस्था सासष्टी व बार्देश यांच्या हद्दीवर व नद्यांवर ठेविली आहे. नवीन जिंकलेल्या किल्ल्यावरही त्याचप्रमाणें ठेवणार आहे.

रेडी किल्ला घेतल्यावर आम्ही उत्तकेरडील प्रदेश घेणार असा नानांनीं निश्चित समज करून घेतला आणि खरोखर त्या बाजूस पुष्कळ सैन्य रवाना केलें. माझ्या मनांत हेतु नसतांना त्यानें पाठविलेलें हें सैन्य मला चकविण्यासाठीं, कीं दमणवर हल्ला करण्यासाठीं, कीं भोंसल्यांना मदत देण्यासाठीं हें सांगवत नाहीं. हा योग कांहीं वाईट असणार नाहीं. माझ्याजवळ जें कांहीं थोडें शिकाऊ सैन्य आहे तें एक गलबत व एक पाल देऊन तिकडे पाठवीत आहे. लिस्बनहून येणाऱ्या गलबतांची पाठराखणी दोन गलबतें करतील व दक्षिणेकडील आरमार कालिकतचें लाकूड नेण्यासाठीं मदत करील. नवीन घेतलेलेल्या किल्ल्यांच्या संरक्षणार्थ बरेंच लश्कर अडकून पडलें असल्यानें दोनही बाजूंनीं शत्रूचा प्रतिकार करण्यास माझ्याजवळ राहिलेलें सैन्य अपुरें आहे. फिरून फिरून कबुली घेतली तरी देसायांची निष्ठा संशियत आहे. भोंसल्यांशीं त्यांचे गुप्त संकेत असल्याचा बोभाटा आहे. त्याचा पडताळा घेतां आला नाहीं. शत्रूनें हल्ला करून आम्हांस

मोठें नुकसान पोंचविलें नाहीं तरी त्यामुळें आमचें उत्पन्न घटणार अशी भीति वाटते. कारण, सासष्टी महाल हा समृद्ध पण पसरट आहे. साधारण खर्च देखील भागणार नाहीं. इकडची ही लंगडी बाजू बादशाहांनीं लक्षांत घेतली पाहिजे. पावसाळा सुरू होईपर्यंतचे चार महिने मोठे कठीण जाणार आहेत. या व मागच्या पत्रांतून तऱ्हेवार माहिती पुरविल्याबद्दल बादशाहांनीं विषाद मानूं नये. आशियांतील (प्रदेशांची) चिंताजनक परिस्थिति ती हीच.

येथील राजकारण ठिसूळ असल्यानें तें घटकोघटकीं बदलत असतें. येथें शब्दांवर विश्वास ठेवतां येत नाहीं. त्याचप्रमाणें करारांवर व प्रमाणपूर्वक केलेल्या तहनाम्यांवर देखील विश्वासतां येत नाहीं. पुढल्या हितसंबंधापेक्षां येथें भावनाच प्रभावी असतात. याशिवाय, ठराविक बाजूनें कावळा उडाला जाऊं नये त्या बाजूनें गाय गेली, देवालय नरकांतील दणगट पुजाऱ्यानें असाच कौल दिला, या सर्व गैरसमजांचा परिणाम राजकारणावर होत असतो. दैवी कृपेनें आणि मानवी प्रयत्नांनीं सुटावयाचे शारीरिक व आर्थिक हितसंबंध अंधश्रद्धेवर अधिष्ठित असलेल्या त्या प्रकारांवर अवलंबून ठेवतात. नाना साताऱ्यांत अटकेंत असल्यास एक वर्ष होत आलें. शाहूस पुणें दरबारविषयीं शंका आली म्हणून तिची निवृत्ती करून घेण्यासाठीं त्यास तेथें ठेवून घेतला आहे. जवळच्या एका हट्टी माणसास बहाल करण्यासाठीं कांहीं जमिनी पाहिजे होत्या. त्या दिल्या नाहींत म्हणून शाहूच्या थोरल्या व धाकट्या दोन्ही राण्यांचा नानावर दांत आहे. साताऱ्च्या मंत्र्यांना पैसे चारून आपल्या बाजूस वळविण्याचें कार्य नानानें चालविलें आहे. राण्यांच्या दासींसही पैसे देऊन खूष ठेविलें आहे. राण्यांनाही बऱ्याच मोठ्या देणग्या दिल्या आहेत. त्याचप्रमाणें खुद्द शाहूलाही मोठमोठ्या भेटी पाठवून वळविलें आहे. आपणांस हवें तें घडवून आणण्याइतका त्यानें आपला जम बसविला आहे. मुख्य प्रधान या नात्यानें वरिष्ठ आज्ञा धुडकावून लावण्याइतकें वजन त्यानें कमाविलें असून पैसे चारून कोणत्याही अन्यायावर पांघरूण घालतां येतें याची त्यास खात्री झाली आहे. जो कैदी म्हणून होता तो अकस्मात् विजयी मुत्सद्दी म्हणून न्याय व राजकारण यांविरुद्ध मिरवीत आहे.

शाहू राजा निपुत्रिक असून म्हातारा आहे. त्याचा चुलत भाऊ संभाजी राजा थोड्या दिवसांचा सोबती असून निपुत्रिकही आहे. शाहूचा मंत्री व नानाचा शत्रु श्रीपतराव वारला. शाहूचा दुसरा एक मंत्री नारो राम हा ८० वर्षें वयाचा असून फार खंगला आहे. आतां आमचा प्रतिस्पर्धी असलेला आणि अधिकारानें व संपत्तीनें समर्थ असलेला नानाच राहिला. थोड्याच कालांत तो शाहू व संभाजी यांच्या संपत्तीचा मालक बनेल. त्याच्या स्वतःच्या अधिकारांत ही नवी भर पडली तर एक मोठी सत्ता निर्माण होईल. उत्तरेकडील आपले प्रदेश गेले व फिरंगी

आपणावर भौमिक हल्ला करितील या संशयानें नाना मदत देत नाहीं असें वाटून भोंसल्यांनीं नानास कळविलें आहे कीं, फिरंग्यांशीं आपण तह करणार नाहीं. याचें कारण त्या तहाच्या पहिल्या भागांत उत्तरेकडील प्रदेशांवर स्वारी करण्यास निघणाऱ्या आमच्या आरमाराबरोबर सात हजार सैन्यासह निघालें पाहिजे अशी अट आहे, ही अट आपणा (पेशव्यां) विरुद्ध होणार असल्यानें (स्वतःचे) प्रदेश गमावले गेले तरी मी ती मान्य केली नाहीं. नाना हा ब्राह्मण असल्यानें समाजाचें धर्मगुरुत्वही त्याच्याकडेच आहे. धार्मिक बाजू दाखवून तो त्याचें मन वळवूं पाहात आहे. त्यानें कळविलें आहे कीं, ' मीं (व्हाइसरॉय) जिंकलेल्या प्रदेशांतील देवालयें पाडण्यास सुरवात केली आहे. ज्यासाठीं साठ पोर्तुगीज शिपायांनीं बलिदान केलें त्या रेड्डी किल्ल्याबाहेरील देवालयाचा विध्वंस करण्यास प्रवृत्त झालों असून त्यामुळें तेथील देवतांची होणार असलेली अप्रतिष्ठा टाळणें हें त्याचें कर्तव्य आहे. ' तहाच्या खड्यींत यासंबंधीं कलमें नाहींत असें मानलें तरी असल्या दूरच्या बातम्यांनीं सुद्धां क्षुद्र भावना असलेले मराठे प्रक्षुब्ध होऊं शकतात. कोणताही गैरप्रकार न व्हावा म्हणून मी खबरदारी घेत आहे. ही बातमी माहीत नसल्यासारखें दाखवून त्यांना लिहून कळविलें आहे कीं, उत्तरेकडील प्रदेशावर चाल करून आमच्यामधला तह मोडण्याचें मी कदापीही मनांत आणलें नाहीं.

आशियांतील राजकारणाची सविस्तर माहिती मिळावी म्हणून आणि नाना खरोखरीच वरील मुलखांत आला किंवा येणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं तर कोणतें संकट येईल तें दाखवून बादशाहांना हें पत्र लिहीत आहे. विशेष भय बाळगण्याचें कारण म्हणजे हलगर्जीपणा केल्यामुळें मुघलांवर मान खालीं घालण्याची आलेली परिस्थिति हें होय. मराठ्यांनीं त्यांच्या कारोमांडेल किनाऱ्यावर, बंगाल्यांत आणि त्यांच्या राज्यांतील मध्यभागांत शिरून केलेली ही पहिलीच मोठी नुकसानी होय. हें सर्व लक्षांत घेऊन बादशाहांनीं मीं दाखविलेल्या योजनांवर योग्य तो विचार करून आमच्या प्रदेशांचें रक्षण होईल असा निर्णय द्यावा.

पृ. ७, प. ९ च्या पोटांत इ. १७४७ जुलै २५	९	श. १६६९ आषाढ वद्य १४ इ. १७४७ जुलै १४

दमणचे कॅप्टन रोमांव द फोंसेक त्रिस्तांव > गोवा व्हाइसरॉय

या किल्ल्यांतून निघालेल्या एका फत्तेमारींतील तीन किल्ल्या असलेल्या एका तिजोरींतून ऐवज चोरीस गेल्याचें पत्र लिहून कळविल्यानंतर पंधरा दिवसांनीं पाली येथील किल्ल्यांत शंकराजीपंतांचें (शंकराजी केशव फडके) आगमन झालें. तेथील जमिनी खंडास देण्याचें आणि पूजोपचारासाठीं त्यांत एक देवालय बांधण्याचें

कारण जरी तो सांगत असला तरी दिसत असलेल्या घडामोडींवरून आणि मला मिळालेल्या ठिकठिकाणच्या इशाऱ्यांवरून खरोखर म्हणतां येतें कीं, त्याचें आगमन हें हा किल्ला बेसावधपणें ताब्यांत घेण्याच्या इराद्यानें असावें. किल्ल्यांतील नोकरास पगार वाढविण्याचें त्यानें आश्वासन दिल्याचेंही समजतें. आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आमचेच कांही पोर्तुगीज या कामीं त्यास सामील झाले आहेत. ते मराठ्यांकडून पगार म्हणून पैसे घेत असतात. खात्रीच्या अनेक इसमांकडून वरचेवर पुढील-प्रमाणें माहिती समजली आहे. येथील कृष्ण कामत या हिंदूस मांदोई या त्याच्या परिचयाच्या तेथील मित्रानें त्याची मंडळी घेऊन पालींत राहावयास येण्यास लिहिलें आहे. कारण जुलैअखेर शंकराजीपंत तेथील किल्ला घेणार आहे. त्यासाठीं त्यानें आपल्या बंधूकडे आणि चोटिया व कोले या राजांकडे माणसांची मदत मागितली असून त्यांनीं ती द्यावयाचें कबूलही केलें आहे. असें घडलें नाहीं तर तो आपलें शीर कापून देईन असें म्हणतो. आपल्या घरच्या मंडळींसह तो त्या किल्ल्यांत राहावयास आला आहे.

जुआंव द सौझ फेर्राझ हा कळवितो कीं, आरसेऱ्हीमच्या डोंगरीशेजारीं तीन हजार सैन्याची एक पलटण असून तितक्याच संख्येनें व्हाकस बेटांत (गाय-बेट) सैन्य उतरलें आहे. ते लोक तेथें घाट बांधीत आहेत व लढाऊ सामग्री जमवीत आहेत. पालीच्या डोंगरीवर सहाशें व भागाव्हारा येथें पांचशें आणि इतर बऱ्याच ठिकाणीं याहून कमी संख्येनें त्याचे लोक आहेत. उपर्युक्त तीन राजे देणार त्या सैन्याची या संख्येंत भर पडणार आहे. शंकराजीपंताचा आंतरिक हेतु कोणता आहे, तें या बातम्यांवरून समजून आल्यानें माझ्या समजुतीप्रमाणें व शक्त्य-नुसार मी पुढील तयारीस लागलों. हल्ल्याचा प्रतिकार होईल अशी व्यवस्था ठेविली. पाहणीच्या निमित्तानें सैनिकी तुकड्यांची अदलाबदल केली. दरवाजांचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांत वाढ करून एकेक अधिकारी जादा ठेविला.........माझ्या हालचालींचा सुगावा शंकराजीपंतास लागण्यास उशीर लागला नाहीं. आपण केवळ जमिनी खंडास देण्यासाठीं आलों होतों अशी बातमी त्यानें पुन्हा प्रसृत केली व त्याच्या खरेपणासाठीं परिवारांतले कांहीं शिपाई नोकरीवरून काढले. वास्तविक त्यांस दुसरीकडे पाठविण्यांत येत होतें. आम्हीं सावधपणानें घेतलेली खबरदारी पाहून शंकराजीपंत खजील झाला व तो आठ दिवस झाले वसईस निघून गेला. जातांना तो सांगून गेला कीं, मोगलांनीं मराठ्यांचे दोन डोंगर जिंकून घेतले आहेत. त्यासाठीं फौज घेऊन त्याला पुण्यामध्यें बोलावलें आहे. हें सर्व आम्हांस चकविण्यासाठीं असून समुद्रांत नारळ टाकल्याबरोबर तो या किल्ल्यास (दमण येथील) शह देण्यासाठीं, समुद्रांतून व जमिनीवरून येऊन ठाण मांडून बसणार आहे. आम्हांस जीवनास आवश्यक त्या वस्तूंचा पुरवठा होऊं देऊं नये हा त्याचा हेतू आहे.

पु. १३, प. १० } १० { श. १६६९ मार्गशीर्ष वद्य १४
इ. १७४७ डिसेंबर ३० } { इ. १७४७ डिसेंबर १९

गोवा व्हाइसरॉय > पोर्तुगालचा बादशाह

गेल्या २२ जानेवारीस सेंट फ्रॅन्सिस झेव्हियर बोटींतून पाठविलेल्या पत्रानें येथील तत्कालीन परिस्थितीची माहिती देतांना, भोंसल्यांस मदत व्हावी म्हणून मराठे घाटमाथ्यावरून उतरून येतील अशी भीति व्यक्त केली होती. ती बातमी मिळाली तेव्हांच मीं माझ्या पदरीं असलेल्या थोडक्या सैन्यानें भोंवतालचीं ठाणीं व आरमारी गलबतांनीं नद्या यांचें संरक्षण केलें. तोफखाना आणतां येईल असे उतारही सांभाळले. या प्रसंगीं मला सहाशें पायदळ सैनिकांची कमतरता भासली. दमण व दीव येथें मदत घेऊन जाणाऱ्या पोर्तुगालास माल घेऊन जाणाऱ्या व मंगळूरहून माल आणणाऱ्या गलबतांवर पाठविण्यास त्यांची जरूरी होती. सद्यःस्थितींत अनेक ठाणीं सुरक्षावीं लागत असल्यानें कोणत्याही बिकट प्रसंगीं रवाना करण्यासाठीं एक राखीव पलटण असावयास पाहिजे होतीं.

गोव्यावर स्वारी करण्यास जात असल्याचा बोभाटा करून तीस हजार घोडेस्वार व थोडें पायदळ असलेली नानाची सेना निघाली होती. भोंसल्यांविरुद्ध आम्हांस साह्य दिल्याबद्दल त्यानें सोंधेकर राजाकडेही जाब मागितला आहे. आमच्या लश्करास अडवितां येईल म्हणून आमच्या हद्दींजवळ असलेले फोंडे व कावु द राम येथील मर्दनगड व खोलगड हे किल्ले स्वाधीन करण्यास ताकीद दिली. सोंधेकरास आपला धाक वाटावा म्हणून त्यानें सुपें व अश्वा येथील त्यांचे किल्ले तरवारीच्या बळावर स्वाधीन करून घेऊन घाटामाथ्यावरील ठाणीं बळकावलीं. त्या स्वारीचें सैनापत्य नानाचा अठरा वर्षें वयाचा चुलतभाऊ सदोबा याजकडे होतें. तो पहिल्याच खेपेस स्वारीवर आला होता व त्यास शौर्य गाजवून बहादुरी मिळवावयाची होती.

सासष्टी महालाच्या तीन किंवा चार ठाण्यांवर तें सैन्य पोंचतांच घाटावरील सर्व मार्ग रोखून धरले व झाडें तोडून अडथळा निर्माण केला. मराठ्यांचें नांव घेतलें कीं, आशियांत कापरें भरतें. तें नांव उच्चारावयालादेखील भय वाटतें. सुप्यांत मराठे पोंचतांक्षणींच घाटाचें रक्षण करणारे सोंधेकराचे शिपाई व राणे निघून गेले. सासष्टीचे रहिवासी महाल सोडून गेले. ठाणीं न सोडतां सतत रक्षण करीत राहावें न पेक्षां अविश्वासू म्हणून शिरच्छेद केला जाईल असें आमच्या सरदारांना (ऑफिसरांना) निक्षून कळविलें नसतें तर आमच्या शिपायांनींही तेंच केलें असतें. कांहीं महिन्यांपूर्वी नानानें, आम्हीं भोंसल्यांशीं तह करावा म्हणून भासविण्यासाठीं आपला प्रतिनिधी महिपतराव चंदो (Chando) यास पाठविलें होतें. कोणत्याही प्रश्नाचें निर्णयात्मक उत्तर न देतां धूर्तपणानें तो दिवस काढीत होता. हिंदू लोकांना

राजी ठेवण्यास त्यांना त्यांच्या कलाप्रमाणें वागविलें पाहिजे असेंही तो सुचवीत होता. त्याला येथें ज्यास्ती दिवस रहावयास पाहिजे होतें. त्यासाठीं तो निमित्त हुडकीत होता. आपल्या धन्याचा निरोप येण्याची तो वाट पहात होता. आपणांस निघून येण्याची आज्ञा मिळावी म्हणून तो कारणें देऊन पुणें दरबाराकडे निकड लावीत होता आणि अशा रीतीनें तो येथील आपला मुक्काम वाढवीत होता. त्यानें आपणांस कैदी या नात्यानें निघण्यास मनाई केली असल्याचेंही त्यास कळविलें होतें. उत्तराची वाट पहात येथें दिवस काढीत राहावें हा हेतु त्याच्या मुळाशीं होता.

असा प्रकार चालला असतांना सदोबाकडून मला एक पत्र आलें तें औपचारिक भाषेनें भरलेलें होतें. महिपतराव इतका काळ तेथें काय करीत आहे याची त्यांत पृच्छा करून त्यास पाठवून देण्याची मला तो विनंती करीत होता. त्याचबरोबर मला त्यानें सुचविलें होतें कीं, आपल्या चुलतभावानें आपले हुकूम अमलांत आणण्यासाठीं आपणांस या स्वारीवर पाठविलें आहे. त्यानें उघडपणें जरी लिहिलें नव्हतें तरी मला भोंसल्यांशीं तह करण्यास भाग पाडावें आणि मी उत्तरेकडील आमच्या प्रदेशांवर स्वारी करण्याचा तयारींत आहे कीं काय याचा अंदाज घ्यावा असें त्याच्या मनांत असल्याचें दिसून आलें. उत्तर पाठविण्यास विलंब न करितां मीं त्यास कळविलें कीं, महिपतराव वाटेल तेव्हां जाण्यास स्वतंत्र आहे. तो तेथून कां गेला नाहीं याचीं कारणें तोच सांगूं शकेल. राजदूतांनीं जाण्याचा निरोप मागितल्याविना तो न देण्याचा आमचा शिरस्ता आहे. त्यांना त्यांच्या चुलत बंधूंनीं सैनापत्य देऊन स्वारीवर पाठविलें याबद्दल त्यांचें अभिनंदन करून त्यांस सुयशही चिंतिलें.

मीं त्यांच्या फौजेचा धाक घेतला असें सदोबाला वाटूं नये म्हणून उत्तरेच्या बाजूनें गलबतें रवाना केलीं. शाही गलबत दक्षिणेस पाठविलें. मोझांबिकला जावयाचीं तींही रवाना केलीं. जकातीचे व नव्यानेंच जिंकून घेतलेल्या जमिनीच्या उत्पन्नाचे मक्ते लिलावानें सोंपविले- रायतूरच्या कोटाचा खंदक पाण्यानें तुडुंब भरलेला असावा म्हणून तेथें जोरानें व्यवस्था ठेविली. इतक्यांत सदोबानें दुसरें पत्र पाठवून कळविलें कीं, आमच्या छत्राखालीं असलेल्या भोंसल्याशीं (कोल्हापूरकर) मी (गोव्याचा व्हाइसरॉय) युद्ध चालू केल्याबद्दल त्यांच्या चुलत बंधूस (शाहूस) विषाद वाटला असून त्यांच्या मनांत मी तह करून जिंकून घेतलेले महाल व किल्ले भोंसल्यास परत द्यावे असें आहे. त्यासाठीं मी मुक्कामास आहे त्या ठिकाणीं न्याय्य असा तह घडवून आणण्यासाठीं आपला योग्य अधिकारी पाठवावा.

या पत्राची दखल घेतल्याविना मी राहिलों नाहीं. आपल्या मागणीस मान दिला नाहीं तर शस्त्र चालवूं अशी अप्रत्यक्ष धमकी त्यांत आहे हें मी जाणलें. किल्ले लढविण्यास त्यांजपाशीं तोफखाना नव्हता. त्याचप्रमाणें भरपूर दारूगोळाही

नव्हता. त्यामुळें मला त्यांची भीति वाटत नव्हती. तरी पण उघड्या मैदानावर लढाई झाली तर आमचा प्रदेश उद्‌ध्वस्त होऊन शाही उत्पन्नास खोट आली असती आणि ही नुकसानी दुसऱ्या कोठूनही भरून येण्यासारखी नव्हती. कांहीं वेळां माझ्या कामाच्या व कांहीं वेळां माझ्या राज्यसेक्रेटरीच्या कामाच्या निमित्तानें उत्तर द्यावयाचें तें होतां होईल तितकें लांबणीवर टाकीत गेलों. पण हें त्याच्या लक्षांत येऊं दिलें नाहीं. माझा हेतु वेळ काढावयाचा होता. कारण शत्रू ज्या तळावर ठाण मांडून बसला होता तेथें त्यास दाणागोटा भरपूर मिळण्यासारखा नव्हता व त्यामुळें तो जेरीस येणार होता. हल्ल्यास तोंड देण्याइतकी आमची तयारी आहे, हद्दीवरील ठाणीं संरक्षित आहेत, प्रवेशद्वारावरच लढाईस तोंड दिलें पाहिजे, नित्याप्रमाणें लूट मिळण्याचा संभव नाहीं, कारण प्रदेश निर्मनुष्य दिसला असता, हें मराठे जाणून होते. म्हणून ते शांतपणानें पावलें टाकीत होते आणि मला पाठवीत असलेल्या पत्रांत स्वतःचे पराक्रम व दरारा वर्णन करून आमच्यामधील वाटाघाटी गंभीरपणें चालणें उभयतांच्या दृष्टीनें कशा हितकर आहेत हें लिहीत होते.

गोव्यांत हा प्रकार चालत असतांनाच आम्ही उत्तरेकडील प्रदेशावर स्वारी करणार असा नानाचा झालेला समज काढून टाकतां यावा म्हणून साताऱ्यास माणसें पाठविलीं. नानाचा समज दूर करण्यासाठीं अनेक मार्गांनीं त्यास कळविलें कीं, उत्तरेकडील प्रदेशांवर स्वारी करण्याची कल्पना आमच्या मनाला देखील शिवली नाहीं. आरवंदें, आलोर्नें व रेड्डी या ठिकाणीं घडलेल्या भयंकर प्रकाराचा अनुभव ताजा आहे. त्या ठिकाणीं आमच्या शस्त्रांनीं कीर्ति मिळवून शत्रूस विस्मित केलें; पण ती उघड उघड देवाची कृपा होती. तोच आम्हांस त्या संकटांत पावला. त्यानेंच त्या वेढ्यांतून आमची मुक्तता करून मराठ्यांच्या घनघोर हल्ल्यांत आम्हांस यशस्वी केलें. मराठ्यांचाही लौकिक आशियांत पसरून त्यामुळें आशियाई राष्ट्रांचे, मलबार किनाऱ्यावरील राजामहाराजांचे, सोंधेकर राजाचे आणि दूरदूर ठिकाणच्या नबाबांचे वकील सदोबाच्या पायांशीं लोटांगणें घालून आपापला करभार द्यावयास आले. मात्र, अगदीं शेजारीं असतांना गोव्यांतील एकही माणूस तेथें फिरकला नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यानें पाठविलेल्या पत्रांचीं उत्तरेंही त्यास धड गेलीं नाहींत. या पत्रोत्तराच्या घडामोडींत बरेच दिवस लोटले आणि शेवटीं सदोबानें आपली छावणी उठवून कर्नाटकाच्या हद्दीवर कूच केलें. तो निघून गेल्याची बातमी समजतांक्षणींच तो गेला त्याच ठिकाणीं मिळेल असें एक पत्र पाठवून त्याला कळविलें कीं, असले तह सैन्य तळावर होणें शक्य नाहीं. त्यासाठीं मागील सर्व तहनाम्यांची दखल घेतली पाहिजे. हा विषय इतका किचकट आहे कीं, तो पत्रीं लिहितां येणें शक्य नाहीं. भोंसल्यांना तह व्हावा असें वाटत असेल तर त्यांनीं गोव्यांत [वकील] पाठवून आम्हांस आपल्या अटी कळवाव्या. त्यावेळीं नानाचाही

प्रतिनिधी तेथें असावा. यांत आम्हांलाही समाधान होईल. कारण आजपर्यंत भोसल्यांनीं आम्हांशी केलेल्या गैरवर्तनाची व कारवायांची त्याला प्रत्यक्ष माहिती मिळेल. तो एक साक्षी होऊन जगाला थरथर कांपविणाऱ्या एका प्रबळ सत्तेच्या आरोपांतून आम्ही मुक्त होऊं.

पृ. १७, प. ११ } ११ { श. १६७० आश्वीन शुद्ध १४
इ. १७४८ ऑक्टोबर ७ } { इ. १७४८ सप्टेंबर २६

गोवा व्हाइसरॉय > गोवा, दमण व दीव प्रदेशासाठीं नियोजित संरक्षण समिती

आम्ही उत्तरेकडील प्रदेशावर हल्ला करणार या संशयानें नाना आमच्याकडे डोळ्यांत तेल घालून पहात आहे. आम्ही भोंसल्यांचा मुलूख घेतल्यानंतर त्यानें आम्हांकडून घेतलेल्या किल्ल्यांतच नव्हे तर गायबेट, कारंजा वगैरे ठिकाणचे जे इतर किल्ले आपल्या संरक्षणार्थ उपयोगी पडण्यासारखे आहेत त्यांतही नवीं नवीं बांधकामें करून ते सुसज्ज ठेविले आहेत.

पृ. १६, प. १२ } १२ { श. १६७० माघ वद्य १०
इ. १७४९ जानेवारी २८ } { इ. १७४९ जानेवारी १७

गोवा व्हाइसरॉय > पोर्तुगालचा बादशाह

आम्ही सर्व सागरी किल्ले जिंकून घेतले; ज्यांच्यावर सैनिकी सामर्थ्य अवलंबून होतें त्या ' कोर्स ' गलबतांचा भरंवसा नाहींसा झाला; राज्यांतील बहुतेक मुलूख उजाड पडला; तरीही भोंसला आमच्या अटी मान्य करून तहास तयार होत नाहीं हें समजून बादशाहांस आश्चर्य वाटावयास नको. त्याच्या या धाष्ट्यांचें इंगित शोधण्याचा मी कसून प्रयत्न केला. नानास आमच्याशीं सध्या लढा देणें अप्रस्तुत वाटतें. पुण्याचा करार मोडल्यासारखा होईल किंवा भोंसल्यांनीं करार केला तर आम्ही (पोर्तुगीज) मोकळे होऊं म्हणून मात्र नव्हे. त्याचें कारण निराळेंच आहे. भोंसला पुणें दरबारकडून मदत मिळेल या आशेवर आहे. दरबार त्याला मदत देणार नाहीं. पण नकारही देत नाहीं. नवीन नवीन आमिषें दाखवून आमच्याविषयीं त्याच्या भावना चेतवीत ठेवून आमच्याशीं व्हावयाचा तह घडूं देत नाहीं. आपलें सैन्य मदतीस पाठविणें योग्य वाटत नाहीं; पण भोंसल्यांच्या राहिलेल्या सैन्याच्या उपजीविकेकरितां आर्थिक मदत पुरवीत आहे. हल्लींच दरबारनें भोंसल्यास पन्नास हजार रुपये पाठविले

असून याहून अधिक लागल्यास पाठविण्याचें आश्वासन देऊन ठेविलें आहे, असें समजतें. भोसल्यांच्या स्वारीच्या विवंचनेंत आम्ही येथें गुंतून राहून गोवा व तदनुषंगिक बेटें व प्रदेश उध्वस्त होतील या भयानें उत्तरेकडील प्रदेश परत घेण्यासाठीं निघण्याचा विचार आम्ही करणार नाहीं असें दरबारला वाटतें.

आमच्या विरुद्ध चढाई न करण्यास नानाला आणखी एक कारण आडवें आलें आहे. मोगल बादशाह मुहम्मदशाह हा गेल्या ८ मे दिवशीं मरण पावला. तदनंतरच्या जून महिन्याच्या आरंभीं त्याचा नव्वद वर्षांचा वृद्ध सेनानी नजीमउलुक किल्लीसखान हा मृत्यू पावला. हा सर्वांत लुच्चा होता. त्यानें बादशाहाशीं अप्रामाणिकपणें वागून त्याच्या अधिकारांत अनेकदा हस्तक्षेप केला आणि मराठ्यांना फितविण्यासाठीं बादशाही सत्तेखालील मोठ-मोठे प्रांत देऊन त्यांची खंडणी स्वतः-कडे देण्याच्या अटी घातल्या. यामुळें मराठ्यांचा राज्यविस्तार वाढून सामर्थ्यही वाढलें. अशा प्रकारें मराठ्यांस खूष ठेवण्याचें कारण म्हणजे आधींच स्वभावानें बावळट व भित्रा असलेल्या बादशाहानें सदासर्वकाळ आपणास वचकून राहून आपणांवर अवलंबून राहावें हें होय. मृत बादशाहांचा तेवीस वर्षे वयाचा मुलगा अहमदशाह आतां गादीवर आला आहे. एका मोठ्या प्रांताची राजधानी असलेल्या लाहोर शहरांतील किल्ला कंदाहारमधील पठाणांनीं व्यापला होता. तो त्यानें समोरासमोर मैदानी लढाई देऊन परत जिंकून घेतला होता. याचा त्याला मोठा अहंकार आहे. सेनापति किलीसखान याच्या निष्ठेविषयीं बादशाहास (नवीन गादीवर आलेल्या) शंका होती. त्या सेनानीच्या मरणानंतर सेनापतीपदावर आलेला त्याचा मुलगा नसरतजंग याचें वर्तनही संशयास्पद वाटलें म्हणून त्याला दूर करण्यात आलें. ती जागा आणि मुख्य वजिरी चालविण्याकरितां आता मन्सुर अलीखान यास नेमण्यात आलें आहे. दरबारांतील उमरावांमध्यें योग्यता असलेला हाच एक उमराव होता. त्यानें तोफखान्यावरील प्रमुखाधिकाऱ्याचें काम केलें होतें. अगदीं शेवटच्या काळांत मृत बादशाहाच्या संरक्षक सेनेचा तो प्रमुख (कॅप्टन) होता. त्याचा कल मराठ्यांविरुद्ध असल्याचें समजतें. आजतरी वरवर पाहतां दिसून येतें कीं, नाना या नव्या सेनापतीस वचकून आहे. म्हणूनच म्हणतों कीं, गेल्या वर्षीं आणि तूर्तही घाटावरील बाजूनें तो आला असतांही, तो आमच्या वाटेस गेला नाहीं मला आतां माहीत झालें आहे कीं, जेव्हा नानानें शेवटच्या खेपेस पैसे पाठवून दिले तेव्हां त्यानें मराठ्यांविरुद्ध मोगलांनीं केलेल्या एका हल्ल्याच्या प्रसंगीं सांगितलेलीं जहाजें भोसल्यांनीं मदतीस पाठविलीं नव्हतीं तो त्याचा अपराध त्याला माफ केला असल्याचा निरोपही दरबारकडून पाठविण्यात आला.

पृ. २२, प. १६
इ. १७५२ जानेवारी १० } **१३** { श. १६७३ पौष वद्य ९
इ. १७५१ डिसेंबर ३०

गोवा व्हाइसरॉय > बादशाहाचे राज्य सेक्रेटरी दियोगु द मेन्दोस कोर्त्य रेयाल

तुम्ही २ एप्रील १७५१ या दिवशीं लिहिलेले पत्र मला मिळाले. त्यांत तुम्ही कळविता की, " माझ्या मागच्या व्हॉइसरायानीं या राज्याच्या या गतवर्षाचा कारभारविषयक अवहाल (अहवाल) पाठविला होता तो वाचण्यांत आला. शाहूराजाच्या मृत्यूमुळे आणि त्याच्या गादीवर रामराजा आल्यामुळे मराठ्यांमध्ये उडालेलया खळबळीची माहिती देऊन शाहूच्या दरबारांत नानाचे केवढे वजन होते याचे वर्णन करून देवाची इच्छा असेलतर हा झालेला बदल पोर्तुगीझांस उपकारक होईल असेंही म्हटले होते तेही लक्षांत आले."

नानाने आम्हास कधीच स्वास्थ्य लाभूं दिले नाही. पोर्तुगिझांकडे शत्रुत्व केले तर यदाकदाचित् आपल्या हितसंबंधास धोका येईल म्हणून तो मान भावीपणानें आमचा मित्र म्हणवीत होता. पण आता ते अपेक्षित स्वास्थ्य आम्हास लाभणे शक्य झाले आहे. रामराजांची आजी सुविख्यात ताराबाई सदासर्वकाळ नानाचा पाडाव करण्यास धडपडत होती तिच्या परिश्रमाने नासरजंगाचा वारस सलाबतजंग याचा आणि सर्व मराठा जातीचा एक संघ नाना ज्या ब्राह्मण जातीचा आहे त्या विरूद्ध होऊं पाहात आहे. नानावर येऊं पाहणाऱ्या या संकटाची सुसंधि, मला आवश्यक ती साधने मिळविता आली तर मी अवश्य साधीन.

पृ. २३, प. १७
इ. १७५२ जानेवारी १२ ? } **१४** { श. १६७३ पौष वद्य ११ ?
इ. १७५२ जानेवारी १ ?

गोवा व्हाइसरॉय मार्किस द ताव्होर > पोर्तुगालचा बादशाह

महाराज, गेल्या पत्रात चालू वर्षांतील घडामोडी कळवून आणि नाना व दाभाडे (Dabadia) यांमध्ये माजलेले वैमनस्य लिहून ते संपविण्यात आले होते. ते पत्र लिहिल्यानंतर आणखी ज्या घडामोडी घडल्या त्या या पत्रांत देतो या वर्षी आशियात (हिंदुस्थानात) आगीच्या ज्वाला भडकत असून सुरत येथे त्यांस आरंभ झाला आहे. तेथे दोन नबाबांमध्ये अधिकारासाठी कलागत लागून हमरीतुमरीही चालली आहे. एकाने आपला तळ ठोकला असून दुसऱ्याने शहरात ठेवला आहे. पहिल्याला इंग्रजांचे साह्य असून दुसऱ्याला सिद्द्याचे व डचांचे साह्य मिळत

आहे. ही लढाई अद्यापही चालू असली तरी इंग्रजांच्या बाजूने ती सौम्य होऊ लागली आहे. इंग्रजांनी मराठ्यांची मदत मागितली होती; पण त्यानी नकार दिला. याचे कारण, मोंगलांच्या बाजूचा औरंगाबादचा नबाब सलाबतजंग हा फ्रेंचांच्या सहकार्याने आपणावर चाल करून येत असल्याची त्यांना बातमी मिळाली होती आणि खरोखर हा नबाब ८० हजार सैन्य घेऊन मराठ्यांविरुद्ध चाल करून येत असतां वाटेत त्याच्या मराठ्यांच्या फौजेशीं तीन चकमकी झाल्या. त्यांत नानांच्या बाजूचाच मोड झाला. मराठ्यांचे सैन्य तूर्त बरेच कमी आहे. कारण त्यांच्या मधील एक प्रमुख असा सेनापति जो मालाजी (मल्हारराव) होळकर तो साठ हजार सैन्यांसह बंगाल्यात गेला होता. त्यांना तेथील पठाणांनी अडवून धरल्यावरून तो नानांच्या मदतीस येऊ शकत नाही. मोंगलांची फौज नजीक येऊन ठेपली. वाटेत आणखी दोन चकमकी झाल्या. त्यातही मराठेच पराभूत पावले, म्हणून राहिलेले सैन्य घेऊन नाना पुणे सोडून एका गौरवर (Goure) बसला आहे. गौरु हें नांव डोंगरीस लावले जाते व ती कोटासारखी संरक्षित असते. या ठिकाणी आमच्याकडून घेतलेल्या उत्तरेकडील किल्ल्यांतील देखील सैन्य आणून भरती केली असल्याने सध्या ते असंरक्षित आहेत. मला आहेत त्याहून जर विशेष अधिकार असते तर, ही आश्चर्यकारक रितीने आलेली संधि साधून तेथे आमच्या सत्तेची पुनर्स्थापना केली असती. याविषयी सांगावयाचे आहे ते पुढे सांगेन. येथील फ्रेंच अधिकाऱ्यांनी (आपल्या अहवालांत) आमच्या प्रदेशासंबंधी लिहिताना ही लुईसने आता इदच्या सरकारने चौल बंदरांत सैनिकी मदत पाठविली ती संबंधाने म्हटलें आहे की, नवे नवे प्रदेश जिंकण्याची हांव हीच आमच्या (पोर्तुगिझांच्या राज्य भ्रष्टतेचे कारण आहे.) हे त्यांचे म्हणणे जर खरे मानायचें तर त्यांनाही तेच लागू आहे. कारण तेच त्यांच्याकडून घडत आले आहेत. डुप्ले हा आपली आकांक्षा व्यक्त करितो ती आशिया (हिंदुस्थान) जिंकून घेण्याची आणि म्हणून त्याने आपले सैन्य निरनिराळ्या ठिकाणीं पसरून ठेविले आहे.

डुप्लेने एका पत्रात आपला सां. तोमे मुलुख परत मिळविण्याच्या कामी मदतीकरितां एक सैनिकी पलटण पाठविण्याची विनंती केली होती. त्या पत्रांतील दुसऱ्या एका परिच्छेदांत त्यानें पुढीलप्रमाणे माहिती दिली होती :–

"औरंगाबाद येथे असलेला तुमच्या सैन्याचा अधिपति 'बसी' हामला कळवितो की, सातारा येथे असलेली शाहू राजाची विधवा ताराबाई (१) हिने एक दूत पाठवून, अनावर होऊन बसलेला बाजीरावचा मुलगा नाना याचा पाडाव करण्यास त्याशी ती झुंज देणार आहे. त्या प्रसंगी त्याने व नबाब सलाबतजंग याने आपणास मदत करण्याची सिद्धता ठेवावी. आपणही सैन्याची मोठी जमवाजमव

करण्याच्या तयारीत आहे असे कळविले आहे. त्यासाठी तिने गोव्याच्या व्हाइसरायास वसई व त्यालगतचा संबंधित प्रदेश परत देण्याचेही कबूल केले आहे. या पत्रावरून वाटते की, अधिकाराने उत्मत्त झालेल्या त्या ब्राह्मणाचा कोणत्याही रीतीने नक्षा उतरविण्यास सलाबतजंगही उत्सुक आहे. हा तुमचा सेनापति मला आणखी सुचवितो की, मी आपणाशी या संबंधी पत्रव्यवहार करावा. हातचे गेलेले प्रदेश मूळच्या धन्यास परत मिळवून देण्याची ही एक नामी संधी आहे. असें त्यांचें म्हणणे आहे. जर तुम्हास ही कल्पना पसंत पडली तर तुम्ही परस्पर मोसिनोर बसीशी ताबडतोब पत्रव्यवहार करावा. तो एक सच्चा, हूशार, उपयुक्त आणि पोर्तुगीज राष्ट्राचा हितचिंतक असा इसम आहे. तुमचे मोठमोठ्या उत्पन्नाचे गेलेले प्रदेश परत मिळवुन देण्याचे कामी माझा उपयोग झाला तर मी धन्यता मानीन. खरोखर अशा तऱ्हेची सुसंधि परत येणार नाही. औरंगाबादवाल्यां संबंधी आपले धोरण काय राहींल ते समजून घेण्याची मला उत्कंठा लागली असून तेथे पत्रव्यवहार केल्यास मला ते समजून येईल असा माझा समज आहे."

त्यांना मी उत्तरी कळविले की:–

कसई, साठी व इतर संबंधित प्रदेश परत घेण्याची माझी आकांक्षा मी कधीच विसरणे शक्य नाही. आमच्या देशाच्या दृष्टीने देखील हेंच योग्य आहे. परंतु ही कल्पना कार्यवाहीत आणण्यासाठी अनेकांनी एकाचवेळी लुडबूडकरणे उपयुक्त होणार नाही. ज्या दोघांसंबंधी आपण लिहितां त्यानी त्यासंबंधाचे आपापले प्रयत्न वेगवेगळे चालू ठेवून ते आमच्या दृष्टीत्पत्तीस आणावे. म्हणजे, त्यानां आमच्या उत्तरेकडील प्रदेशांविषयी किती आस्था आहे हे मला कळून येईल. याखेरीज लिहिले की, ताराबाई किंवा बुसी यां कडून अद्याप आम्हांकडे पत्रे आलेली नाहीत. मी मात्र मोसिनोरबसीन जासुदाकडून पत्र पाठवून कळविले आहे की, मोसिनोर डूप्लेस यानी तुमच्या कडे पत्रव्यवहार करून तेथील हालहवाल काय आहे ती समजून घेऊन तांतडीनें करविण्यास सांगितले आहे. कारण, जर आगामी दिवसांत स्वारी करावयाची ठरली तर ती उभयतांस सोयीस्कर होईल अशी झाली पाहिजे. मोसिनोर यांना लागोपाठ दोन पत्रे लिहून दोन जासुद रवाना केले आहेत. अद्याप त्यांची उत्तरे नाहीत. पहिल्याचे उत्तर येण्याची मुदत तर संपून गेली आहे."

ताराबाईनाही पत्र लिहिले. त्या आपल्या उत्तरात दारूची मागणी करितात. प्रमाण मोठेसे नाही. त्यांना मी भेटीदाखल बऱ्याच वस्तु पाठविल्या आणि दारूच्या– बाबतीत लिहिले कीं, आमच्या राष्ट्राशी दोस्तीचा तह नसणाऱ्या अन्य कोणासही दारू सारख्या वस्तु देण्यास आमच्या राजेसाहेबांची सक्त मनाई आहे. तुमच्या– आमच्यात असा तह नाही. याबद्दल खेद वाटतो. तो झाला तर पुढील योजना सहकारपूर्वक पार पाडतां येतील. दारू पाठविण्यापुरतीच नव्हे तर आमच्या समर्थ

राज्याच्या सैनिकी बळाचाही पाठिंबा मिळेल. या पत्राचे अद्याप उत्तर आलें नसले तरी यामुळे आमच्या मधील पत्रव्यवहारास मी आरंभ करून ठेवला आहे.

एक मात्र खरे आहे की, मोंगल सैन्यांस मिळालेल्या फ्रेंच सैन्यांचा प्रमुख हा क्याप्टन असून तो उभय सैन्याचे सेनापत्य चालवितो. नबाब हा पोरसवदा तरुण असल्याने तो डोळे झाकून त्यांच्याच धोरणाने वागतो. मोंसिनोर डुप्लेस उत्तरेकडील प्रदेशांसंबंधाचे मला अमीष दाखवितो ते मी सत्य मानीत नाहीं नी झिडकारूनही टाकीत नाही. संधि आलीच तर, माझ्याकडें कमी सैन्यबळ आहे याची जाणीव न घेता त्याने मला प्रामाणिकपणाने मदत केली पाहिजे. म्हणून मी आवश्यक ती सावधानता बाळगून आहे. मोंगलांनाही मी लिहिले आहे. त्यांचे अद्याय उत्तर मिळाले नाही. मोंगलांचे जर मला सहाय्य मिळविता आले तर उत्तरेकडील प्रदेश परत मिळविण्याची व संरक्षित ठेवण्याची माझी आकांक्षा सफल होईल यात शंका नाही. त्याबाबतीत मी कसून प्रयत्न करणार आहे. अशा या महत्वाच्या कामी त्यांच्याशीं विचारविनिमय करण्यास लायक असा इसम तेथे रवाना करावा अशी माझी इच्छा आहे. सिद्दीकडे पाठविण्यास लायक असा इसम मिळणे कठिण नाही. पुष्कळ प्रसंगी त्याने आमच्याशी मित्रभाव दर्शविला असल्याने त्यालाही मी लिहिले आहे. त्याच्या उत्तराची मी वाट लक्षीत आहे.

मोंसिनोर डुप्लेश आपल्या पत्रांत लिहितो त्याप्रमाणे बसीचे पत्र आले नाही. ताराबाईचें जें पत्र आले त्यांतही डुप्लेश म्हणतो तो संदर्भ नाही. त्याने उल्लेखिलेली पत्रे येण्यास आवश्यक तो काळ निघून गेल्यावरून यापुढे मी त्यासंबंधी काहीच न लिहिणे चांगले. आता पर्यन्त जे काय घडले ते संशय व सावधानता बाळगून लक्षीत राहावे असे मला वाटते,

फ्रेंच व कानारा (कर्नाटकी हैदरअल्ली असावा) यांच्यामध्यें जी लढाई होऊं पहात आहे ती संबंधीं मला कांहीं तरी सावधगिरी बाळगिली पाहिजे. कारण दोघांशींही आमची मैत्री आहे. मोंसिनोरने आपल्या पत्रांत अद्याप लढाई न पुकारण्याचे लिहून माहीमच्या सरकारला एक हजार बंदुकांची मदत पुरविण्याची मागणी केली होती, आपल्या बंदुका येताच त्या लगेच परत करण्याचीही हमी दिली होती. मला वाटत आहे कीं, त्याच्या मागणी इतक्या संख्येने बंदुका पुरवू नयेत. साफ नकारही देऊं नये. असें केले तर आमचे असलेले संबंध तुटतील. आशि उत्तरेकडील प्रदेश मिळवून देण्यासाठीं मदत देण्याचे जे आश्वासन त्यानें दिलें आहे त्यास बाधा येईल. म्हणून मी मध ला मार्ग अनुसरून त्यास कळविणार आहे कीं, मागणी इतक्या बंदुका अनुकुल नसल्याने शक्य झाल्या तितक्या पाठतिणार आहें. याही फारच थोडया असतील.

पृ. २६, प. १८
इ. १७५२ जानेवारी ३० } १५ { श. १६७३ माघ शुद्ध १५
इ. १७५२ जानेवारी १९

गोवा व्हाइसरॉय > पोर्तुगालचा बादशाह

नानानें भोसल्यास (वाडीकर) सैनिकी मदत पाठविली त्याचवेळी तो मोठे सैन्य घेऊन मोगलसत्तेखालींल औरंगाबादेवर चा क करून गेला. या स्वारीमुळे आपण बराच फायदा उठवू अशी त्याची कल्पना होती पण पठाणाच्चेत एका तुकडीने त्यांच्या सैन्यावर हल्ला करून त्याचे बरेच सैनिक व सरदार ठार करून टाकले नाना आपल्या सैन्यानिशी पुण्याहुन निघताच धाबारियाचा (Dabaria) सेनापती दमाजी गायकवाड हा वीस हजार सैन्य घेऊन ताराबाईच्या आज्ञेने सातारा शहराच्या रक्षणार्थ आला. याच शहरांत ताराबाई आपला नातवास मराठ्यांचा राजा जो रामराजा त्यासहीत राहते. नाना औरंगाबादच्या स्वारीवर होता तो परत आला दमाजी गायकवाडास शहरातून बाहेर काढण्यास आपण जात असल्याचेही त्याने जाहीर केले. दमाजीस तशी ताकीदहि पण दिली. दमाजी सैन्यासह शहराबाहेर येऊन तळ देऊन राहिला ही उभय सैन्ये परस्पर संमुखे होती. परंतु आपला पराभव होईल या भीतीने नाना दमाजीच्या सैन्यावर हल्ला करण्यास धजला नाही. त्याने दमाजीकडे तहाची मागणी केली. उभयतांनी एकमेकांस सन्मानानेवागवावे अशीही तीस पुस्ती जोडून तो आपल्या छावणीतील तंबूत येईल असे वातावरण निर्माण केले. आणि तो तंबूत येतांच त्यास कैद करून त्याच्या पायात शृंखला ठोकल्या व व त्यास आपल्या सैन्यासमोर ठेवून दुसऱ्या तंबूत ठेवले व तेथे त्याला बंदीस्त केले. सभोवती खडा पहाराही ठेवला. पायात शृंखला अडकवणे हा येथे मोठा अपमान समजतात. आपल्या सेनापतीस अटकेत ठेविल्याचे ऐकून दमाजीच्या छावणीत घबराट पसरली. होती. त्या संधीचा फायदा घेऊन नानाने आपल्या सैनिकांकरवी ती छावणी लुटली. ठिकठिकाणी पसरलेल्या आपल्या सैन्यास पुण्यास जाण्याची नानाने आज्ञा केली व तीस अनुसरून, भोसल्याच्या मदतीसाठी रवाना झालेले जे सैन्य घाटमाथ्यावर पोचले होते तेही आपला तळ उठवून पुण्यास चालते झाले. व यामुळे सासष्टी (साष्टी) महाल भयापासून मुक्त झाला.

पृ. २७, प. १९
इ. १७५२ फेब्रुवारी ९ } १६ { श. १६७३ माघ वद्य १०
इ. १७५२ जानेवारी २९

गोंवा व्हाइसरॉय > पोर्तुगालचा बादशाह

महाराज, हें गलबत सोडण्याच्या क्षणी अखेरचें पत्र लिहीत असताना १६ सप्टेंबर १७५१ या दिवशी औरंगाबादचा नबाब सालारजंग यास व फ्रेंचांचा सेनापती बुसी यास लिहिलेल्या पत्रांची उत्तरे आली. त्यांच्या नकला महाराजांच्या माहितीसाठी पाठविल्या आहेत. हे गलबत राजधानीत पाठवू नये असे त्या पत्रातील माहिती वरून वाटलें. हे व इतर जी काही या राज्यांत आहेत ती घेऊन ताबडतोब उत्तरेकडे निघावे असेही वाटले. परंतु, अशा महत्त्वाच्या प्रश्नावर अधिकाराने मत देतील अशांचा सल्ला घ्यावा असे योजून त्यांस माझ्या कचेरीत बोलावून घेतले. त्या सर्वांनी हीच उत्तम संधि आहे असे जाणून आपली मान्यता दिली. पण दारूगोळ्याच्या पुरवठ्याची कमतरता भासून त्याचा शोध दक्षिण बाजूस चालविला आहे. थोडक्याच कालावधीत वायव्य दिशेचा वारा त्या किनाऱ्यावर महाराजांचे साम्राज्य पसरविणार आणि मोगल गलबताच्या वाहतुकीस अडथळे आणणार. चढण्या-उतरण्यास अवश्यक असलेल्या 'सिबाड', 'पांडागी' वगैरे लहानलहान नावा तर निरुपयोगीच ठरतील. आमच्याकडे थोडयाच 'मांचुअस' आहेत. त्याच महत्प्रयासाने या हल्ल्यांत विजय आणू शकतील. पण या प्रकरणात मला भीति वाटते ती ही कीं, पावसाळा सुरू झाला आणि नबाब व मराठे यांच्यामध्ये तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या तर मोठमोठ्या रकमांच्या आशेने नबाब रेंगाळत राहील. म्हणून मी धान्यसाठा जमविण्यासाठी चौकशी करूं लागलों. तेव्हा आढळून आले की, आमच्याजवळ १९ हजारापेक्षा जास्तीच तांदुळाचें मुडे आहेत. ते फक्त आरमाराकरिता पुरे आहेत. पाडांगी गलबताचा शोध केला तेव्हा दोनहून अधिक मिळाली नाहीत. उल्लेखीत अडचणी निवारण करू शकत नसल्याने मी फार काळजीत आहे.

बुसीच्या उपरोक्त पत्रावरून समजतें कीं, त्याचें हें उत्तर बऱ्याच उशिरानें लिहिलें जात असल्याचे त्यालाही वाटतें. तसेंच, नबाबाची हरकत नाहीं असें समजल्याविना आमच्या मधील एकीकरणास बळकटी येणार नाही. म्हणून कराराविषयीं संशय घेण्यास मला कारणे आहेत असेंही त्याला वाटतें. आम्हांमध्ये फुटीरपणा येऊ नये म्हणून जें काय करावयास पाहिजें तें मी करीन. सिद्धी याकूतखान याच्या राज्यांत न जाण्यासंबंधीही मी व्यवस्था करीन. नबाबाशी पत्रव्यवहार ठेवावयाला त्याचा मला फार उपयोग झाला हें त्या संबंधीची पत्रें नकला करून तुम्हांकडे रवाना करीत आहे. त्यावरून दिसून येईल. मानुसल हा फिगेहरेह या

(जेझुईत) सोसायटीतील पाद्रीला रवाना करण्याची मी व्यवस्था करितो. तो हुशार व चांगला प्रसारक आहे. हा धर्माधिकारी समजुतदार असून त्याला मोंगलांच्या भाषेचें उत्तम ज्ञान आहे. कारण, तो बरीच वर्षे त्यांच्या राजधानींत राहत होता. जर माझ्या प्रयत्नांनीं पुढील पावसाळ्यापर्यंत (नबाब व मराठे यांमध्यें) तह घडून आला नाहीं तर, त्या मोसमांत मला मिळेल त्या सामुग्रीच्या जोरावर मी ही बेटें (गोवा बेट) व प्रांत यांचे रक्षण करीत. जितके सैन्य आहे तितकें घेऊन उत्तरेकडे (वसईकडे) जाऊन जे काय आम्ही घालविलें आहे तें देवकृपा झाली तर परत मिळवीन. तोच देव सदोदित आमचा रक्षणकर्ता आहे. माझ्या मागून येणाऱ्यांनाही वरचेवर मदत पाठवीत असावे हीच महाराजांपाशी विनवणी आहे, मोंगलांचे सहाय्य मिळविणें हे आमच्या हिताचे आहे असें मी मानतों. इतर मानीत नाहींत. असें नाही. ही मैत्री वाढविण्यास व टिकविण्यास फ्रेंचांनाही कांही बक्षिसा दाखल देणे भाग आहे. हे जाणून मी त्याप्रमाणें वागतो व तें सर्व महाराजांची कामगिरी योग्यप्रकारें पार पाडावी म्हणून.

---

२. चाकणचे ब्रह्मे व शिवाजीस राज्याधिकार

(श्री. ग. ह. खरे)

१) सुमारें पांच महिन्यांपूर्वी कै. य. रा. गुप्ते यांचे चिरंजीव श्री. गोपीनाथ यशवंत गुप्ते यांनीं मंडळाकडे जुन्या कागदपत्रांचीं तीन पुडकीं आणून दिलीं व सांगितलें कीं, आमच्या वडिलांनीं हे कागद जमविले होते. यांत तुमच्या उपयोगी कांहीं असल्यास पहावें. तीं पुडकीं सोडून पाहातां त्यांत (१) चाकण–ब्रह्मे (२)बेलसर–गरुड (३)मिरज–देसाई (४) न्हावी–शितोळे (५) चिटणीस इत्यादी घराण्यांचे शिवकालापासून ते आजतागायतचे कागद आढळले. यांत चाकणच्या ब्रह्मयांचे ६७ कागद आहेत; पैकीं ३ येथें प्रसिद्ध करीत आहे.

२) यांतील पहिला कागद ताराबाईचा मुलगा शिवाजी याची राज शक ३२ (श. १६२७, इ. १७०६) मध्यें कचेश्वर बिन सिद्धेश्वर ब्रह्मे याजकडील इनाम चालविण्याबद्दलची आज्ञा आहे. या शिवाजीचीं पत्रें थोडीं मिळतात म्हणून तें येथें दिलें आहे. २ व ३ क्रमांकांचीं पत्रें एका निराळ्या कारणासाठीं महत्वाचीं

असल्यानें येथें दिलीं आहेत. मावजी व पारसनीस यांनीं संपादिलेल्या 'सनदापत्रांतील माहिती' या पुस्तकांत ११३ व्या पृष्ठावर 'सिद्धेश्वरभट बिन मेघनाथ भट यास मिळालेली सनद' या मथळचाखालीं शिवाजी महाराजांनीं दिलेली एक सनद छापली आहे. या सनदेचा प्रस्तुत दोन कागदांशीं संबंध आहे. तो नीट समजावा म्हणून ती सनद येथें देतों.

"श्रीसकल तीर्थस्वरूप वेदमूर्ति राजश्री सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट ब्रह्मे उपाध्ये, परगणे चाकण स्वामी गोसावी यांसी —

आज्ञाधारक राजेश्री शिवाजीराजे बिन शहाजीराजे भोंसले साष्टांग दंडवत, सुरू [शिक्का*] सन अर्बा खमसैन अलफ, पत्र लेहून दिधलें ऐसी जें. स्वामींच्या अनुष्ठानबळें आपण राज्यास अधिकारी जालों व सकळ मनोरथ चिंतिले पावलों, ऐसा अनुभव आला म्हणून व संकटकाळीं साहाकारी जाणोन, पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें स्वामींस वर्षासन होन पातशाई १०० शंभरी केले असेत. सदरहू वर्षासन यावत्काळ पर्यंत आपले राज्य तावत् काळपर्यंत चालऊन. यासी अन्यथा करूं अथवा पुढें कोणी आपले वंशपरंपरेचा होऊन अन्यथा करील, त्यास श्रीजीची व कुलस्वामीची व आपल्या पूर्वजांची व गोब्राह्मणांची आण असे. यावेगळे स्वर्ग देवतेच्या पूजनास श्रीनवचंडीमध्यें जपतपहवनास व ब्राह्मणभोजनास जें लागेल त्याची आज्ञा करीत जाणे. आज्ञेप्रमाणें प्राप्त करीत जाऊन राज्य स्वामीच्या प्रसादाचें आहे. आपण आज्ञाधारक असों. जाणिजें, रसानगी छ १ माहे रमजान मोर्तब केलें असे." रुजू सुरुनिवीस.

३) हिचा आरंभ, शिवाजीचें नांव सांगण्याची पद्धत आणि दोन तीन ठिकाणीं आलेली—विशेषत: स्वामींच्या अनुष्ठानबळें राज्यास अधिकारी जालों व सकळ मनोरथ चिंतिले पावलों......स्वर्ग देवतेचें पूजन, इत्यादि शब्दयोजना अशी आहे कीं, या पत्राचा सावधगिरीनें उपयोग करण्याची प्रवृत्ति होती. पण येथील दुसऱ्या पत्रांत वर दिलेल्या सनदेचा, तिचा काल व विषय यांसह निर्देश असून खर्ग (स्वर्ग ?) देवताप्रसादही उल्लिखित आहे आणि तिसऱ्या पत्रांत उपर्युक्त शब्दप्रयोग जसेच्या तसे उध्दृत केले आहेत. येवढेंच नव्हे तर या सनदेंतील कालाचा निर्देश जसाच्या तसा या तिसऱ्या पत्रांत आला आहे. या पत्रावर भैरव मोरेश्वर मुख्य प्रधान व गदाधर प्रल्हाद प्रतिनिधी यांचे शिक्के असून शिवाय शेवटीं व जोडावर अशीं दोन मोर्तबें आहेत. पहिलें पत्र व दुसरें यांवर शेवटीं मोर्तब आहेत. यामुळें हीं तीन पत्रें तर खरीं ठरतातच; पण यामुळें सनदापत्रांतील पत्र अप्रामाणिक असण्याची शक्यताच उरत नाही. मग त्या पत्रांतील आरंभ, शिवाजीचें नांव सांगण्याची पद्धत व इतर बाबी कशाही असोत. सनदापत्रांतील सनदेंतील स्वामींच्या इत्यादि

शब्दयोजना चिंत्य आहे. शहाजी त्याच्या प्रसिद्ध कैदेंतून सुटल्यावर आपल्या जागीरीच्या वाटणीच्या विचारास लागला असावा. त्यांत त्याची मनस्थिती ही नीराभीमासीमित जागीर थोरला मुलगा संभाजी यास द्यावी कीं धाकटा मुलगा शिवाजी यास द्यावी अशी दोलायमान झाली असावी. शिवाजीस या जागीरीविषयीं विशेष आपुलकी असल्यामुळें ती स्वतःस मिळावी यासाठीं अनुष्ठानासारखा दैवी उपाय झाला असावा. चिंतिले मनोरथ पावल्यामुळें ब्रह्मयाची वार्षिक शंभर होनांच्या देणगीनें संभावना झाली असावी. खर्ग (स्वर्ग ?) देवतापूजनप्रसाद म्हणजे नेमकें काय हें आज तरी ध्यानांत येत नाहीं. खड्ग ही देवता मानून तिचें पूजन व प्रसाद घेणें असा कांहीं प्रकार असेल कां ? तुळजापूरची भवानी देवी शिवाजीच्या तलवारींत जाऊन बसली होती असें परमानंदानें शिवभारतांत अफजलखानप्रसंगीं नमूद केलें आहेच. असो. तीं तीन पत्रें अशीं–

ले. १, रा. श. ३२, पार्थिव, माघ वद्य २ मंद.	श्री	श. १६२७ माघ वद्य २. इ. १७०६ फेब्रुवारी १९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३२ पार्थिवनाम संवत्सरे माघ बहुल द्वितीया मंदवासरे क्षत्रियेकुलावतंस श्री राजा सिव छत्रपति याणि राजमान्य राजेश्री दामाजी नारायण नामजाद व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रांत जुनर यासि आज्ञा केली यैसि जे वेदमूर्ती राजश्री कचेश्वरभट बिन सिधेश्वरभट ब्रह्मे उपाध्ये प्रा चाकण यांणि स्वामीसंनीध येऊन विनंती केली कीं मौजे सिरोली प्रांत मजकूर येथें आपल्यास इनाम भूमी दांगट थलपैकीं बिघे ।· तीस आहेत. घैसियासि माहाराज धर्मपरायेण आहेत आपले पत्र देऊन सुरलीत इनाम सेत चाले पैसें केलें पाहिजे म्हणऊन विनंती केली त्यावरून मनासी आणिता वेदमूर्ती बहूत थोर पूर्वापर आपले आश्रीत सत्पात्र तपस्वी जाणऊन व पूर्वापर आपले आश्रीत सत्पात्र तपस्वी जाणऊन व पूर्व पत्रें अवलोकून सदरहू इनाम सेत दांगट थलपैकीं पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवावयाची आज्ञा केली असे तरी तुम्ही कुल बाब कुल कानू भटगोसावी याचा इनाम उतरोतर राजाभिवृधीकारणे चालवणे साल दर साल ताजा सनदेचा उजूर न करणे या पत्राची प्रती लिहुन घेऊन असल पत्र भोगवटियास भट गोसावी यांजवली परतोन देणें जाणिजे [नि*] बहुत काये लिहिणें मर्या। देयं विरा। जते [असा मोर्तब*]

बार सुरू सूद बार

ले. २, रा. श. ३४. सर्वजित, मार्ग. शुद्ध २, मंद.	**श्रीभवानी शंकर**	श. १६२९ मार्गशीर्ष शुद्ध २ इ. १७०७ नोव्हेंबर १५

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके ३४ सर्वजित नाम संवत्सरे मार्गसीर्ष शुद्ध द्वितीया मंदवार क्षत्रियेकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामि याणि राजश्री देशाधिकारी व देशलेखक वर्तमान भावी प्रांत जुनर यांसि आज्ञा केली यैसी जे वेदमूर्ती राजश्री कचेश्वर भट बिन सिधेश्वरभट शा मेगनाथभट ब्रह्मे उपाध्ये प्रांत चाकण हे ब्रह्मे पूर्वापर आपले घरीचे बहुत योग्य स्नानसंध्याकर्मानुष्ठानसंपन्न यांणीं कसबे खेड भीमातीर येथले मुकामी प्रथमता स्वामींच्या दर्शनास येऊन **स्वर्गदेवताप्रसाद** व राज्यप्राप्तीचा आसीर्वाद प्रतिज्ञापूर्वक देऊन विदीत केले कीं, आपले तीर्थरूप वेदमूर्ती राजश्री सिधेश्वरभट याणीं महाराष्ट्र राज्यास अभीष्ट चिंतून सत्कर्मे आचरोन कालक्षेप करीत असेत त्यांचा योगक्षेम चालिला पाहिजे म्हणून तुमचे आजे राजश्री [मो. जा.*] थोरले माहाराज कैलासवासी याणी प्रतिवर्षी वर्षासन होन पातशाही १०० शंभरी करून दिल्हे आहेत त्याप्रमाणें आपणही चालविले पाहिजेत म्हणऊन विदीत केलें त्यावरून वेदमूर्तीजवळी पूर्वीचीं **वर्षासनपत्रें सुहूर सन आर्बा खमसैन अलफ सालीची आहेती** ते वजिनस आणून पाहोन याणी जे जे आसीर्वाद दिल्हे ते ते फलासी आले म्हणोन यांसी वर्षाशन केले होनू पा।२२५ सवा दोनिसें बि॥

पुरातन पत्राप्रमाणें होन	नूतन साल भापासून होन
पा १००	१२५ पा

येकून पातशाही सवा दोनिसें रास याचे पुत्रपौत्रादि वंषपरंपरेनें चालवावयाचा निश्चये करून तुम्हास आज्ञापत्र सादर केले आहे तर सदरहू वर्षासन प्रांत मजकूरच्या पोतापैकीं आधी प्रविष्ट करून पावल्याचें उतर घेत जाणें वेदमूर्ती सुखरूप स्नानसंध्या अनुष्ठान करून पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने वर्षासन भक्षून राज्याच्या परंपरेचे उतरोतर अभीष्ट चिंतीत यैसें करणें यांसि पुढें आपल्या वंषपरंपरेचे होतील त्याणीं वेदमूर्तीचे वर्षासन राज्याभिवृद्धिकारणे चालवावे जो लिहिल्याप्रमाणें न चालवी त्यास श्री–जीची व आपल्या कुलस्वामिची व पूर्वजाची व गोब्राम्हणाची शफथ असे यैशा शपथा जाणऊन पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने वेदमूर्तीचा प्रतिवर्षी परामर्ष करून होन पा सवा दोनिसें अधी आधी पाववीत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे प्रती लेहून घेऊन आसल पत्र वेदमूर्ती यांसी देणे जाणिजे रा छ, १ रमजान सुहूर सन समान मथा अलफ मर्या। देयं रा जते [असा मोर्तब *]

ले. ३, रा. श. ३६.
विरोधी, श्रावण शुद्ध १५, भौम. } श्री { श. १६३१ श्रावण शुद्ध १५
इ. १७०९ ऑगस्ट ९

[चवथ्या व पाचव्या ओळींच्या डाव्या अंगास भैरव मोरेश्वर व गदाधर प्रल्हाद यांचे अनुक्रमें लंबवर्तुळी व अष्टकोनी शिक्के *]

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३६ विरोधी नाम संवछर स्रावण शुध पौर्णिमा भोमवासरे क्षेत्रियेकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामि याणी राजश्री दामाजी नारायेण नामजाद व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत जुनर यांसि आज्ञा केली यैसी जे वेदमूर्ती राजेश्री ककेश्वरभट बिन सिधेश्वरभट उपनाम ब्रम्हे उपाधे पा चाकण येही पेसजी स्वामि मोगलाईतून येउनू कसबा खेड प्रांत मजकूर येथे मुकाम केला होता ते समई स्वामिसनिध येउनू दर्शन घेउनू विदीत केले जे आपले पिते वेदमूर्ती सिधेस्वरभट बिन मेगनाथभट यांसि राजेश्री [मो. जा.*] थोरले कैलासवासी स्वांमीनी वर्षासन होन पादशाही १०० येकसे करून प्रांत मजकूरपैकी प्रतिवर्षी पावत करावयाची अज्ञा केली होती त्याप्रमाणे प्रतिवर्षी पावत होते साप्रत धामधुमीमुले पावत नाही यैसेयास हाली माहाराज आपल्या राज्यास आले आहेत आपले आश्रीवादे सर्व मनोरथ सिधीस पावजतील हा निस्चये मानून आपले वर्षासन जे पूर्वी माहाराजाचे वडिली दिल्हे आहे तें व नूतन आपले योगक्षेम सांगतेबदल जाजती करून देउनू चालविले पाहिजे म्हणउनू त्यावरून मनास आणितां भट गोसावी भले सत्पात्र स्नानसंध्यादि कर्मानुष्ठान संपन व पूर्वी यांचे पिते यांसि माहाराज राजेश्री [मो. जा.*] थोरले कैलासवासी स्वामि यांही वर्षासनपत्र करून दिल्हे आणि प्रांत मजकूर यांस आज्ञापत्र दिल्हे ते पत्री लेखनार्थ जे वेदमूर्ती सिधेस्वरभट बिन मेगनाथभट ब्रम्हे उपाधे पा चाकण हे ब्राह्मण पूर्वापार आपले आश्रीत बहूत योग्य स्नानसंध्यादि कर्मानुस्ठानसंपन यांच्या अनुष्ठानबळें आपण राज्यास अधिकारी जालो व सकल मनोरथ चिंतिले पावलो यैसा अनुभव आला म्हणोन व संकटकाळीं साहाकारी जाणौन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने यांसि वर्षासन होन पादशाही १०० येकसें केले असेत सररहू वर्षासन प्रांत मजकूरच्या पोतापैकीं आधी प्रविष्ट वरून पावलियाचे उतर घेत जाणे वेदमूर्ती सुखरूप स्नानसंध्या अनुष्ठान करून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वर्षासन भक्षून राज्याच्या परंपरेचे उर्जीत उतरोतर चिंतीत यैसे करणे यासि पुढें आपल्या वंशपरंपरेचे जे होतील त्याणी वेदमूर्तीच्या वंशपरंपरेचे वर्षासन राज्याभिवृधीकारणे चालवावे जा (जो) लिहिल्याप्रमाणे न चालवी त्यासि श्री––जीची व कुलस्वामीची व आपल्या पूर्वजांची व गोब्राम्हणाची शफत असे यैशा शफथा जाणोन पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने प्रतिवर्षी वेदमूर्तीचा परामर्ष करून पाववीत जाणें यैसे पत्र छ १ रमजान सुहूर सन आर्बा खमसैन अलफचे आहे ते पत्र अविलोकन केले व त्यांचे पुत्र हे कचेश्वरभट ब्रह्मे उपाधे पा चाकण बहूत योग्य अनुष्ठाते येही कितेक आश्रीवाद दिल्हे ते

समई यांची योग्यता पाहून यांचे चालविलेने राज्याचे कल्याण आहे यैसे जाणून कदीम वर्षासन होन पा १०० व नूतन जाजती होन पा १२५ येकून होन पा सवादोनसे वर्षासन करून दिल्हे त्यावरी स्वामि स्वराज्यास आलेवरी हाली किले वंदनचे मुकामी भट गोसावी दर्शनास येउनू वर्षासनपत्राचा प्रसंग केला त्यावरून स्वामिनी मनास आणून भट गोसावी बहूत योग्य व खेडचे मुकामी स्वामिस जे आश्रीवाद दिल्हे ते सफल जाहाले यैसे जाणौनू सदरहू सवादोनसे होनू वर्षासन करून दिल्हे होते तेणेप्रमाणे करार करून वर्षासनपत्र करून देउनू प्रतिवर्षी पावत करावे याविसी तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले असे होन पादशाही २२५॥.

कदीम वर्षासन माहाराज राजेश्री [मो. जा.*] थोरले कैलासवासी स्वामिनी यांच्या पित्यास करून दिल्हे होते तेणेप्रमाणे होन पादशाही १००	नूतन जाजती भट गोसावी यांचा योगक्षेम सांगते-बदल वर्षासन करून दिल्हे होन पादशाही १२५

येकून सवादोनसे होन पादशाही भटगोसावी यांसि पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने वर्षासन करून दिल्हे असे प्रांत मजकूरचे पोतापैकी प्रतिवर्षी वेदमूर्तीचा परामर्ष करून प्रविष्ट करीत जाणें आणि पावलेंचे उतर घेणे या पत्राची प्रती लेहुन घेउनू मुख्य पत्र वेदमूर्तीजवल देणे [नि *] लेखनालंकार [क्र. २ प्रो मोर्तब*] रुजू

रा छ १४ रमजान

बार सुरू सूद बार पौ छ ९ रजबू

[जोडावर लेखन / सीमा समु / ल्लसदि असा लंबवर्तुळी मोर्तब*]

३. दिल्ली दरबारचें पानिपतपूर्व बातमीपत्र

(डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी)

१) दिल्ली दरबारचीं पानिपतपूर्व बातमीपत्रें यापूर्वीं ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ५ भाग १ व त्यांचें भाषांतर भाग २ मध्यें प्रसिद्ध झालीं आहेत. तशाच प्रकारचें एक बातमीपत्र मला पेशवे दप्तरांत मिळालें. हें बातमीपत्र उपर्युक्त पुस्तकांत आलेलें नाहीं. याचें महत्त्व म्हणजे या पत्रांत उत्तरेकडील राजकीय व लश्करी हालचालीसंबंधीं माहिती अत्यंत बारकाईनें दिली गेली आहे. त्याचबरोबर तिकडील भौगोलीक माहिती, गावांचीं नावें, नद्यांचीं नावें, डोंगर, पठार तसेच निरनिराळ्या गांवांमध्यें असणारें अंतर, प्रमुख व्यक्तींचीं नावें व त्यांचे आपसांतील संबंध,

निरनिराळ्या व्यक्तींकडे असणारे स्वार व प्यादे यांची संख्या, त्यांचे प्रकार, उंट–घोडेस्वार, बंदूकधारी, तोफधारी इ. दिलें आहे. याशिवाय निरनिराळ्या प्रांतांतील राजकीय प्रश्न व अर्थव्यवस्था आणि त्यासंबंधीं उलाढाली, तसेंच राज्यकारभाराची योग्य ती घडी मराठ्यांनीं बसवून देणें व त्यासंबंधीं घेतलेल्या वसुलाच्या रकमांचे नेमके आकडे, व्यक्तींच्या हालचाली व त्या पाठीमागें असलेले त्यांचे उद्देश इ. संबंधीं अत्यंत काटेकोरपणें माहिती सापडते. तसेंच कांहीं घटना घडत असतांना, संबद्ध व्यक्तींवर होणाऱ्या प्रतिक्रियाचें दिग्दर्शनही या बातमीपत्रांत मिळतें. पानिपतपूर्व घडलेला इतिहास समजून घेण्यास सदर बातमीपत्रांतील माहिती आवश्यक व उपयुक्त आहे हें निर्विवाद आहे

२) प्रस्तुत बातमीपत्राचे एकूण चार बंद आहेत व या सर्व बंदांतील सर्व मजकूर उपलब्ध आहे. त्यामुळें लिहून पाठविलेल्या माहितींत खंड पडलेला दिसत नाहीं. प्रसिद्ध झालेलें यापूर्वीचें बातमीपत्र हें २० डिसेंबर १७५८ चें आहे. त्यांत दिलेल्या घटनांच्या तपशीलांत अंताजी माणकेश्वरानें वजीरुलमुल्काकडून दादासाहेबांच्या तलबेबद्दल ६५ लाख रुपये घेतले, इतर वसुलाविषयीं अंताजीनें वजीराकडे तगादा लावला तेव्हां त्यानें अंताजीकडे महदी कुलीखान, राजा नागरमल वगैरेंना पाठवून यासंबंधीं बोलणीं केलीं व शेवटीं बंगालच्या सुभ्यांतून ४ लक्ष रुपये, दोआबांतून १७ लक्ष रुपये, तसेंच लाहोरच्या सुभ्यातून २१ लक्ष रुपये देण्याचा बेत केला. याशिवाय, मलिका झमानी बेगम, मुघलानी बेगम, सुरजमल जाट, शाहझादा वाला गुहर इत्यादींच्या हालचालींच्या बातम्या दिल्या आहेत. प्रस्तुत बातमीपत्राचें सूत्रदेखील वरील प्रमाणेंच आहे. याचा काल मुघल बादशाह दुसऱ्या आलमगीरचा जुलूस ५ जखर ४ (इ. १७५९ फेब्रुवारी ३) हा आहे. यांत दिलेला तपशील पाहिल्यावर पानिपतपूर्व राजकीय घटनांचा ओघ कसा वहात होता हें समजण्यास मदत होते. त्यांतील ठळक घटना खालीं देत आहे.

जु. ५ जवल १९ (इ. १७५९ जानेवारी १९) : अंताजी माणकेश्वर व राव पुरुषोत्तम पंडित हे राजा दिलेरसिंगासह दक्षिणेंतील सरदारांच्या जाबसालासाठीं नवाब वजीरुलमुल्कापाशीं मौजे बुराडी येथें आहेत.

जवल २१ (जानेवारी २१) : मुइझ्झुद्दौला व राव जनकोजी वजीरुलमुल्काकडे गेले.

जवल २२ (जानेवारी २२) : वजीरुलमुल्कानें तीन मोठ्या तोफा आणण्यासाठीं दिलेरसिंग, खोजा जौहर व सालिमखान वगैरेंना नेमलें. पेंढाऱ्यांची व नबाबाच्या फौजेची छोटी लढाई झाली. २००-३०० पेंढारी व ३०० अफगाण मारले गेले. शाहझादा वाला गुहर माणिकपुरास पोहचला.

जवल २३ (जानेवारी २३) : जशपुऱ्यांतील मुघलांची कत्तल लुटारूंनीं करून

त्यांची मुंडकी वजीरुलमुल्काकडे पाठविलीं नवाब वजीरुल्मुल्काच्या जहागिरीचें प्रांत दक्षिणी सरदारांनीं लुटले.

जवल २४ (जानेवारी २४) : सुरजमल जाट व रूपराम कटारा यांनीं चार लक्ष रुपये सरदारांना दिले.

कंधार येथील अब्दुर्रहीमखान अफगान यानें सरदारांची भेट घेऊन ' सुभे काबूलपर्यंतचा बंदोबस्त करण्याचें अभिवचन दिलें.'

मलिका जमानी बेगम ही जम्मूच्या राजाकडे रहात आहे.

जवल २९ (जानेवारी २९) : जनकोजी शिंद्यानें आपल्या फौजेस शाहदऱ्याची लूट करण्याच्या तयारींत असण्याबद्दल सांगितलें.

नवाब वजिरानें अंताजीकडे समेटाचीं बोलणीं करण्यास सुरवात केली.

जखर ५ (फेब्रुवारी ४) : जनकोजी शिंदे व इतर सरदारांनीं शेरजंग बाग व वजिराबादेच्या घाटावरून कूच केलें. मौजे बुराडी येथें मुक्काम केला. तेथून पुढें नरेलाचा घाट चढून जाण्याचा त्यांचा इरादा आहे. मुइझ्झुद्दीला व अब्दुलखान यांचे नावे काश्मीरची सुभेदारी देण्यात आली आहे. नजीब खान रोहिल्याचे वकिल जनकोजीकडे जाबसालासाठी आले होते.

---

२ रा आलमगीरी जु. ५ जरवर ४ } { श. १६८० माघ शुद्ध ७ इ. १७५९ फेब्रुवारी ४

अखबारात दरबार–इ–वाला. श्रीमंतांचें कुशल असो. यापूर्वीची बातमी म्हणजे फर्रुखनगरचा मुसाखान बलोच याच्या मुकद्दम्याचा निकाल, विजयी सरदारांचें शाहजहानाबाद येथें आगमन, त्यांचा ५ कोसावर बुराडी येथें मुक्काम, तसेंच यमुना नदीच्या या तीरावर असलेल्या खेड्यांची केलेली नासधूस (येथून २० कोसांवर सोनीपत आहे), तेथपर्यन्त फौजांनीं केलेले अत्याचार, जु. ५ जवल, ५ (५ जाने-१७५९) रोजीं नारोजी शंकर, साहेबजी पटेल व राजा बापू पंडिताचा भाऊ राव पुरुषोत्तम पंडित यांचें शहरांत आगमन, त्यांनीं नवाब वजीरुल–ममालिक बहादुर याची भेट घेऊन कौलकरार घडवून आणला. चालू महिन्याच्या ७ (जवल ७, जानेवारी ७) तारखेस उपर्युक्त नवाबानें लश्करांत येऊन सरदारांची भेट घेणें, नवाब साहेबाचें जनकोजी पटेल व दत्ताजी शिंदे यांवर नाखूश होऊन सरदारांच्या लश्करांतून परतणें, त्यानंतर राजा नागरमल याचें सरदारांकडे मुकद्दम्यांच्या निकालासाठीं जाणें, मुकद्दम्यांचा निर्णय आणि लाहोर, कंधार व राजपुतान्याच्या जिल्ह्यांची हकीकत, तसेंच शाहजादा वाला गुहर याची व इतर हकीकत यांचे कागद कासिदांच्या

जोड्यांबरोबर ता. १५ जवल सन ५ (१५ जाने. १७५९) या तारखेस हुजूर पाठविले आहेत. ते आपल्या नजरेखालून गेले असतीलच.

त्यानंतरची बातमी अशी : राजा अंताजी पंडित माणकेश्वर, राव पुरुषोत्तम पंडित हे राजा दिलेरसिंगासह दक्षिणेंतील सरदारांच्या जाबसालासाठीं नबाब वजीरुल-ममालिक बहादुर यांपाशीं आहेत. अजून सांगण्यांत येत आहे कीं, निर्णय झाला नाहीं. नबाब वजीर बहादुर हे आपल्या लोकांशीं सल्लामसलत करून उपर्युक्त सरदारांना उत्तर देत आहेत. इकडील खजिन्याबद्दल आपणांस माहिती आहेच. नजीबखान रोहिला व नवाब शुजाउद्दौला यांच्या तनख्याची रक्कम ही खालिसा शरीफाच्या महालांतून व सुभे लाहोर येथून देण्यांत यावी असा सल्ला मान्य करावा असें सांगण्यांत येत आहे. परंतु सरदारांनीं हा सल्ला मान्य केला नाहीं. त्यांमध्यें जाबसाल व शब्दांची कमी अधिक प्रमाणांत देवाण–घेवाण चालू आहे.

दोन्ही बाजूंचा जावसाल झाला. ता. १९ जवल सन ५ (१९ जाने.) रोजीं बुराडी येथून अलीकडे कूच केलें. यमुना नदीच्या या तीरावर असलेल्या वजीराबादेच्या घाटापासून नबाब शेरजंगाच्या बागेपर्यंत व शहराजवळ असलेल्या मुहम्मदखान बगंश याच्या हवेलीपर्यंत आले. विजयी फौजांच्या बाजूस कांहीं रेहकले उभे केले होते ते सोडून दिले. उपर्युक्त हवेलीजवळ लश्कर आल्यामुळें मोर्चे पाठीमागें घेतले. कुदसिया बागेंत मोर्चे उभे केले. विजयी फौजेनें कूच केलें त्या दिवशीं सआदतखानाच्या बरोबर असलेल्या रोहिल्यांनीं बादलपुरा व जसवंतपुरा वगैरे येथें असलेल्या लोकांना लुटलें, त्यांचीं घरें पाडलीं व खूप नासधूस केली. नबाबसाहेबांनीं आपल्या लोकांना मोर्च्यावरील लोकांवर पाठविलें व ठिकठिकाणीं कैद केलें. तसेंच मराठ्यांपैकीं जे कोणी गावांत येतील त्यांना लुटावें असें फर्माविलें. त्याप्रमाणें शाहगंज येथें लश्करांतील व्यापारी धान्याची खरेदी करण्यासाठीं आले होते. त्यांना त्यांचा माल व त्यांचें बैल यांसह लुटलें. लश्करांतील कारभारी लोकांना –जे गावामध्यें कापड व भांडी खरेदीसाठीं आले होते त्यांना शहराच्या दरवाजावर कैद करण्यात आलें.

खालसाचा दिवाण मुइझ्झुद्दौला अब्दुलअहदखान याबद्दल राव मल्हारजी यानें वजिरुल्मुल्काकडे प्रशस्ती केल्यामुळें नबाब वजीर अत्यंत रुष्ट झाले. तसेंच राजा नागरमल याशींही त्यांचें अत्यंत वैमनस्य आहे. म्हणून उपर्युक्त दिवाणाकडून २ लक्ष रुपये मिळण्याबद्दल निरोप पाठविला. दक्षिणच्या सरदारांनीं ते देण्यास विरोध केला (मनाई केली). खान मजकूर सांगत आहे कीं, राजा नागरमल यानें खालिसा शरीफाची नासधूस केली असून तेथील खजिन्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. तेव्हां राजा मजकुराकडून पैसे कां मागत नाहींत? तेव्हां नाइलाजानें ता. २० जवल (जानेवारी २०)च्या संध्याकाळीं खान मजकूर आपल्या

लोकांसह व आवश्यक सामानासह रात्रीच्या वेळीं स्वतःच्या हवेलींतून बाहेर येऊन दरवाजाबाहेर पडला. त्याची हवेली नवीन शहराच्या काश्मिरी दरवाजाच्या आंत आहे. तो लष्करांत गेला व त्यानें राव जनकोजी शिंदे व इतर सरदार यांची भेट घेतली. राव जनकोजीनें त्यास ठेवून घेतलें.

खान मुइझ्झुद्दौलाच्या पलायनाची बातमी नवाब वजीरुल्मुल्कास समजल्या-नंतर त्यानें खान मजकुराच्या देवडीवरील खबर आणण्यासाठीं नेमलेल्या हरकाऱ्यांना कैदेंत टाकलें व दरवाजावर असलेल्या लोकांवर अत्यंत नाराजी व्यक्त केली. खान मजकुराच्या डेऱ्यावर चौकी बसविली व त्याच्या घरांतील चीजवस्तू जप्त केली. ता. २१ जवल (२१ जाने.) ला नवाब मजकूर व राव जनकोजी हे नवाब वझीरु-ल्मुल्कापाशीं पोहोचले व त्यांनीं सांगितलें कीं, खानाच्या घरावरील चौकी उठवावी. खोजा मुहब्वत याच्या लोकांनीं मुइझ्झुद्दौलाच्या घरांतून जवळजवळ १ लक्ष २५ हजार अश्रफ्या नेल्या त्या पाठवून द्याव्या, तसेंच खान मजकुराचे लोक स्वयंपाकाची भांडीं व तंबूचें सामान आणण्यासाठीं हवेलींत जातील त्यांना अडथळा आणूं नये. उपर्युक्त नवाबानें राव मजकुरानें सांगितल्याप्रमाणें खान मुइझ्झुद्दौलाच्या घरावरील चौकी उठविली व ताकीद केली कीं, तंबू वगैरे सामान नेण्यासाठीं येतील त्यांना अडथळा करूं नये. खोजा मुहब्बतास बोलावून फर्माविलें कीं जें सामानसुमान उपर्युक्ताच्या घरांतून ताब्यांत घेतलें आहे तें परत करावें. परंतु खोजा मजकुरानें त्यास विरोध केला (नकार दिला).

नवाब वजीरुल्मुल्क सरकारच्या कटक, शेरदहान व गारतजान ह्या ३ मोठ्या तोफांच्या तयारीस लागले; कारण यांवरच दक्षिणच्या सरदारांकडील जाबसाल अवलंबून होता. त्यांच्या पत्रानंतरच सरदारांच्या फौजांवर तोफा रोखल्या जाणार. चालू महिन्याच्या २२ तारखेस (२२ जाने.) जयसिंगराय नांवाचा बक्षी दोस्तजंग म्हणजे दिलेरसिंग व खोजा जौहर व सालिमखान बक्षी व महदी कुलीखान काश्मिरी व नवाब वजीरुल्मुल्काचा मुशीर यांना उपर्युक्त तोफा आणण्यासाठीं नेमण्यांत आलें. त्यांना नबाबसाहेबांनीं ताकीद दिली कीं सरदारांची फौज तोफखान्यावर लक्ष ठेवून असेल तर तोफा जाऊं देऊं नयेत. त्यांशीं लढाई करावी. नंतर तुमच्यावर इतर कृपा करण्यांत येईल.

यापूर्वींच सरदारांचे कांहीं लोक उपर्युक्त शहरांत बाजारासाठीं गेले होते. तेव्हां नवाबाच्या फौजेनें त्यांचे बैल व वस्तु यांचा नाश करून अनेक घोडे, कवचें व कार-भाऱ्यांचे दागिने लुटले. २२ ता. स (पेंढाऱ्यांच्या) जमातीस (सावधानतेचा) इशारा देण्यांत आला व त्यांच्या मदतीसाठीं फौज देण्यांत आली. बाजारांतील सामानसुमान तोफखान्यांतून तोफा आणण्यासाठीं आलेले नवाबाचे बैल हे युद्ध अथवा समझोत्यांच्य. मार्गानें आणण्याचा हुकूम झाला, तोफखान्याजवळ असलेल्या छोटया टेकडीपाशीं

थोडी फौज दिसली. त्यांवर नवाबाच्या फौजांनीं गलबा केला. तेव्हां लढाई झाली पेंढाऱ्यांपैकीं २००, ३०० लोक मारले गेले व जखमी झाले. कृष्णाजी मांड (भांड) याचा मुलगा गोळी लागून मारला गेला. तसेंच जयसिंगराय व खाजा सरायान यांचे ३०० अफगाण लोक मारले गेले व जखमी झाले. दिलेरसिंगाचा पुतण्या कामास आला. जयसिंगराय व सालिमखान वगैरे पळून शहरांत गेले व त्यांनीं आपला जीव वाचविला. खोजा जौहरनें मात्र लढाईत कुठलीही कमतरता ठेवली नाहीं.

फौजेंतील लोकांबरोबर चार–पांचशें बैल व एक हत्ती तोफा आणण्यासाठीं दिले होते ते सर्व पळवून नेले. तसेंच नवाबांनीं पाठविलेले घोडे व रिसालदार यांना लुटून सरदारांच्या पुढें आणलें. रफीउल्लाखानाची सराई... सोलापुरी... वगैरे प्रांत जे वजीरुल्ममालिकाच्या नावें खर्चासाठीं नेमले आहेत व इतर... या जिल्ह्यांतील ठिकाणे लुटलीं. बातमी आहे कीं, ७, ८ लाख रु. लुटले तसें तूप व किराणा लुटण्यांत आले.

मुघलपुरा, जशपुरा व कठकर व बकसरिया येथील घटनांवरून समजतें कीं, तेथील रहिवाशांना लुटारूंनीं लुटले व त्यांचीं घरें पाडलीं. तेथील रहिवासी शहराकडे येत आहेत. लाहोरी दरवाज्याच्या मोर्च्यांवर नवाबांनीं जे लोक ठेवले होते त्यांनीं दरवाजे बंद करून गरीब लोकांचा ऐवज लुटला.

चालू महिन्याच्या जवल २३ तारखेस (जानेवारीला) लुटारू परत जशपुऱ्यांत आले, त्यांनीं तेथील व मुघलपुऱ्यांतील रहिवाशांना लुटले. तेथील मुघलांची कत्तल केली. ते नवाब वझीरुल्मुल्काच्या मुजऱ्यासाठीं (मान्यतेसाठीं) त्याकडे गेले. बहुतेक सर्व मुघलांचीं घरें लुटलीं. अत्याचाराबद्दल मुघलांनीं तक्रार केली. तेव्हां नवाबांनीं सय्यिद जमीलुद्दीनखान यास ताकीद केली कीं, मुघलांशीं लुटारूंनीं ज्या प्रकारचें कृत्य केलें आहे त्याची चौकशी करावी. तेव्हां बहुतेकांना कैद करून कोतवालीच्या चबुतऱ्यावर ठेवण्यांत आलें.

उपर्युक्त सरदारांतर्फे राजा अंताजी पंडित व राव पुरुषोत्तम पंडित हें नवाबाकडे जावसालासाठीं झाले आहेत. नवाबाकडून मुकर्रमुउल्लाह जलालुद्दौला व (राव मल्हार–तर्फे) बापू त्रिंबक सरदारांकडे जातात. तरीही जाबसाल झाला नाहीं. यामुळें सरदार बरेचसे नाराज दिसतात. ता. २८ (जवल २८ जानेवारी) ला फौजेनें यमुना नदी ओलांडली व नवाब वजीरुल्मुल्काच्या वारसा हक्कानें ताब्यांत असलेल्या जागीरींच्या मुलुखांत जाऊन तो लुटला. या महालाचा फौजदार खोजा जौहर होता. त्यानें आपल्या नायबास ५०० स्वारांच्या जमेतीसह येथें ठेवलें होतें. त्यांनीं बंदुकांची लढाई केली, तेव्हां विजयी फौजेकडून त्यांचे ५०० लोक मारले गेले. बहुतांशीं बंदूकवाल्यांनीं दाद

दिली नाहीं ते मारले गेले नाहींत. फौजेंतील लोकांनीं उपर्युक्त परगण्यांतील धान्य जनावरें वगैरे लुटलें.

नवाब वजीरुल्मालिकास महाल लुटल्याचें समजलें तेव्हां तो फार रागावला. त्यानें राजा अंताजी पंडित व राव पुरुषोत्तम पंडित व जलालुद्दौला यांस फर्माविलें कीं, तुमच्याकडून सलोखा घडून आला नाहीं तर माझ्या मर्जीस येईल त्याप्रमाणें मी करीन. नंतर लाल मुहम्मद नांवाच्या स्वतःच्या चाकराबरोबर राव जनकोजीकडे लेखी निरोप पाठविला कीं, आपण फार उत्तम प्रकारें सलोख्याचे संबंध पाळले. आतां आमचा लढाईचा विचार आहे.

२९ जवल (जानेवारी २९) : जनकोजी शिंद्यानें आपल्या फौजेस शाहदरा लुटण्यासाठीं नियुक्त केलें. नवाब वजीरुल्ममालिकानें शाहदऱ्याच्या संरक्षणासाठीं स्वार व प्यादे नेमले असले तरी विजयी फौजांपुढें ते कसे टिकतील हें आपणास माहितच आहे. नारोजी शंकरानें फौज पाठवूं नये म्हणून खूप समजावून सांगितलें. तसेंच फौजेस मना करावें व परत बोलवावें असेंही सांगितलें.

नवाब वजीरुल्ममालिकानें राजा अंताजी पंडित व राव पुरुषोत्तम पंडित व जलालुदौला यांस उपर्युक्त सरदारांकडे पाठविलें व कळविलें कीं, सरदारांस मान्य आहे तें मलाही मान्य आहे. खिलअत, जवाहीर, घोडे, एक हत्ती व एक तरवार जनकोजीच्या नांवें पाठविली व इतर सरदारांसाठीं (भेटीचें सामान) जलालुदौला जवळ देऊन त्यास ते पोहचतें करून परत येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें खानानें तें पोहोंचविलें व सलोखा केला.

ता. ३ जखर जु. ५ (इ. १७५९ फेब्रुवारी २८) या दिवशीं राव जनकोजी शिंदे व इतर सरदार यांनीं शेरजंग बाग व वजिराबादेचा घाट येथून कूच केलें पूर्वीं बुराडीस डेरे होते, तेथेंच डेरेदाखल झाले. तेथून ४ तास कूच करून नरेलाचा (घाट) चढून सोनपत व पानिपत या मार्गे लाहोरास जाण्याचा विचार आहे. राजा अंताजी पंडीत व राजा दिलेरसिंग हे त्यांच्या बरोबर असून त्यांचा निरोप घेतील. बहादुरखान हा देखील अजून सरदारांबरोबर असून त्याच्या मुकदम्यांचा निकाल लवकरच होईल व आदिनाबेगखानाचे लोक चकगूरु (अमृतसर) व डेरा नानक येथें आहेत. ते रावी नदीवर लाहोर पासून ३० कोसांवर आहे. मल्हारराव व जनकोजी यांनीं पाठविलेले सल्लागार लोक उपर्युक्त खानाबरोबर आहेत.

चकले सरहिंद येथील फौजदार सिद्दीकबेगखान यानें परगणे कैथल, जें येथून पश्चिमेकडे ४० कोसांवर आहे, तेथील प्रत्येक घरांतून पैसे वसूल केले असून खजिना २० गाढवांवर लादून पाठविला आहे. खान मजकुराचा वकील सरदारांच्या लष्करांत आहे

श्रीमंत दादासाहेब लाहोरकडे गेले होते तेव्हां कंधार येथींल शाहजादा अब्दुर्रहीमखान अफगाण भेटीस आला होता. तो सध्या लष्करांत आला असून त्यानें सरदारांच्या भेटी घेतल्या व करारमदार केले ते असे : सुभे काबूलपर्यंतचा बंदोबस्त मी करीन. मुलतान वगैरे सुभ्यांच्या जमीनदारांना मित्रत्वाची पत्रें सरदारांनीं पाठविलीं आहेत. तेव्हां त्याप्रमाणें सरकारच्या काबूलपर्यंतच्या सुभ्याचा बंदोबस्त मी करीन.

.. वगैरे अफगाण सरदार गुजरातेंत चिनाब नदीच्या अलीकडील तीरावर असलेल्या शाहदौला येथें मुक्काम करून आहेत, सोधडा (गोधडा ?) येथील महाल तसेंच अमीनाबाद, वजीराबाद व औरंगाबाद हीं ताब्यांत आणून तेथून पैसे वसूल करीत आहेत. त्यांबरोबर जवळजवळ १५ हजार स्वार व प्यादे आहेत.

लाहोर, मुल्तान, ठठ्ठा येथें सुभेदारीवर असलेले सरदार मारले गेले तेव्हां, सरदारांनीं (नवीन) लोक नेमले. नवाब मुइझ्झुद्दौला अब्दुलअहमदखान याच्या नांवें काश्मीरची सुभेदारी नेमून दिली. यापूर्वीं श्रीमंत दादासाहेब येथें आले होते तेव्हां उपर्युक्त सुभ्यांतून निम्मे उत्पन्न त्यांचे नांवें व निम्मे नवाब वजीरल्मुमालिकाच्या नांवें होतें. फौजेचा खर्च वगैरे वजा जाऊन हें ठरलें होतें. या नंतर राजधानीच्या जवळपासच्या सुभ्यांतून व महालांतून जो वसूल प्राप्त होत असे त्याचा ४ था हिस्सा उपर्युक्त शिंद्यांना नेमला आहे. लेखी कराराप्रमाणें अमल होत आहे.

नजीबखान रोहिल्याने वकील जाबसालासाठीं राव जनकोजी बरोबर होते. त्यांनी खानाच्या संबंधीं अर्ज केला. नवाब मुइझ्झुद्दौलाच्या मध्यस्थीनें त्याच्या मुकाद्दम्याचा निर्णय लागला असून ठरावाप्रमाणें पैसे दिलें व त्याप्रमाणें अमल होत आहे, नंतर ता. २७ जवल (जानेवारी २७) ला राव मजकूर हे मुइझ्झुद्दौलाच्या घरी गेले तेव्हां खान मजकुरानें त्यांना कापड, दोन नीम आस्तीन, १ ढाल, १ तरवार, व २ ओढे भेट दिले.

ता. २४ जवल (जानेवारी २४) या दिवशीं सुरजमल जाटाचा मुत्सद्दी रूपराम कटारा याने चार लक्ष रु. सरदारांना दिले.

रोहिले सरदारांनी जनकोजी शिंद्यासाठीं कांहीं पक्षी पाठविलें होते ते फौजेंत पोहोचलें. शिंद्यांनी नवाब वजीरुल्ममालिकास सांगितलें कीं, सिकंदराबाद नजीबखानास बहाल केले आहे. तेथील वसूल मी घेणार आहे. रोहिल्यांचे सरदार आंवला वगैरे ठिकाणीं मुक्काम करून आहेत. तें ठिकाण गंगा नदीच्या या तीरावरती आहे. लाहोरच्या जिल्ह्याची हकीकत अशी : मीर हसन अलीखान व जमीनदारखान तसेंच मलिकाझमानी बेगम जम्मूच्या राजाकडे रहात असून तो तिचा रोजचा खर्च चालवीत आहे.

काबूल आणि कंधार येथील परिस्थिती पूर्वीसारखीच आहे. काबूल सुभा अफगाणा कडील . . . . याच्या ताब्यांत व कंधारांत अब्दालीचा मुलगा तीमूर सुलतान, तसेंच जहानखान बक्षी व त्यांचे इतर नासरदार आहेत. त्यांचा हिंदुस्थानकडे जाण्याचा इरादा आहे व त्याप्रमाणें फौजांची तयारी चालू आहे.

मारवाडची हकीकत अशी : राजा माधोसिंग हा जयपूर येथें आपल्या वतनांत आहे. रणथंबोरचा किल्लेदार व फौजदार मरण पावल्यामुळें राजाच्या कांहीं लोकांनी कट करून किल्ला राज्याच्या ताब्यांत आणला. राजा बिजेसिंग जोधपुरांत आहे.

शाहजादा वालागुहर याची हकीकत अशी : तो लखनौ येथें पोहोचला असून नवाब शुजाउद्दौला याने त्याची भेट घेऊन नजर वगैरे दिली. तो अलाहाबादेकडे रवाना झाला. अलाहाबादेच्या सुभेदाराचा मामेभाऊ मुहम्मद कुलीखान यास लिहिलें आहे कीं, शाहजाद्यास किल्ल्यामध्यें ठेवून त्याजवर लक्ष ठेवावें. उपर्युक्त नवाबाने मागील भेटीच्या वेळीं १०१ मोहरा, ४ तरवारी . . . . निशाण, कापड, ओझें वाहण्यासाठीं उंट शाहझाद्यास भेट दिले. राव जनकोजी शिंद्यांनीं लिहून पाठविलेलीं पत्रें नवाब साहेबास मिळालीं.

२२ जवल (जानेवारी २२) ला शाहजादा वालागुहर माणिकपुरास पोहचला. तो तेथें रहात आहे. अलाहाबादेहून मुहम्मद कुलीखान शुजाउद्दौलाच्या भेटीसाठीं जात आहे. वाटेंत शाहाजाद्याची भेट घेऊन १०१ मोहरा ओवळल्या.

४. काशींतील विश्वेश्वराचें मंदिर

(डॉ. सौ. कमल गोखले)

काशींतील सर्वांत महत्त्वाचें देवालय म्हणजे विश्वेश्वराचें. ७ व्या शतकामध्यें या देवालयाचें शिखर सुमारें १०० फूट उंच असावें असें चिनी प्रवासी युआन्च्वांग याच्या वर्णनावरून समजतें. हें मंदिर अनेक वेळां मुसलमानांनीं पाडलें होतें. इ. १५८० च्या सुमारास तें राजा तोडरमल याने नारायणभट्ट नांवाच्या महाराष्ट्रीय ब्राह्मण नगर-पंडिताच्या विनंतीवरून भव्य प्रमाणांत बांधलें. त्यावेळीं अकबर राज्य करीत होता. त्यामुळें मंदिराच्या जीर्णोद्धारास सहजपणें परवानगी मिळाली. हा जीर्णोद्धार करतांना राजा तोडरमल्लाने मूळ देवालयाचा चबुतरा सात फुटांनीं उंच केला व त्याच्या वर जुन्या प्रमाणांतच मंदिर उभारलें. हें मंदिर चौरस असून त्याच्या मध्यावर ३३ फूट औरस चौरस गाभारा होता. या गाभाऱ्याच्या चारी दिशांस चार भव्य दरवाजे होते.

श्रीमंत दादासाहेब लाहोरकडे गेले होते तेव्हां कंधार येथींल शाहजादा अब्दुर्रहीमखान अफगाण भेटीस आला होता. तो सध्या लष्करांत आला असून त्यानें सरदारांच्या भेटी घेतल्या व करारमदार केले ते असे : सुभे काबूलपर्यंतचा बंदोबस्त मी करीन. मुलतान वगैरे सुभ्यांच्या जमीनदारांना मित्रत्वाची पत्रें सरदारांनीं पाठविलीं आहेत. तेव्हां त्याप्रमाणें सरकारच्या काबूलपर्यंतच्या सुभ्याचा बंदोबस्त मी करीन.

.. वगैरे अफगाण सरदार गुजरातेंत चिनाब नदीच्या अलीकडील तीरावर असलेल्या शाहदौला येथें मुक्काम करून आहेत, सोधडा (गोधडा ?) येथील महांल तसेंच अमीनाबाद, वजीराबाद व औरंगाबाद हीं ताब्यांत आणून तेथून पैसे वसूल करीत आहेत. त्यांबरोबर जवळजवळ १५ हजार स्वार व प्यादे आहेत.

लाहोर, मुल्तान, ठठ्ठा येथें सुभेदारीवर असलेले सरदार मारले गेले तेव्हां, सरदारांनीं (नवीन) लोक नेमले. नवाब मुइझ्झुद्दौला अब्दुलअहमदखान याच्या नांवें काश्मीरची सुभेदारी नेमून दिली. यापूर्वी श्रीमंत दादासाहेब येथें आले होते तेव्हां उपर्युक्त सुभ्यांतून निम्मे उत्पन्न त्यांचे नांवें व निम्मे नवाब वजीरल्मुमालिकाच्या नांवें होतें. फौजेचा खर्च वगैरे वजा जाऊन हें ठरलें होतें. या नंतर राजधानीच्या जवळ-पासच्या सुभ्यांतून व महालांतून जो वसूल प्राप्त होत असे त्याचा ४ था हिस्सा उपर्युक्त शिंद्यांना नेमला आहे. लेखी कराराप्रमाणें अमल होत आहे.

नजीबखान रोहिल्याने वकील जाबसालासाठीं राव जनकोजी बरोबर होते. त्यांनीं खानाच्या संबंधीं अर्ज केला. नवाब मुइझ्झुद्दौलाच्या मध्यस्थीनें त्याच्या मुकाद्दम्याचा निर्णय लागला असून ठरावाप्रमाणें पैसे दिलें व त्याप्रमाणें अमल होत आहे, नंतर ता. २७ जवल (जानेवारी २७) ला राव मजकूर हे मुइझ्झुद्दौलाच्या घरी गेले तेव्हां खान मजकुरानें त्यांना कापड, दोन नीम आस्तीन, १ ढाल, १ तरवार, व २ ओडे भेट दिले.

ता. २४ जवल (जानेवारी २४) या दिवशीं सुरजमल जाटाचा मुत्सद्दी रुपराम कटारा याने चार लक्ष रु. सरदारांना दिले.

रोहिले सरदारांनी जनकोजी शिंद्यासाठीं कांहीं पक्षी पाठविलें होते ते फौजेंत पोहोचलें. शिंद्यांनी नवाब वजीरुल्ममालिकास सांगितलें कीं, सिकंदराबाद नजीबखानास बहाल केले आहे. तेथील वसूल मी घेणार आहे. रोहिल्यांचे सरदार आंवला वगैरे ठिकाणीं मुक्काम करून आहेत. तें ठिकाण गंगा नदीच्या या तीरावरती आहे. लाहोरच्या जिल्ह्याची हकीकत अशी : मीर हसन अलीखान व जमीनदारखान तसेंच मलिकाझमानी बेगम जम्मूच्या राजाकडे रहात असून तो तिचा रोजचा खर्च चालवीत आहे.

काबूल आणि कंधार येथील परिस्थिती पूर्वीसारखीच आहे. काबूल सुभा अफगाणा कडील . . . . याच्या ताब्यांत व कंधारांत अब्दालीचा मुलगा तीमूर सुलतान, तसेंच जहानखान बक्षी व त्यांचे इतर नासरदार आहेत. त्यांचा हिंदुस्थानकडे जाण्याचा इरादा आहे व त्याप्रमाणें फौजांची तयारी चालू आहे.

मारवाडची हकीकत अशी : राजा माधोसिंग हा जयपूर येथें आपल्या वतनांत आहे. रणथंबोरचा किल्लेदार व फौजदार मरण पावल्यामुळें राजाच्या कांहीं लोकांनी कट करून किल्ला राज्याच्या ताब्यांत आणला. राजा बिजेसिंग जोधपुरांत आहे.

शाहजादा वालागुहर याची हकीकत अशी : तो लखनौ येथें पोहोचला असून नवाब शुजाउद्दौला याने त्याची भेट घेऊन नजर वगैरे दिली. तो अलाहाबादेकडे रवाना झाला. अलाहाबादेच्या सुभेदाराचा मामेभाऊ मुहम्मद कुलीखान यास लिहिलें आहे कीं, शाहजाद्यास किल्ल्यामध्यें ठेवून त्याजवर लक्ष ठेवावें. उपर्युक्त नवाबाने मागील भेटीच्या वेळीं १०१ मोहरा, ४ तरवारी . . . . निशाण, कापड, ओझे वाहण्यासाठीं उंट शाहझाद्यास भेट दिले. राव जनकोजी शिंद्यांनीं लिहून पाठविलेलीं पत्रें नवाब साहेबास मिळालीं.

२२ जवल (जानेवारी २२) ला शाहजादा वालागुहर माणिकपुरास पोहचला. तो तेथें रहात आहे. अलाहाबादेहून मुहम्मद कुलीखान शुजाउद्दौलाच्या भेटीसाठीं जात आहे. वाटेंत शाहाजाद्याची भेट घेऊन १०१ मोहरा ओवळल्या.

४. काशींतील विश्वेश्वराचें मंदिर

(डॉ. सौ. कमल गोखले)

काशींतील सर्वांत महत्त्वाचें देवालय म्हणजे विश्वेश्वराचें. ७ व्या शतकामध्यें या देवालयाचें शिखर सुमारें १०० फूट उंच असावें असें चिनी प्रवासी युआन्च्वांग याच्या वर्णनावरून समजतें. हें मंदिर अनेक वेळां मुसलमानांनीं पाडलें होतें. इ. १५८० च्या सुमारास तें राजा तोडरमल याने नारायणभट्ट नांवाच्या महाराष्ट्रीय ब्राह्मण नगर-पंडिताच्या विनंतीवरून भव्य प्रमाणांत बांधलें. त्यावेळीं अकबर राज्य करीत होता. त्यामुळें मंदिराच्या जीर्णोद्धारास सहजपणें परवानगी मिळाली. हा जीर्णोद्धार करतांना राजा तोडरमल्लाने मूळ देवालयाचा चबुतरा सात फुटांनीं उंच केला व त्याच्या वर जुन्या प्रमाणांतच मंदिर उभारलें. हें मंदिर चौरस असून त्याच्या मध्यावर ३२ फूट औरस चौरस गाभारा होता. या गाभाऱ्याच्या चारी दिशांस चार भव्य दरवाजे होते.

या चार दरवाजांसमोर ज्ञान मंडप, मुक्ति मंडप, शृंगार मंडप व ऐश्वर्य मंडप या नांवांचे चार मंडप होते. मुख्य देवालयाच्या चार कोपऱ्यांत गणेश, भैरव, तारकेश्वर व दंडपाणी यांचीं चार लहान देवालयें होतीं. हल्ली यांपैकीं काळभैरव व दंडपाणी यांचीं देवळें विश्वनाथाच्या देवळापासून लांब अंतरावर आहेत. पूर्वी सर्व एकाच आवारांत होतीं.

इ. १५८० च्या सुमारास बांधलेलें हें भव्य मंदिर इ. १६९०सालीं औरंगजेबाच्या हुकमानें पाडून टाकण्यांत आलें. आणि त्याच जागेवर नवीन मशीद बांधण्यांत आली. पूर्वीच्या देवालयाच्या मुख्य गाभाऱ्याच्या ठिकाणींच मशिदीची मुख्य मिहराब असावी या हेतूनें औरंगजेबाच्या स्थापत्यविशारदानें विश्वनाथाच्या गर्भागाराच्या पश्चिमेस असणारा शृंगार मंडप आणि गणेश व दंडपाणी यांचीं देवालयें पाडून टाकलीं.

या जागेचा मशिदीसाठीं उपयोग करणे शक्य नसल्यामुळें ती पडीत जागा अद्यापही तशीच आहे. त्यामध्यें शृंगार मंडपाचे प्राचीन अवशेषही अद्याप थोडेसे दिसतात. मुख्य मंदिर, ऐश्वर्यमंडप व मुक्ति मंडप हे तसेच ठेवण्यांत आले असले तरी त्यांचे पश्चिमेकडचे दरवाजे बंद करून मशिदीची मागील भिंत बनविण्यांत आली आहे. बुजविलेलें दरवाजे अद्याप स्पष्टपणें मशिदीच्या मागें दिसून येतात.

इ. १६६९ नंतर बरीच वर्षे विश्वनाथाचें मंदिर काशींत नव्हतें. या काळांत विश्वनाथाचें लिंग कोठें ठेवलें होतें याची माहिती नाहीं. जुन्या जागेवर पुन्हा देऊळ बांधण्याची पद्धत होती. परंतु तेथें मशीद बांधण्यांत आल्यामुळें तसें करणें शक्य झालें नाहीं. मराठ्यांच्या मनांत मशीद पाडून पूर्वीच्या जागेवर पुन्हा देवालय बांधावें असें होतें. त्या दृष्टीनें त्यांनीं प्रयत्नही केले.

इ. १७४२ च्या जून महिन्यांत मल्हारराव होळकरांची काशींत छावणी होती मल्हाररावांच्या मनांत ज्ञानवापी जवळची मशीद पाडून तेथे देवालय बांधावयाचें होतें. परंतु मशीद प्रसिद्ध असल्याने काशींतील ब्राह्मणांना काळजी वाटू लागली. पादशाहाचा हुकूम नसतांना मल्हाररावाने मंदिरें बांधली तर पादशाह दुष्टपणानें, त्या प्रांतांत यवन लोक प्रबळ असल्यानें, ब्राह्मणांची हत्या करील अशी ब्राह्मणांना चिंता वाटत असल्याने सर्व ब्राह्मणांनीं मल्हाररावाला दुसरीकडे मंदिर बांधण्यास सुचविलें. देवाची स्थापना होत असतांना त्याला विरोध केला तर ब्राह्मणांवर दोष येईल, ब्राह्मणांवर संकट ओढवेल, तरी असें मल्हाररावाने करूं नये. मल्हाररावाने मशीद पाडण्यास सुरुवात केलीं असती तर सर्व ब्राह्मणांनीं एकत्र येऊन त्यांना विनंतीपत्र सादर करण्याचें ठरविलें होतें.

थोरले माधवराव पेशवे हे स्वर्गवासी होण्यापूर्वी सरासरी दीड महिना त्यांनीं राज्यांतील मुख्य प्रतिष्ठित मुत्सद्यांकडून जिच्या अंमलबजावणीबद्दल शपथा

घेतविल्या होत्या त्या नऊ कलमी यादींत काशीक्षेत्रासंबंधी म्हटलें होतें, " श्री काशी, प्रयाग हीं दोन्ही स्थळें सरकारांत यावीं, असा तीर्थरूपांचा (नानासाहेबांचा) हेतु होता. त्यास प्रस्तुत करावयाजोगे दिवस आहेत. दहावीस लक्षांची जहागीर मुबदला पडलौ तरी देऊन दोन्हीं स्थलें हस्तगत करावी प्रयत्न करावा " (इतिहाससंग्रहऐतिहासिक स्फुट लेख भाग ३।९७)

अखेर ज्या वेळीं काशीवर बलवंतसिंगाचा अंमल बसला, त्या वेळीं नवीन विश्वेश्वराचें मंदिर बांधणें शक्य झालें. त्या वेळीं पूर्वीच्या ज्ञानवापीच्या शेजारीच नवीन देवालय बांधावें असें ठरून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनीं तें बांधविलें. हें मंदिर लहान असून तें मशिद व ज्ञानवापी यांच्या पूर्वेस ५० फूट लांबरुंद प्राकाराच्या आंत आहे.

नाना फडणिसांनीं हिंदूचीं पवित्र क्षेत्रें मथुरा व वृंदावन हस्तगत करून घेण्याबद्दल व काशी येथील श्री विश्वेश्वराचें देवालय ताब्यांत घेण्याविषयीं महादजी शिंदे यास अनेक वेळां लिहिलें होतें. श्री विश्वेश्वराच्या जागीं बांधलेली मशीदीची जागा मोकळी करून तेथें पूर्ववत देवालय व देवस्थापना करण्यास महादजीनें विरोध केला होता. अशा गोष्टी करून यवनाचा वाकडेपणा ओढवून घेण्यास महादजी शिंदे तयार नव्हता. तेव्हां भिकाजी नारायणानें महादजीला लिहून कळविलें होतें कीं, हें काम आपणच केल्यानें आपली कीर्ती व मान वाढून सर्वांनाच भूषणास्पद होईल. ही माहिती भिकाजी नारायणानें नाना फडणिसाला दि. २२-३-१७८८ रोजीं लिहिलेल्या पत्रांत कळविलेली आढळते (इतिहाससंग्रह-ऐतिहासिक टिपणें-भाग १, पृष्ठ ९).

इंग्रजांच्या ताब्यांत काशी गेल्यावरही नाना फडणिसानें महादजी शिंद्यांच्या मध्यस्थीनें, मुसलमानांस जरूर तर नुकसानभरपाई देऊन मशीद हलवून, त्या जागीं मंदिर बांधून देण्याबद्दल अनेक वेळां इंग्रजांना लिहिलें होतें. अर्थात् इंग्रजांनीं त्यास संमती दिली नाहीं.

नाना फडणिसानें केलेल्या प्रयत्नांची माहिती मेणवली दप्तरांत मिळालेल्या भिकाजी अनंत पटवर्धन यास लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते. यासंबंधी त्यांनीं भास्करपंत कुंटे यासही पत्र लिहिलें होतें.

मशीद व देऊळ यांमधील जागेचें गुणदोष पाहून व शेजाऱ्याच्या सल्ल्यानें ती जागा घ्यावी असें नाना फडणिसानें भास्करपंत कुंटे यास सुचविलें होतें. त्या जागेस मुसलमान वारसाहक्क सांगतील म्हणून अगोदर करारपत्र व शेजाऱ्यांच्या साक्षी घ्याव्या असें अनंत दीक्षित पेंडसे यांचें मत होतें. श्री. कुंट्यानें करारपत्र न करतांच गोसाव्याला १० हजार रुपये देऊन जागा घेतली. त्यानंतर त्या ठिकाणीं असलेल्या

विद्यार्थ्यांनीं शंखनाद सुरू करून मशिदीजवळ खणण्यास सुरुवात केली. त्यामुळें सारे मुसलमान एकत्र होऊन मारामारी झाली. वरील जागा यवन लोक १० हजाराला विकत घेण्यास तयार झाले.

या पत्रावर तारीख नाहीं. परंतु या प्रकरणासंबंधीची माहिती त्रिंबकराव परचुरे यानें लिहिलेल्या दि. ४–७–१७९९ च्या पत्रांत आली आहे ती अशी—"श्री काशी विश्वेश्वराचे स्थलाची जागा विकत घेतली त्यांत मशीद नाही कबाले करून घेऊन ऐवज द्यावा ते न करिता ऐवज दिल्हा म्हणोन लिहिलें तें कळलें त्यास हली तुम्ही कवलेपत्र करून घ्यावी."

भास्करपंत कुंटे याजकडे काशींतील बागेचें व वाड्यांतील काम व कर्मनाशीच्या पुलाचें काम सोपविलें होतें. इ. १७९९ च्या जून महिन्याच्या सुमारास नाना फडणिसानें हें काम त्याजकडून काढून भिकाजी अनंत पटवर्धन याजकडे सोपविलें. तें शके १७५१ ज्येष्ठ शुद्धपर्यंत (इ. १८२९ पर्यंत) काशींतील हवेल्या व बाग यांचें काम पहात होते. इ. १८२९ च्या सुमारास ऐवजाची घालमेल केल्याचें कळल्या-वरून राघोपंत गोखले व पुरुषोत्तम पेंडसे यांनीं भिकाजी अनंत पटवर्धनांकडून तें काम काढून घेतलें. त्यामुळें इ. १८२९ सालीं ऐवज पाठविण्याविषयीं व म्हातारपणी सांभाळून घ्यावें म्हणून भिकाजी अनंत पटवर्धनानें राघोपंत गोखले व पुरुषोत्तम पेंडसें यांना विनंती केल्याचेंही पत्र उपलब्ध आहे.

पौष वद्य ७	**श्री कासी**	श. इ.

सेवेसी अज्ञाधारक भिकाजी अनंत पटवर्धन करद्वय जोडून चरणांवरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत पौष वा ७ पावेतो स्वामीचे कृपेकरून श्री [मो. जो.*] क्षेत्र येथे सुखरूप असू विशेष स्वामीनी छ ५ जमादिलाखरचे पत्र पाठविले ते पावले श्री आदि विश्वेश्वराचे स्थळाचे कबाले करून घ्यावे म्हणून आज्ञा त्यास कबाले करून घ्यावयाचे याकरितां स्वामींचीं पत्रें पेशजी कुंटे यास आलीं तीं व यांणी विनंतिपत्रें पाठविलीं तें पाहिलीं त्यास स्वामींनी ज्या अर्थास्तव पत्र पाठविलें तो अर्थ मनांत आणून जाग्यांचें गुणदोष समजोन नंतर स्वामीस विनंती लिहून त्याचें आज्ञोत्तर... आल्यावर स्थल घेणे तें कबालेपत्रे पडोसियांचें साक्षीनसी घ्यावे ते किमपि न करितां स्वामीचे पत्र स्थल घ्यावयाचे इतक्याच अर्थावर विचार न करितां स्थल घेतले आणि गोसावी याणें स्थल विकत दिल्हे. त्याचे बोलणे वेदमूर्ति राजश्री अनंत दीक्षित पेंडसे यांचे विरी पडले कीं या स्थलास अविध वारसा करितात याजकरितां आधी कबाले व पडोसि-

यांच्या साक्षी करून घ्यावे मग तुम्हास कजिया यवनासी उपस्थित करणे तो करा त्यास बाळाजीपंत व कुंटे याणी उत्तर केले कीं आम्हास कबाले करणेयाविसी दिकत काय ज्या समई पाहिजे ते समई करून घेऊ अैसे म्हणोन पुढे दाहा हजार रुपयांचे खरीदपत्र गोसावियाचे नावाचे केले होते त्यास कबाले वगैरे गोसावियाणी करून द्यावे अैसा करार त्याबद्दल दाहा हजार रुपया पो पैकी पांचशे रुपये ठेऊन घ्यावे. कबाले साक्षी जाल्यानंतर गोसावियास सदरहू पांचशे रुपये द्यावे अैसे अनंत दीक्षितांनी सांगितले. ते न अइकता गोसाविसी सारा येवज दिल्हा कबालेयास ठिकाण नाही आणि स्थळांत विद्यार्थी ठेवून संखनाद सुरू केला व मसिदीजवळ खणावयास प्रारंभ केला यामुळे सारे यवन येकत्र जमा होऊन संख फोडून विद्यार्थ्यांस मारामारी करुन लौकिक केला इंग्रजांचा अमल होता. स्वामींचे पुण्ये थोर म्हणोनच पार पडले यवन लोक दाहा हाजाराची जागा आपण घेऊ म्हणतील ही दिकत मनांत आणून वीस हजाराचे खरेदीपत्र कुंटे याणी करुन घेतले आणि गोसावियाजवळ करार केला कीं दाहा हजार रुपये नवे उगेच जाजती चढविले आहेत याचे कबालेपत्र करण्यास आणिक तीन चारशें रुपये लागतील ते आम्ही देऊ अैसे बोलून कागद करून घेतला आणि कुंटे याणी स्वामीस लिहिले कीं पहिले दोन यवनाचे कबाले आहेत त्यांत मसिदीची वाट रस्त्याची जिकीर लिा नाही गोसावि याणी कबाला करून घेतला त्यांत स्थळा... रस्ता मसिदीत जावायाचा आहे ऐसे जाणविले आहे. या दिकतीमुळे कबाले करून घेतले नाही अैसे लिा कुंटे यास अैसी दिकतीची जागा घ्यावयाचे कारण काय म्हणोन पुसिले असता अनंत दीक्षित यांजवर निमित्य ठेवितात त्यास यांचे मनात अैसे आले नाही की स्वामीनी दीक्षिताची माहितगारी मात्र लिा परंतु सारा विश्वास व पैका देणे हा एकत्यार यांजवर यांणीं जे करणे ते पत्रांतील अनवये व जाग्यातील गुणदोष मनात आणून करावे ते न केले अता दीक्षितांवर निमित्य मात्र ठेवितात परंतु पैक्याची नुकसानी व नवीन कजिया विकत घेतला इतके मात्र केले हाली कबाले करावे त्यास मसीद व राडा व मागील दारची खुली जागा सुधां आवर येकच आहे मसिदीस वेगले आवर नाही यवन लोक जे आहेत त्याची वाट वाड्याचे स्थळातूनच मसिदीत जावयाची आहे इतकियाच गुणांवरून मसीद आपले स्थळांत हे समजोन दाहा हजार रुपये दिल्ले हाली वेगली वाट मसिदीत जावयास यवनास करून दिल्ही असता मसीद जाग्यावेगली असी पडेल दाहा हजार रुपये ज्या गोष्टी वदल दिल्हे ते व्यर्थ पडतील वेगली वाट केली असतां मसिदीस आवर च्यार दिवाली वेगली घालून द्यावयास खर्च मनस्वी लागेल व मसिदीचा वारसा तुटेल. पुढे मागे आपला वारसा सांगावयास जागा राहात नाही हे मनांत आणून आहे याप्रो करू म्हटल्यास नित्य यवनासी कजिया करावा लागेल दोन्हीकडून अडचण आहे तेव्हां

दाहा हजाराचे खरीदपत्र करून घेऊन कबले युक्तीनेंच होतील तसें करून घ्यावयास येतील वीस हजाराचा कबालावर खरीदखत करून घेतले असता तीन चारसें रु. जाजती पडतील जागा अंतर......तील दुसरे उपयोगी नाही व स्थळाची (.........) किमत दाहा हजार रुपयाची नाही येविसीचा नक्षा मागाहून पाठऊन देतो. आज्ञा देईल तसी वर्तणूक करीन भास्करपंत कुंटे व हरबाजी नाईक उभयता, स्वामींकडे आले आहेत हे दीक्षितांवर निमित्य ठेऊन स्वामीस समजावितील याकरिता विनंती लिा आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

५. महादजी शिंदे आणि गुलाम कादरची आई

(डॉ. सौ. कमल गोखले)

गुलाम कादरनें बादशहाशीं गैरवर्तन केल्यामुळें त्याचें व शिंद्यांचें वैर होतें इ. १७८७ मध्यें महादजी जयपूरवर चालून गेला, तेव्हां गुलाम कादर दिल्लीस गेला व आग्र्याचा सुभेदार इस्माईल बेग त्याला सामील झाला. मराठ्यांच्या ताब्यांत असलेला रायगड किल्ला त्यांनीं ताब्यांत घेतला. त्यानंतर गुलाम कादर व इस्माईल बेग यांनीं दिल्लीवर चाल करून तेथें धुमाकूळ घातला आणि अत्याचार केले. त्यांच्या अत्याचारांचें स्वरूप कोणत्या प्रकारचें होतें हें मराठी रियासत विभाग २, १० वें प्रकरण यांत विस्तारानें दिलें आहे.

गुलाम कादरचा बंदोबस्त करण्यासाठीं महादजी शिंद्यानें राणेखान, खंडेराव हरि जीवबादादा बक्षी, अंबूजी इंगळे यांना रवाना केलें. नाना फडणिसानें पुण्याहून तुकोजी होळकर व अली बहादुर यांना रवाना केलें. या सर्वांनीं मिळून गुलाम कादरचा पराभव केला. महादजीच्या फौजेनें त्याला दि. १६-१२-१७८८ रोजीं पकडलें मराठ्यांनीं केलेल्या हालामुळें अखेर तो मरण पावला.

यानंतर गुलाम कादरची आई व भाऊ वस्तभाव घेऊन कुंजपुऱ्याकडे शीखांच्या आश्रयास पळून गेले. त्यांचें काय झालें म्हणून नाना फडणिसानें त्याच्या विश्वासांतील सरदार आपाजी राम दाभोळकर यास विचारलें, तेव्हां त्यानें खालील माहिती नाना फडणिसाला कळविली. या पत्रांत पुढील विषयही आले आहेत.

(१) गुलाम कादरच्या आईनें आपण गुन्हेगार असून आमचे अन्याय माफ करावे असें महादजी शिंद्यास कळविलें; ' गुलाम कादरनें लुटून नेलेली दौलत, जड-

जवाहीर व जिन्नस परत करावे. ही सर्व दौलत परत केल्यावर सांगूं तेथें राहण्यास ती तयार असल्यास सरकारांतून पोटापुरते पैसे देऊन तिची व्यवस्था करण्यात येईल, असें महादजीनें तिला परत कळविलें. (२) आपापसांतील धुसफुशीनें महादजी शिंदे त्रासला होता. नाना फडणिसाचा गैरसमज दूर करण्यासाठीं महादजी हिंदुस्थानचा बंदोबस्त अली बहादुरावर सोपवून दक्षिणेंत येणार होता. (३) महादजी शिंदे व त्याचें कुटुंब भागीरथीस्नानास जाणार होते.

सु. ११८९ जखर १२ } श्री { श. १७१० फाल्गुन शुद्ध १४
इ. १७८९ मार्च १०

पा छ १० साबान सनतिसा समानीन वैशाख मास

सेवेसी आपाजीराम कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना ऐसी जे स्वामीनी छ बारावे जमादिलाखरचे पत्र पाठविले ते पावले पावोन बहूत अनंद जाहला तरी याप्रमाणे सदैव पत्रद्वारे सांभाल करावयासी आज्ञा जाहली पाहिजे यानंतर स्वामीनी पत्रीं लिहिले कीं गुलाम कादराची आई सिखाचे मुलकात गेली आहे तिचे काय जाहाले ते लेहून पाठवणे म्हणोन आज्ञा त्यास हरामखोराची आई सिखाचे आश्रयास गेली तेथून तिचे सूत्र येथें आले आहे कीं लाख रुपये मजपासून घ्यावे आणि आमची जाइदाद आम्हांकडे बहाल करावी आम्ही सर्व प्रकारे गुन्हेगार आहो आमचे अन्याय सर्व माफ करावे आणि चाकरी घेऊन चालवावे याप्रमाणे तिचे सूत्र आले आहे त्यास राजश्री पाटीलबावानी उत्तर केले कीं पातशाही माल व दौलत जडजव्हाइर वगैरे जिनस झाडून गुलाम कादर याणे नेला आहे तो झाडून आमचे स्वाधीन करावा नंतर तुम्हांस पोटापुरते खर्चावयासी देऊ तें घ्यावें आणि जेथें राहावयासीं सांगू तेथें राहाणे यैसे कबूल आसल्यास सरकारांतूनही चालविले जाईल म्हणोन साफ उत्तर दिल्हे आहे मग पुढे काय घडेल ते पाहावे राजश्री आली बहादर यांचे गेली हिंदुस्थानचा बंदोबस्त घालून राजश्री पाटीलबावा देशी येणार त्याचे परियाय स्वामींनीं पेशजीचे पत्रीं लिहिले होते व हलीही लिहिण्यात आले त्याजवरून मुख्यासी बोलणे जाहाले त्यांतील सारोष हाच कीं आम्ही स्वामीसेवा येकनिस्टपणेंकरीत असतां धन्याचे मर्जीस ती गोष्ट येत नाहीं तेव्हां आपूर्व आहे आजपर्यंत आम्ही इकडील कारभाराचा इतला देत नाही म्हणोन मर्जी सरकारची खरी होत्ये आता कची वहिवाट समजावयासी सिद्ध आहो आणि सर्व बंदोबस्त सरकारचा व्हावा म्हणोन बहूत वेळा पत्रे आम्ही लिहिली परंतु त्याची उत्तरें राजश्री आली बहादर याजला निखालस इकडील बंदोबस्त करून घेण्याविसीं येत नाहींत याजमुळें ते कांहीं बंदोबस्ताचा जाबसाल कबूल करीत नाहीत तेव्हां पुढें आम्ही विचार कोणता करावा याजविसीं बोलणी बहूत होतात त्याचा विस्तार पत्रीं कोठवर ल्याहावा तूर्त आली बहादर याजकडेस गोसगड व सारंगपूर येथील पंधरावीस माहालची सनद करून दिल्ही आहे त्यांत अमल त्याणी

आपला बसविला आजपर्यंत सारंगपुरास राजश्री रायाजी पाटील व राजश्री आली बहादर याजकडील गनीसाहेब चार हजार फौजेनिसी होते त्यास हली त्याला फौजेचे खर्चाबदल महाल लावून दिल्हे ते व तिकडील दुसरे माहाल वगैरे आहेत त्याचाही बंदोबस्त त्याजकडेसच सांगितला आणि रायाजी पाटील याजला इकडे फौजसुध्धा आनविले राणेखान भाई व जिवाजी बलाल बक्षी हे फौजसुद्धा पाणिपतापुढे करनालर पर्यंत गेले आहेत.........वालेवाला नानुमल याची खंडणी चुकविली नंतर नानुमलाचा धनी साहेबसिंह सीख होता तो पळोन आणखी सिखामध्ये गेला त्याजवरून पुढें पटाल्यास फौजा जाऊन पटाल्याचे ठाणे घेतले मग नगदी वगरे याचे हातीं काय लागले असेल नसेल हे न कले परंतु तूर्त मसलत कलेल तैसी समेटून घ्यावी आणि फौजा माघाऱ्या घेऊन इकडे यावे म्हणोन भाईस वगैरेयांस पत्रे वरचीवर जात आहेत. मग पुढे काय घडेल तें पाहावें येथील दरबारचा रंग नित्य नवा होतो त्याचा विस्तार पत्रीं लिहिता येत नाही सारोष गोष्ट हीच कीं येखादे काम येकाचे जिमेस करून त्याची वहिवाट येका हाती घ्यावी हा अर्थ ऐकरूप घडत नाही आपले काम निखालसपणें आमचे हातून घ्यावे यैसे बोलण्यांत बहूत वेल आले परंतु त्याप्रमाणे सर्व जाबसाल अमलांत येत नाहीत तेव्हां मातबर सरदार यांसी तूर्त वोढून फल नाही तेव्हां त्याचे मर्जीचा रंग पाहून वर्तणूक होत आहे वरकड होईल वर्तमान ते मागाहून सेवेसी लेहून पाठवीन दरबारी वर्तमान तरी राजश्री पाटीलबावाची खासा स्वारी कुटुंबसुधा भागीर्थीश्नानास एक दोहो रोजी जावे हा सिद्धांत ठरोन डेरे सुमुहूर्ते करून येमुनापार दिल्हे आहेत मग जाणे कोणते दिवशीं घडेल ते पाहावे तुर्त गंगाश्नानास जाणे राहिले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

४ व ५ या लेखांतील मूळ पत्रें मला मेणवली येथील दप्तरांतून नाना फडणिसाचे वंशज श्री. तात्यासाहेब भानू, (फडणीस) वकील यांच्या कृपेनें उपलब्ध होऊं शकलीं.

६. लक्ष्मेश्वर-देसाई

(डॉ. कृ. ना. चिटणीस)

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें, येथील श्री. ग. ह. खरे संग्रहापैकीं 'लक्ष्मेश्वर देसाई' (लदे) रुमालांतून हा लेख निवडला आहे. लक्ष्मेश्वर देसायांबद्दलची जास्त माहिती याच लेखकाचा 'Marathe and Lakshmeshwar Desais, Khare Felicitation Volume (in press) हा लेख आणि ग. ह. खरे संपादित शिवचरित्रसाहित्य खंड ६ (भा. इ. सं. मंडळ, प्रकाशन इ. १९३७) यांत पहावी.

लक्ष्मेश्वर देसाई हे कर्नाटकांतील धारवाड जिल्ह्यांत सोळाव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत देशमुखी करीत होते. आज उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरून वीरणगौडा देवणगौडा देसाई हा या घराण्याचा मूळ पुरुष असून त्यानें इ. १५७९–८० सालीं देशमुखी केली असें दिसतें. या घराण्यांत एकूण १२ पुरुष होऊन गेले. शेवटचा देसाई सहावा केंचणगौडा यानें इ. १७४० पर्यंत कारभार केला. सुरुवातीला हे देसाई विजापूरकरांचे अंकित होते. इ. १६४९ ते इ. १६७३ पर्यंत देशमुखीवर असलेला तिसरा केंचणगौडा याचा संबंध मराठी सत्तेशीं (शिवाजीशीं) आला असावा. नंतर संभाजी, हिंदूराव घोरपडे व कोल्हापूरकर यांशीं त्याचा संबंध आला. क्रमांक २४ (ले. १) हा या संग्रहांतील सर्वांत जुना कागद होय. याचा काल श. १५७६ = १६५५ आहे. हा कागद तिसऱ्या केंचण-गौडाच्या कारकिर्दीतला आहे. हा देसाई शिवाजीचा समकालीन असून, आपली देसगत वाढविण्याच्या प्रयत्नांत होता. हाच देसाई घराण्यांतला पहिला महत्त्वाचा पुरुष होय.

‘ लक्ष्मेश्वर ’ हा ‘ लक्ष्मणेश्वर ’ शब्दाचा अपभ्रंश आहे. इथें दिलेल्या सर्व कागदपत्रांत ‘ लक्ष्मणेश्वर ’ हाच शब्द वापरलेला आहे.

या पत्रांत तोरगळ सीमेमधील सिरगुप्पी कसब्याची भवानी गउडिति हिच्या मुलानें हस्तिनावती अनेगुंदि वळितांतील हुलिगेरे नाडा (लक्ष्मेश्वर सीमे) चा देसाई खानगौडा याचा भाऊ केंचणगौडा याजकडे जमीन गहाण टाकल्याची माहिती आहे. ३०० वराह (होन) घेऊन १५ मार जमीन देण्यांत आली.

या पत्रांत कांहीं करांचीं किंवा पट्ट्यांचीं नांवें आलीं आहेत. उदाहरणार्थ, ‘ हुगिहुलिसोप्पु ’ म्हणजे पीक आल्यानंतर कडब्यावर घेण्यांत येणारी पट्टी,
‘ कंटुवाण ’ म्हणजे मागावरील पट्टी किंवा सावकाराकडून ग्रामाधिकाऱ्याला येणारी पट्टी.

A tax on looms. a fee levied by the head village officers from the money changers of the village (Wilson's Glossary).

२ ‘ मार ’ हें जमीन मोजण्याचें एक माप होतें. एका ‘ मार ’ मध्यें ८ ‘ बळे ’ एका ‘ बेळे ’ मध्यें २ ‘ वीस ’ आणि एका ‘ वीस ’ मध्यें २ ‘ अरे ’ (अर्धे) वीस होते.

श. १५७६ जय ज्येष्ठ शुद्ध १५	श. १५७६ ज्येष्ठ शुद्ध १५ इ. १६५४ मे २१

०॥ नमस्तुंग शिरश्चुंबि। चंद्रचामर। चारु त्रैलोक्यनगरारंभ। मूलस्तंभाय-शंभवे। स्वस्ति श्री जयाभ्युदय श्रीमंत्रुप शालिवाहन शख वरु शंगळु १५७६ नेय। ज्ययनाम संवत्सरद। ज्यष्ट शुद १५ नेयलू श्रीमत्तु। हस्तनावत्ति वळिताद हुलिगेरेय नाडवेंदोके निलुव। लक्षमणेश्वरद्। सिमेय देशायि। खानपगउडर तंदिराद।

केंचणगउडरिगे। तोरगळ सिमेय वळगण कसबे सिरुगुपिय गउड। त्तिमाजि नायिकर गोविंदरायन पत्नि भवानि गउडत्ति। तत्पुत्रराग ... गउडगळु कोट्ट भोगवटिय पत्रद क्रमवेंत्तेंदरे अदागि। नाउ नंम आत्मकार्यद। अवसर नित्यवागि नम सिरुगुपिय गउडिकेगे बिणकाररु। गोळपगउड च्यंना गउडत्ति। उंडाडि गउडन बदिवण गउडगळ पालु ३ तिबण २ नुळिदु नंम पालिगे बण १ वंदरोळगे अर्दा पालिगें बंद भूमियनु निमगे भोगवटिय कोटु किर्दि मारु १५ हदिनयिदु मारनु आदिय माडि यिसुकोंडदु कालपरिवर्तनके सलुव नाण्य संणगेरे ग ३००८. अक्षरदलु मुंनूरू वरहांनु यिसिकोंडु यिदेउ यिदर बडिगे नंम पालु गउडिके मांन्यद अर्दाय किर्दिय मारु १५ हदिनयिदके जूडिमांन्य गाणिके अनित आकालचक्र आयस्वाम्येयातकु निमगे संमंदविल्लदे बोगवट्टेय नडसलूळवरु। यी भूमिगे नंम मूखांत्रव माडि सागु माडिदु हदिनयिदु मारिगू मखगुत्तिगय माडिदु ग ६२॥ अक्षरदलु अरुवत्तेरड्डवरे वरहनु कालकालके यी हणवनु मुटिसि कोडुत बंदेमुंदे असलु गंटनु। यी वरदलिल आरभ्यवागि नाल्कु वरुशके वोंमोखदलि गंटु मट्टिसि कोट्टे। कोडदे निंतरे नंम पालु स्वास्तिय वळगे सरिपाल भूमि आय स्वांम्ये हुगि हुलिसोप्पु कंटुवाण उड्गोरे मुंतागि तेजोपार्जनेय नुंटादुदनु संद मारुनिंद क्रयवागि। निंम पुत्र पडत्र। पारंपरियागि अचंद्रार्क स्थायिगळागि अनुभविसि कोंबदु। यिदके दिवाणदिंद बणकाररु। राजिकद यिविक पत्यपत्तु पूर्वादि अपराधियागियेनु बंद विड्पाखनु। परिहरिसि कोडलुळवरु येंदु कोटु वोग्यदिय पत्रउ कर्तु विगळ वरकोटु वप्पित्त

उवाजीगौडा सीवा भद्रणगौडा बराहा उपीता प्रतीहस्त काकाजी त्रियेंबक मुगाड यिंदके साक्षिगळु।

.. पगउडन शक्ष

बसवणगडन उय डडिगडनसक्षि

यित्तिवर सनुमतदिंद बरदात सेनबोग कलपन मग विरपन बरहा

०॥ नमस्तुंग.. शंभवे. स्वस्ति श्रीमन्नपशालिवाहन शके १५७६, जय नाम संवत्सर ज्येष्ठ शुद्ध १५ या दिवशीं हस्तिनावति वळितांतील हुलिगेरे नाड म्हणजे लक्ष्मेश्वर (लक्ष्मणेश्वर) सीमेचे देसाई खानपगौडा याचे धाकटे बंधू केंचणगौडा यांना तोरगल सीमेमधील सिरगुपि कसब्याचे गौड तिमाजिनायक यांचे पुत्र गोविंदराय याच्या पत्नी भवानी गौडति यांचा पुत्र ... गौड यानें दिलेलें भोगवटयाचें पत्र असें आहे :–आमच्या सिरगुप्पि पाटीलकीचे तीन भागीदार आहेत ते म्हणजे बोळपगौड, च्येंना गौडति व बदिवणगौड यांतील दोन भाग सोडून माझ्या हिश्श्याला आलेल्या जमीनीचा अर्धा भाग माझ्या स्वतःच्या कामासाठीं आपल्याकडे भोगवटचाला देत आहे. ही ५ मार किर्दी जमीन आपणाला देऊन आपणाकडून आम्ही हल्ली प्रचलित असलेली ३०० सणगेरे गद्याणाचीं नाणी घेतलीं. या जमीनीबद्दलच्या इनाम पट्टी, दुष्काळ पट्टी, वगैरे पटचांशीं आपला कांहीं संबंध येणार नाहीं आजपासून चार वर्षांनीं ३०० गद्याण परत देऊं दिले नाहींत तर

आमच्या हिश्श्यांतील अर्धा भाग प्राप्तिकर, हुगिहुलिसोप्पु, कटुवाण बक्षीस वगैरे हक्क लवाजिम्यासह आपणांस देऊं. आपण आपल्या पुत्रपौत्रांसह आचंद्रार्क याचा उपभोग घ्यावा.

७. छत्रपतींचीं दोन अस्सल पत्रें

(ले. स. मा. गर्गे)

कोल्हापूरचे श्री. अजितसिंह यशवंतराव घाटगे सर्जेराव ज्युनिअर कागलकर यांच्या दप्तरांत नुकतीच दोन अस्सल ऐतिहासिक पत्रें उपलब्ध झालीं. ती मिळवून देण्याच्या कामीं श्री. खंडेराव आनंदराव गायकवाड यांनीं मला सहाय्य केलें. दोघांचाहीं मी आभारी आहे. त्यांपैकीं एक पत्र शककर्त्या शिवाजी महाराजांचें, तर दुसरे छत्रपति राजाराम महाराजांचें आहे. या दोन्हीं पत्रांवर त्या त्या छत्रपतींच्या राजमुद्रा आहेत. अशीं अस्सल पत्रें सामान्यतः हातीं लागत नाहींत. पण हीं दोन्हीं पत्रें केवळ दुर्मिळ म्हणूनच नव्हें, तर आशयाच्या दृष्टीनें देखील त्या काळांतील कांहीं महत्त्वाच्या घटनांवर, विशेषतः छत्रपतींच्या ध्येयधोरणांवर प्रकाश टाकणारीं आहेत.

शिवाजी महाराजांची दोनशेंहून अधिक पत्रें आजवर उपलब्ध झालेली आहेत त्यांत कांहीं अस्सल तर कांहीं नकला आहेत. ज्या पत्रांवर छत्रपतींचें शिक्कामोर्तब असेल तें त्यांचें अस्सल पत्र होय. अशा पत्रांच्या नकला नंतरच्या काळांत भाऊबंदकीचे वाद किंवा तत्सम खटले पडल्यास पुराव्यादाखल सादर करीत. म्हणून त्यांनाही ऐतिहासिक संदर्भात, आशयाच्या दृष्टीनें विशिष्ट मर्यादेपर्यंत महत्त्वाचें स्थान देतात. पण नकलांमध्ये अनेकदां नक्कल करणारांचे हस्तदोष किंवा इतर उणिवा निर्माण होतात. त्यामुळें अर्थविपर्यास होण्याची शक्यता असते. म्हणून ऐतिहासिक पुराव्या-साठीं अस्सल पत्रच प्रमाण मानतात. या संदर्भात प्रस्तुत दोन पत्रांची ऐतिहासिक महती सहज लक्षांत येऊं शकेल.

मला उपलब्ध झालेलें शिवाजी महाराजांचें पत्र त्यांनीं कागलचे विठोजी घाटगे सर्जेराव यांना लिहिलेलें आहे. या पत्राच्या पाठीवर शिवाजी महाराजांची 'प्रतिपत्चंद्र' ही अष्टकोनी राजमुद्रा असून पत्राच्या शेवटीं 'मर्यादेयं विराजते' अशीं समाप्ती-मुद्रा (मोर्तब) आहे. पत्रांचें अस्सल स्वरूप, त्यांतील महत्त्वाचा विषय आणि स्वराज्याच्या साधनेंतील त्याचें विशिष्ट स्थान अशा सर्वच दृष्टींनी हें पत्र आगळें वाटावें असें आहे.

या पत्राचें एक वैशिष्टय लक्षांत येतें; पत्र वैयक्तिक स्वरूपाचें आहे. वैयक्तिक याचा अर्थ महाराजांनीं एखाद्या व्यक्तीशीं मनांतील विशेष हेतु व्यक्त करण्यासाठीं जिव्हाळ्यानें आणि आत्मीयतेनें लिहिलेले पत्र. प्रस्तुतचें पत्र त्याच स्वरूपाचें आहे त्यांत शिवाजी महाराजांनी विठोजी घाटगे यास आपल्या स्वराज्याच्या प्रयत्नांत सामील होण्याचें आवाहन केलें आहे. विजापूरच्या आदिलशाहाची ताबेदारी सोडून आपल्या पक्षाला येऊन मिळण्याचा आग्रह यांत केला आहे. या पार्श्वभूवीवर प्रस्तुत पत्र समजून घेणें उद्बोधक ठरेल.

या पत्राचें आणखी एक वैशिष्टय पत्राच्या माथ्यावर राजमुद्रा उठवलेली नसून ती पत्राच्या पाठीवर आहे. यासंबंधीचा तत्कालीन विशिष्ट संकेत लक्षांत घेतला तरच पाठीवरील राजमुद्रेचे निराळेपण समजू शकेल. जीं पत्रें राजाच्या कचेरींतून सरकारी कामकाजाच्या निमित्तानें पाठविलीं जातात, त्यांच्या माथ्यावर राजमुद्रा दिलेली असते. पण जीं पत्रें स्नेही, आप्त, बरोबरीचे, प्रतिष्ठित, साधुसंत, इत्यादींना लिहिलेलीं असत, त्या पत्रांच्या डोक्यावर राजमुद्रा न उठवितां, ग्राहकांच्या प्रतिष्ठेच्या चढत्या मानानें डाव्या बाजूस खाली खाली सरकत पत्रांतील राजमुद्रा देण्याची प्रथा असे. पाठीवर मुद्रा असलेलें पत्र सन्मानदर्शक आणि आपुलकीचे निदर्शक मानले जाई. ' थोरले महाराज पाठीवर शिक्का मारून आम्हांला पत्रें पाठवीत असत. ' असे अभिमानपूर्वक केलेलें उल्लेख पुढच्या काळांतील कांहीं पत्रांत आढळतात. शिवाजी महाराजांना आपल्याविषयी किती आत्मीयता होती, त्यांचा व आपला केवढा घरोबा होता, हे दाखविण्याचाही अशा उल्लेखामागें एक हेतु असे. प्रस्तुत पत्राच्या पाठीवर शिक्का दिलेला आहे. त्यावर प्रधान वगैरे कोणाचीही दुसरी मुद्रा नाही.

कागलकर घाटग्यांचें घराणें शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वीपासून वजनदार मानलें जात होते. त्या काळांतील अगदी निवडक अशा प्रतिष्ठित मराठा घराण्यांत त्याची गणना होती. विजापूरच्या आदिलशाही बादशाहांच्या हाताखालीं कागलकरांनी मोठी कामगिरी बजावली होती. त्या बादशाहींतून घाटग्यांन‌- जहागीर आणि सरंजाम मिळाला होता. अशा मातबर सरदाराला आपल्याकडे वळविण्याचा शिवाजी महाराजांचा प्रयत्न एका दृष्टीनें धाडसाचाच म्हटला पाहिजे. कारण, त्या काळांतील प्रतिष्ठित समजली जाणारी प्रमुख मराठा वतनदार घराणीं महाराजांच्या स्वराज्य-संपादनाच्या प्रश्नांकडे उदासीनतेनें, उपेक्षेनें आणि तुच्छतेनें पाहात होतीं. त्यांचा ओढा निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही यांसारख्या तत्कालीन सुलतानांकडे असे. त्यांच्याकडून मानमरातब मिळविणें, जहागिरी व वतनदारी वाढविणें आणि मग संबंधित सत्ता बळकट करण्यासाठीं जीव तोडून लढाया करणें, हींच त्यावेळच्या अनेक मराठा घराण्यांची निष्ठा व परंपरा होती. त्याच मानमरातबांत ते मशगूल

होते. जहागिरी वाढविण्यांत इतिकर्तव्यता मानीत होते. अशा प्रतिकूल परिस्थितीमुळें शिवाजी महाराजांना जावळीचे मोरे, सुप्याचे मोहिते, चांबळीचे सरनाईक, हिरडस मावळचे बांदल, सावंतवाडीचे सावंत, मुधोळचे घोरपडे इत्यादि बड्या असामींशीं दोन हात करावें लागलें. त्यांना पराक्रमानें बाजूला सारावें लागलें. प्रसंगीं त्यांना मारावें लागलें.


विठोजी घाटगे सर्जेराव हाही त्या वेळचा मातबर सरदार होता. त्याच्या घराण्याच्या अनेक पिढ्या आदिलशाहीशीं एकनिष्ठ राहिल्या होत्या. सर्जेराव हा किताब देखील विजापूरच्या संरक्षणासाठीं घाटग्यांच्या कोणा पूर्वजानें केलेल्या पराक्रमाच्या संदर्भांत या घराण्याला लाभला होता. विठोजीचे पूर्वज आणि भाऊबंद विजापूरच्या लष्करी छावणींतील तोलदार सेनाधिकारी मानले जात. सुलतानी हुकुमावरून त्यांनीं अनेक मोहिमा पार पाडल्या होत्या. त्यासाठीं सुलतानांकडून या घराण्याला मिळालेल्या जहागिरीच्या सनदा आजहि उपलब्ध आहेत.

इतक्या विविध सूत्रांनीं विठोजी घाटगे विजापूरच्या सलतनतीशीं निगडित होता. अशा फौजबंद सरदाराला आपल्या कार्यांत सहभागी करून घेण्याचा महाराजांचा प्रयत्न प्रस्तुतच्या पत्रांतील मजकुरावरून लक्षांत येतो. वस्तुतः हें पत्र म्हणजे विठोजीच्या पत्राला पाठविलेलें उत्तर आहे. त्यांचा अगोदर पत्रव्यवहार झालेला आहे. शिवाजी महाराजांनीं विठोजीला आपल्याकडे बोलाविलें. त्यावर विठोजीनें सरंजामाबद्दलच्या कांहीं अटी सुचविल्या. नंतर महाराजांनीं एका अभयपत्राच्या द्वारें त्या मान्य केल्या आणि त्या अभयपत्राचा संदर्भ देऊन प्रस्तुत पत्रांत महाराजांनीं विठोजीला पुन्हा आश्वासन दिलें. असा या पत्रव्यवहारांतील घटनांचा क्रम असावा. पत्रांत काळाचा निर्देश नाहीं हें त्याचें एक वैगुण्य आहे. पण कागलकरांच्या दप्तरांत अलीकडेच उपलब्ध झालेल्या इतर कागदपत्रांवरून प्रस्तुत कागदपत्राचा काळ ठरविण्यास मदत होते. या कागदपत्रांत आदिलशाहीच्या सनदा, फर्मान, घाटगे घराण्याचा करीना, खुद्द शिवाजी महाराजांच्या आणखी कांहीं पत्रांच्या नकला इत्यादींचा समावेश आहे. पत्राचा काळ ठरविण्यासाठीं बहलोलखानाचा रांगण्यावर हल्ला आणि विजापूरचें विठोजीला मिळालेले फर्मान (२५ जून १६६७) या दोन घटना लक्षांत घेतल्या पाहिजेत. फर्मानाचा आशय असा—

'तुम्हाकडील वकील देवजी खंडेराव यांनीं सांगितलेला मजकूर जाहीर झाला. किल्ला हातीं आल्यावर तुम्हांस किताब देऊन त्या परगण्यांत मोबदला जहागीर करून देऊं एक हजार होन बक्षीस व आबाजी घाटगेपेक्षा एक हत्ती व दोन घोडे..देऊ किल्ला काबीज करण्यास एक हजार स्वार पाठवून देऊं तुम्ही या दौलतीचे पुरातन सरदार आहां सबब हा सर्व मजकूर समजोन कृपेस पात्र व्हावें' इत्यादि.

या फर्मानांत किल्ला काबीज करण्याचा स्पष्ट उल्लेख आहे. आणि त्याबरोबरच किल्ला काबीज केल्यास मानमरातब व जहागीर देण्याचें प्रलोभनही आहे. त्यांतील उल्लेख रांगणा किल्ल्याचा असावा हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

विजापूरच्या बहलोलखानानें रांगण्यावर एप्रिल १६६७ मध्यें हल्ला केला आणि तो मोडून काढण्यासाठीं स्वतः शिवाजी महाराजांनीं मोहीम हातीं घेतली. त्यांनीं 'विजापूरचें सैन्य मारून काढलें' बहलोलखानाचा पराभव झाला. खानाबरोबर महाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजीही होता. पराभवानंतर विजापूरकरांनीं महाराजांना दर साल तीन लाख होन खंडणी देण्याचें कबूल करून सलूख केला (ऑगस्ट–सप्टेंबर १९६७). वरील सर्व घटनांच्या तारखा लक्षांत घेतल्या म्हणजे एप्रिल–मे १६६७ ते ऑगस्ट-सप्टेंबर १६६७ च्या दरम्यान विठोजी घाटगे आणि शिवाजी महाराज यांचा पत्रव्यवहार झाला असावा असें म्हणतां येतें. असो. पत्र असें—






श्री

राजश्री विठोजी घाटगे गोसावी यांसी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य[मो. जा.*] प्रति राजश्री शिवाजीराजे उपरी तुम्ही पत्र पाठविलें तें पावले अभिप्राये कलो आला सरंजामीच्या कामाच्या गोष्टी कितेक लिहिल्या तरी जैसे काम कराल तैसे आम्हीहि बरें करून प्रस्तुत जरी आमचे सेवेस अंगीकार असाल तरी जे जमेती तुम्हापासी असेल ते घेऊन येणें भेटी घेणें भटी नंतर तुमचा बरल्याख सरंजाम करून येविसी पहिलेच अभयपत्र पाठविले असे आताही हें अभय-पत्रच जाणून सीध्र येणे जमेत बरीं आणणे बरे घोडे, बरे माणूस पाहोन जे होईल ते ठेऊन फटकाल ठेवणार नाही कलले असावे मर्यां/देयं विराजते

[पाठीवर शिवाजीचा अष्टकोनी शिक्का. *]



वरील दुसरें पत्र छत्रपति राजाराम महाराजांचें आहे, आणि त्यावरही तारीख नाहीं; पण पत्रांतील प्रसंगाचा उल्लेख स्पष्ट आहे.

हें राजाराम महाराजांनी जिंजीहून परत आल्यावर पिराजी घाटगे यांस लिहिलें आहे. पिराजी हा विठोजीचा मुलगा. राजाराम महाराज जिंजीहून १६९८ फेब्रुवारी-मध्ये महाराष्ट्रांत परत आले. पत्रांतील तक्रारीवरून राजाराम महाराजांच्या सैन्याने कागलकरांच्या जाहगिरीला उपसर्ग पोचविला असावा. तो नाहींसा करावा म्हणून पिराजीनें छत्रपतीकडे मागणी केली. यापुढे उपसर्ग पोचणार नाहीं, असें छत्रपतींनीं आश्वासनही दिलें. त्यांनीं आपल्या लष्करच्या लोकांना ताकीद-पत्रें पाठविलीं आणि 'या उपरी उपसर्ग देणार नाही, तुम्ही आपले समाधान असा देणे' असा दिलासा दिला आहे. राजाराम महाराजांच्या स्वभावावर आणि वागण्याच्या विशिष्ट पद्धतीवर या पत्रानें चांगलाच प्रकाश पडतो. पत्र पाठ असा–

[२ ते ५ ओळींच्या डाव्या अंगास छत्रपति राजारामाची धर्मप्रद्यो. ही मुद्रा व शेवटीं मर्या. ही मर्यादा.*]

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री पिराजी घाटगे यासी प्रति राजश्री राजाराम छत्रपति उपरी तुम्ही पत्र पाठविले ते प्रविस्ट जाहले स्वामी कर्नाटक प्राताहून या प्रातास आले हे वर्तमान आइकोन बहूत समाधान वाटले म्हणून हे वर्तमान तपसिलें लिहिले ते विदीत जाहले यैशास स्वामीच्या आगमने तुम्हास संतोष वाटावा हे उचितच आहे व त्या प्राते स्वामीच्या लस्करच्या लोकी बहूतच उपसर्ग दिल्हा काही हाल राहिला नाही पुढेही उपसर्ग होतच आहेत म्हणून हे वर्तमान तपसिले लिहिले तें विदित जाहाले यैशास लस्कराच्या लोकांस ताकीद-पत्रें पाठविली आहेत ते या उपरी उपसर्ग देणार नाहीत तुम्ही आपलें समाधान असो देणे नि. बहूत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा मर्या देयं विराजते.

८. दोन जुनीं पत्रें

(प्रा. दि. के. देशपांडे, अमळनेर)

प्रस्तुतचे दोन कागद माझ्या संग्रहांतील आहेत. पहिला कागद म्हणजे अहिल्या-बाईनें आपल्या मुलाचें न ऐकतां माझ्या आज्ञेप्रमाणें वागलें पाहिजे अशा आशयाची ताकीद आहे. दुसऱ्या कागदांत पंढरीच्या यात्रेचा जमाखर्च दिलो आहे. त्यांतील २३ च्या तपशीलांत कोठें तरी एक रुपयाची चूक होत आहे.

श्री

सु. ११९२ रमजान२७	पौ छ. २८ रमजान वैशाख वद्य ३० रविवार घटका रात्र सन इसने तिसेन	श. १७१४ वैशाख वद्य १४ इ. १७९२ मे १९

राजश्री आनंदराव गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य [मो. जा.*] अहिल्याबाई होळकर दंडवत सु इसने तिसेन मया व अलफ तुम्ही चिरंजीव राजश्री मल्हाररावसुद्धां सेंधव्यास आल्या-नंतर चिरंजीवाचा तुम्हासहित मुक्काम करून राजश्री लक्ष्मण मल्हार यांजला बोलाविले त्यांचे वर्तमान यैकून चिरंजीव राजश्री तुकबाकडे पत्रे रवाना केला. चार तेथून कारकून व पागा वगैरे सरंजाम रवाना केला आहे. ते अल्यानंतर जो सेवून करणे तो केला जाईल असे ठैरावून मशारनिलेची रवानगी आगोदरच केली ते येवून

पोहोचले नाहीत तो तुम्ही चिरंजीवासहित कूच करून काल शुक्रवारी नागलदाडी आला म्हणोन विदित जाले ऐसियासी येथील पत्राखेरीज चिरंजीवाचे सांगितल्यावरून कूच करून अलिकडे आला हे ठीक न केले हली हे पत्र सादर केले असे तरी अथ:पर पत्रदर्शनी कूच करून माघारे सेंधव्यास जावून चिरंजीवाकडील कारकून वगैरे येत तोपर्यंत जाबता चांगला राखणे चिरंजीव तुमचे जरबेत असता तुम्ही त्यांचे वोटीने कूच करून आलिकडे आला हे गोष्ट तुमचे सादधानीस चांगली नाही यापरी येथील पत्राखेरीज चिरंजिवाचे सांगितल्यावर न जाता जानता उत्तम प्रकारे राखणे जाणीजे छ २७ रमजान बहुत काये लिहिणे [वा*] मोर्तब/बसुद

श. १७२७ क्रोधी आषाढ	श्रीशंकर	श. १७२७ आषाढ इ. १८०५ जून–जुलै

यादी श्रीपंढरिची यात्रेसंबंघी खर्च शके १७२७ क्रोधीनाम संवत्सरे आषाढ शुा १

जमा		नावे	
१५	जमा रोख रुपये	३	जेजोरी ता श्री पंढरी पयवाट खर्च
१५।	नाणे रुपये	२३।=।	श्री पंढरीस मुकाम रोज १२
३०।		४।	महापूजा
		५८=	देवब्राह्मण
		२॥	घोडीस दाणा हरबरे
		३॥	किरकोळ खर्च घोडीस वैरण
		१	राघु आंबरक
		१॥।	पोटगी खर्चास घरचे भटजीस
		१।–	गीतेचे पुस्तक
		१	किता पोटगीस तांदूळ व डाळ व तूप
		.॥.	कुंकु बुक्का
		८८=।	गोपीचंदन काडीचे बीज
		८–	चिकणी सुपारी
		१	किता खुरदा नाणे मोडले ते समई
		२	धर्मादाय व ब्राह्मणास संभावना
		२३।=।	
		१॥।	जाते, समई खुर्दा करणे
		१	किता हरभरे
		।	राघू घोंगडी करता
		८–	सिलक
		१	घोंगड्या सा २
		३०।=।	

९. पेशवे-इंग्रजांचा वसई-तह व त्याचे परिणाम

(प्रा. **गजानन भिडे**, दयानंद महाविद्यालय, सोलापूर)

सातारा येथील रा. ब. द. बा. पारसनीस वस्तु-संग्रहालयांत असलेल्या पटवर्धनांकडील कागदपत्रांच्या रुमालांतील ही दोन अस्सल व अप्रकाशित पत्रें आहेत. पहिल्या पत्राचा लेखक बाबाजीपंत या नांवानें प्रसिद्ध असलेला रामचंद्र श्रीधर फडणीस हा असावा. हा लेखक पुणें दरबारांतील रामचंद्र आप्पा जमखंडीकरांचा वकील होता. दुसऱ्या पत्राचा लेखक बाळकृष्ण हरि हा आहे. दोन्ही पत्रें पुण्याहूनच लिहिलेलीं असून तीं अंदाजें ३ जून नंतर व ५ जून १८०४ ला लिहिलेलीं असावीं.

इ. १८०२ नंतर मराठ्यांच्या दरबारांत किंवा राजकारणांत इंग्रजांनीं कशा प्रकारें आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें, तसेंच तत्कालीन मराठे सरदारांची स्थिती काय होती, त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोण कशा प्रकारचा होता, इत्यादि संबंधी माहिती मिळविण्यास हीं पत्रें उपयुक्त आहेत.

सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाई कारभार खिळखिळा होऊन तिची इतिश्री करण्यासाठीं जमेल त्यानें उठावें व धुमाकूळ घालावा अशीं सर्वत्र दृश्यें दिसूं लागलीं. कोल्हापूरच्या छत्रपतींनीं कित्तूर, निपाणी, इचलकरंजी, पटवर्धन सरंजामांवर आपल्या फौजेची धाड नेण्यास सुरवात केली. सातारच्या छत्रपतींनीं एकदोन साहसिकांच्या मदतीनें गडबड चालू केली. निपाणी येथील देसायांनीं हाच कित्ता गिरविला; तर शिंदे व त्यांच्या ओंजळीनें पाणी पिणारे दु. बाजीराव पेशवे यांचें लक्ष स्वार्थाशिवाय दुसरीकडे कोठेंच नव्हतें. या परिस्थितीचा फायदा घेऊन इंग्रजांनीं मराठी दरबारांत आपलें वर्चस्व कशा रीतीनें प्रस्थापित केलें हें या पत्राधारें स्पष्ट करतां येतें.

टिपूच्या मृत्यूनंतर (४ मे १७९९) व हैद्राबादच्या नवाबाबरोबर तैनाती फौजेचा तह केल्यावर (१२ ऑक्टोबर १८००) इंग्रजांना भारतांत विरोध करणारी मराठ्यांची एकमेव सत्ता उरली होती. मराठी सत्तेवर प्रभुत्व प्रस्थापित केल्याशिवाय भारतांत पूर्णांशानें सत्ता उपभोगतां येणार नाहीं, हें ओळखून गव्हर्नर-जनरल वेलस्लीनें अधिकारावर येतांच मराठी साम्राज्यांत अधिकाधिक शिरकाव करून घेण्याच्या प्रयत्नास सुरुवात केली. तथापि नाना फडणवीस जिवंत असेपर्यंत त्याच्या या प्रयत्नांना यश आलें नाहीं. नाना फडणविसाच्या मृत्यूनंतर (१३ मार्च १८००) निर्माण झालेल्या गोंधळाचा इंग्रजांनीं फायदा घेण्यास सुरुवात केली. यशवंतराव होळकरांच्या पुण्यावरील स्वारीला घाबरून सहाय्यार्थ आलेल्या इंग्रजांनी दु. बाजीराव

पेशव्यांबरोबर वसईचा तह (३१ डिसेंबर १८०२) करून मराठी साम्राज्याच्या सत्ताधीशालाच आपल्या प्रभावाखालीं आणलें. तथापि समकालीन सरदारांमध्यें बाजीरावाला काय स्थान आहे याची जाणीव असल्यामुळें, मराठी सत्तेचा पूर्णपणें ताबा मिळविण्यासाठीं इंग्रजांनीं शिंदे, भोसले, होळकर, रास्ते, पटवर्धन इत्यादि सरदारांवर आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करण्यास सुरुवात केली.

टिपूच्या मृत्यूनंतर गव्हर्नर-जनरल वेलस्लीनें म्हैसूरच्या व्यवस्थेसाठीं आपला बंधू जनरल वेलस्ली याची नेमणूक केली होती. तथापि वसईच्या तहानुसार बाजीराव पेशव्याची गादीवर पुनः स्थापना करण्यासाठीं व त्या अगोदर पुण्यांत शांततेचें वातावरण निर्माण करण्यासाठीं ९ मार्च १८०३ ला पुण्याला जाण्याबद्दल आदेश देण्यांत आला. (Poona Residency Correspondence Vol X, P. 83, Martin, Wellesley's despatches Vol III, P. 80). २० एप्रिलला पुण्याला आल्यानंतर १३ मे १८०३ ला त्यानें बाजीरावाची पेशवेच्या पदावर पुनः स्थापना केली. भोसले (१७–१२–१८०३) व शिंदे (२०–१२–१८०३) यांशीं झालेल्या तहानंतर तो मार्च १८०४ मध्यें मुंबईला गेल्याची माहिती मिळते. [ऐतिहासिक लेख-संग्रह भाग १५ पत्र ६८४४] त्याच सुमारास यशवंतराव होळकरानें उत्तर हिंदुस्थानांत इंग्रजांच्या प्रदेशाची नासधूस करण्यास सुरुवात केली. होळकराबरोबर मैत्रीचा तह होणें अशक्य आहे हें पाहून तसेंच त्यांच्या हालचाली उत्तर हिंदुस्थानांत वाढू लागल्यानें गव्हर्नर- जनरल वेलस्लीनें १६ एप्रिल १८०४ ला होळकरांविरुद्ध युद्ध जाहीर केलें. (Sardesai, New History of Tlhe Marathas Vol III, P. 424) व आर्थर वेलस्ली आणि लेक यांना होळकरांच्या विरुद्ध ताबडतोब युद्ध सुरू करण्याचे आदेश दिले. तथापि आर्थर वेलस्लीनें आपलें नेहमींचें वास्तव्याचें ठिकाण रणभूमी पासून लांब असल्यामुळें व सैन्याला दुष्काळी भागांतून येतांना रसद पुरवठा होणार नाहीं या सबबीवर होळकराविरुद्धच्या मोहिमेंत भाग घेण्यास नकार दिला. (Gurwood, Wellington's Despatches, Vol III, P. 231) उत्तर हिंदुस्थानांत जाण्यास आर्थर वेलस्लीने नकार दिला असला तरी, या मोहिमेचा आराखडा करून देण्याची दक्षिण हिंदुस्थानांतील नेतृत्वाची जबाबदारी त्यानें स्वीकारली. या वेळेसच गव्हर्नर-जनरलनें जनरल वेलस्लीला युद्धविषयक स्वतंत्र निर्णय घेण्याचे, आवश्यक त्या सरदारांची सेवा घेण्याचे, खास बक्षिसें देण्याचे, व शिक्षा करण्याचे अधिकार दिले.

पत्रलेखकानें सांगितल्याप्रमाणें जूनच्या पहिल्या आठवड्यांत आर्थर वेलस्ली पुण्याला आला असावा. पुण्याला येतांच त्यानें होळकरांचें बंड मोडण्यासाठीं 'तुमच्या सर्व सरंजामदारांची मदत द्या' म्हणून पेशव्यांकडे मागणी केली. तथापि बाजीरावाच्या पत्राला सरदार कितपत किंमत देतील यासंबंधीं माहिती व अनुभव असल्यामुळें त्यानें पेशव्याला त्याच्या सर्व सरंजामदारांची यादी इंग्रजांकडे देण्याची

सूचना केली. जनरल-वेलस्लीला पेशव्यांच्या सर्व सरदारांची लष्करी मदत हवी होतीच; पण त्याचबरोबर सर्व मराठे सरदार इंग्रजाविरुद्ध एकत्र येऊं न देणें हा महत्त्वाचा हेतू मदत मागण्यामागें असावा. म्हणूनच जनरल वेलस्लीनें 'पत्र पाठवूनही, जे येणार नाहींत त्यांचे सरंजाम जप्त केले जातील असा स्पष्ट इशाराही त्याच वेळीं दिला असें या पत्रावरून दिसतें. ऐतिहासिक लेख-संग्रहाच्या भाग १५ पत्र ६३४४ मध्यें "इंग्रजांनीं सर्व लहान थोर सरदारांनीं आम्हांबरोबर होळकरांच्या पारिपत्यास यावें, त्यांची खर्चाची वगैरे बंदोबस्ती आम्ही करूं. न आले असतां पारिपत्य करूं" असा स्पष्ट इशारा दिला असल्याची माहिती मिळते. त्याचप्रमाणें उपर्युक्त भाग १५, पत्र ६८४५ मध्यें बंडाच्या पारिपत्यासाठीं पटवर्धन व रास्ते यांशिवाय सर्व सरदारांना पत्रें पाठविल्याची माहिती दिली आहे.

यशवंतराव होळकराविरुद्ध होणाऱ्या या युद्धांत रास्ते, विंचूरकर, गोखले, निपाणीकर, शिंदे, भोसले इत्यादि सरदारांनीं इंग्रजांना मदत करण्याचें ठरविलें असल्याची माहिती पत्र-लेखकानें दिली आहे. त्याचबरोबर "कोणी जाण्यास रहात नाहींत, राहतांना आपणच राहतों" असेंही म्हटलें आहे. पुण्याहून बाळाजीपंत पटवर्धन यांनीं चिंतामणराव आप्पाला १४ जुलै १८०४ च्या सुमारास लिहिलेल्या पत्रांतही, "विंचूरकर, रास्ते इ. मातवर सरदारांनीं बंडाच्या पारिपत्यासाठीं इंग्रजांच्या मदतीला जाण्याचें कबूल केलें असल्यानें आपणही कबूल करावें अशीं विनंती केली आहे. (ऐ. ले. सं. १५, पत्र ६८७४) प्रत्यक्षांत युद्धाच्या वेळीं शिंदे व भोसले हे मदत करीत असल्याची माहिती अनेक मराठी व इंग्रजी कागदपत्रांवरून आढळते. तथापि पटवर्धन, रास्ते, विंचूरकर, गोखले, इ. पैकीं कोणत्या सरदारांनीं कशी मदत केली याबद्दल माहिती मिळत नाहीं. पटवर्धन, रास्ते. यांनीं सरकारच्या आज्ञा पाळल्या नाहींत म्हणून त्यांचे सरंजाम जप्त करण्याविषयीं कांहीं खटपटीही चाललेल्या दिसतात (ऐ. ले. सं. भा. १५, पत्र ६८५८.)

इंग्रजांनीं भारतांत आपली सत्ता कशी प्रस्थापित केली याबद्दल माहिती देणारे प्रातिनिधिक स्वरूपाचें हें एक पत्र आहे. इंग्रजांनीं एतद्देशीय सत्ताधीशांवर प्रभुत्व प्रस्थापित करून राज्यविस्तार करण्यासाठीं मिळालेल्या प्रत्येक संधीचा पुरेपूर फायदा घेतला. यासाठीं त्यांनीं वेळप्रसंगीं साम-दाम-दंड-भेद या चारीही प्रकारांचा उपयोग केला. आपला कार्यभाग साधतांना त्यांनीं शत्रूंना व मित्रांना एकाच मापानें मोजलें. इंग्रजांचा व पटवर्धनांचा स्नेह असतांनाही पत्रलेखक म्हणतो, "श्रीमंतांनीं इंग्रजांनीं मागितल्याप्रमाणें निखालस याद लिहून दिली, तेव्हां इंग्रजांनीं वडिलांविसीं चांगुलपणाचा आग्रह तो कशाकरितां धरावा? त्यांचें साधनच होतें. ते कोणाची येण्याविसीं वाट पाहात नाहींत; हातीं शस्त्र सापडलें; आडवें येईल त्यास कापून काढावें." अशी इंग्रजांची पद्धत आहे.

इ. १८१८ ला ब्रिटिशांनीं मराठी सत्तेचा ताबा मिळविला असला तरी, प्रत्यक्षांत मात्र त्यांनीं १८०२ पासूनच मराठी सत्तेचा ताबा मिळविण्यास प्रारंभ

केला होता. १८०२ च्या तहान्वयें मराठी सत्ताधीशाला त्यांनीं आपल्या हातातलें बाहुलें बनविलें. मराठे सरदारांनाही मदतीचें फर्मान काढण्याचें, त्यांचे सरंजाम जप्त करण्याचें अधिकार इंग्रजांनीं मिळविले. १८०२ पासूनच इंग्रज हीच मराठी दरबारांतील एकमेव बलवान सत्ता झाली. पत्रलेखकही आपण इंग्रजांस विरोध केल्यास किंवा त्यांच्या मागणीला नकार दिल्यास आपणांस किती अवघड जाईल याचा वारंवार उल्लेख करतांना दिसतो.

इंग्रजांच्या या वाढत्या शक्तीबरोबरच पत्रलेखकानें मराठे सरदारांची जी माहिती दिली आहे. ती तत्कालीन मराठे दरबारांच्या विदारक परिस्थितीचें चित्र डोळ्यासमोर उभे करते. इ. १८०२च्या तहानें बाजीराव पेशव्यांच्या हाल-चालींवर बंधन पडलें असलें तरी त्या काळांत मराठे दरबारांत कोणीही सरदार इंग्रजांना पायबंद घालण्याच्या हिमतीचा राहिला होतासें दिसत नाहीं. छत्रपती शिवाजी महाराजांनीं स्वकर्तृत्वावर प्रस्थापित केलेल्या व थोरल्या बाजीरावासारख्या वीरांनीं देदीप्यमान पराक्रमानें विस्तारलेल्या स्वराज्याचें, वेळप्रसंगीं आत्मत्याग करून रक्षण करणें आवश्यक आहे ही भावनाही तत्कालीन सरदारांच्या मनांत असल्याचें दिसत नाहीं. उपर्युक्त पत्रांत बळवंतरावजी म्हणतो, 'खावंदाच्या स्वाधीन कांहीं कोणताही प्रकार राहिला नाहीं. आपलाली घरें संरक्षण करावी इतकाच प्रकार राहिला आहे.' रास्त्यांचे वकील तर स्वतःचें रक्षण करण्यासाठीं इंग्रजांच्या मदतीस जाणार असल्याचें सांगतात. स्वराज्य रक्षण ही भावनाच नष्ट होऊन स्वतःच्या सरंजामाचें संरक्षण कसें होईल हीच काळजी प्रत्येकाला लागलेली दिसते. या काळांतही क्वचित् यशवंतराव होळकरासारखा स्वराज्यासाठीं व त्याच्या रक्षणासाठीं आत्म-समर्पण करणारा शूर सरदार आढळतो. तथापि स्वार्थांध बनलेल्या सरदारांना त्याची हाक म्हणजे अरण्यरुदनच ठरलें. त्यामुळेंच या काळांतील प्रत्येक मराठा सरदार इंग्रजांची जास्तीत जास्त मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न करतांना दिसतो. निदान इंग्रजांच्या विरुद्ध तरी जाणें नको अशी वृत्ती त्यांच्यांत बळावल्याचे या पत्रावरून दिसते.

खुद्द पेशव्यांचीही अवस्था मराठी सरदारांप्रमाणेंच झालेली दिसते. दु. बाजीराव पेशव्यांनीं नाईलाजानें वसईचा तह केला असें सांगितले जाते, किंवा ते स्वतःही तसें सांगतात. या तहांतून बाहेर पडण्याचाही प्रयत्न त्यानें केल्याची कांहीं कागद-पत्रांत माहिती मिळते. तथापि १८०२ नंतरच्या किंवा त्या अगोदरच्या बाजीरावाच्या कर्तृत्वाकडे पाहिल्यास या माणसाच्या हातून इंग्रजांसारख्या बलवान शत्रूंशीं मुकाबला झाला असता अशी पुसटशी कल्पना सुद्धा मनांत येत नाहीं. उपर्युक्त दोन्ही पत्रांत दिलेल्या माहितीवरून, १८०४ नंतर पेशवे किंवा त्यांच्या सरंजामदारांची धडपड ही स्वार्थांध आत्मकेंद्रित धडपड होती, त्यांत स्वातंत्र्य रक्षणाचा पुसटसा विचारही नव्हता असें दिसतें. असो. पत्रें अशीं—

सफर २४ नंतर } श्री { श. १७२६ वैशाख वद्य ३०
इ. १८०४ जून ३

विज्ञापना जनरल वेलस्लीसाहेब बंडाच्या पारपत्यास जावयाकरिता मुंबईहून निघोन आले ते पुण्याचे नजीक चिंचवड येथें मुक्काम करून आठ दहा दिवस राहून सडे पन्नास तुरुक स्वारांनिसी छ. २२ सफरी येथील व टोपीकरांचे सैन्यात प्रातःकाळचे प्रहर दिवसास आले पुढें सामोरे राजश्री बापू फडके गेले होते समागमे झाडून सरंजाम सरकारचा गेला होता इंग्रजांचे बोलणें सरकारांत पडलें कीं आम्ही बंडाच्या पारपत्यास जातो सरकारची फौज बरोबर द्यावी त्याजवर सरकारचे उत्तर देतो म्हणोन जहाले तेव्हा त्यांचे बोलणे पडले गुदस्ता चाळीस हजार फौज हुजुरात सरंजामी द्यावयाचा ठराव होऊन सरदारांस पत्रें गेली परंतु कोणी आले नाहींत निपाणीकर व गोखले उभयता आले त्यासहि खर्चास आम्हीच दिल्हे त्यास गुदस्ताप्रमाणें साल मजकुरी होईल सरकारचीं पत्रें सरदारांस जातील परंतु कोणी यावयाचे नाहींत याजकरिता झाडून सरंजामीयांची याद लिहून आम्हाजवळ द्यावी जे येतील त्यांचे सरंजाम कायम रहातील, कोणी येणार नाहींत त्यांचे सरंजामाची जप्ती करू या अन्वये बोलणें जाले ते सरकारचे मर्जीस येऊन सरंजामीयांची याद लिहून इंग्रजांकडे दिल्ही हे वर्तमान परभारे समजलेच होते व छ २४ सफरी राजश्री बळवंतरावजी यांनीं मला बोलावून हा वृत्तांत सविस्तर सांगितला आणि विचारले कीं, यांसी पुढे मसलत कशी येथील प्रकार म्हणाल तरीं सर्व ग्रास जाहला. खावंदाचे स्वाधीन कांहीं कोणताहि प्रकार राहिला नाहीं यास कसे आपलाली घरे संरक्षण करावी इतकाच प्रकार राहिला आहे यास्तव पोक्त मनसुबा होऊन ज्यांत सर्वांचे कल्याण ते करावे मी उत्तर केलें वडिलांनी आपलें दौलतीचा सर्व विश्वास तुम्हांवर ठेविला व श्रीमंताची कृपा आपल्यावर पूर्ण तेव्हां श्रीमंतास विनंती करून आम्हास जे सांगणें ते तुम्हीच सांगावे तेव्हां ते बोलले कीं सरकारांत फौज देण्याविसीं इंग्रजांचे नेट त्याअर्थी जातो म्हणोन मान्य केले आणि तुम्ही न गेला अथवा आम्ही इंग्रजा-समागमे जात नाहीं म्हणोन साफ सांगितले नंतर इंग्रजांनीं बदनजर केली असता त्याचा निर्वाहहि तुमच्याने न जाहला यात कोणतेहि करण्याचा मुखत्यार रहात नाहीं याजकरिता बोलण्यात आल्याप्रमाणें तपशीलवार लिहून पाठवावे तेथे सर्वत्र मिळोन मनसबा लिहून पाठवितील त्याअन्वयें येथें बोलण्यास ठीक पडेल तुम्ही आम्ही व्यर्थ वाटाघाट करून फळ नाहीं जलद पत्रे जाऊन उत्तरें समर्पक यावीं मीहि पत्र लिहून देतो आपण सांगितल्याप्रमाणें लिहून उत्तर आणवितो म्हणून मान्य करून घरास आलो तो राजश्री बाळाजीपंत बाबा निा विंचूरकर यांचे बोलावणे आले त्याजकडे गेलो त्याणी सांगितले गुदस्ताचा दिवस तोच आज प्राप्त जाहला तेव्हां चौघांनीं एक विचार करून गेलो, परंतु हल्ली मिरजेचे बोलणे पडले विंचूरकर आम्हांबरोबर द्यावे तेव्हां सरकारची निकड आम्हास लागली की तुम्ही इंग्रजासमागमे बंडाचे पारपत्यास जावे जाता नाहीं ते स्पष्ट सांगावे तेव्हां विचारता

पडोन जातो म्हणोन मान्य केले नाही म्हणावे तरी सध्याच परीक्षा पहावी आम्ही नेहमीं दिवसरात राहून हे सांगणे नाही म्हणू तरी आजच जप्ती याजकरिता सर्व इतिहास लिहून जलद पाठवावे सर्वांनी एक विचार करावा यांत बरे अथवा वाईट काय होणे असेल ते होऊ परंतु आम्ही श्रीमंताचे पायाशी एकनिष्ठतेने आहो तरी कोठेहि गेला तथापि श्रीहरी यश चांगुलपणाचें देईल. व्यर्थ चौघांनी चोहोकडे ओढून फळ नाही ओढण्यात सरकार दौलतेस अपाय जहाला त्याचा उपाय आमच्याने न होता आपलाले दौलतीसही मुकतो एकविचारे आहो तरी जे म्हणू तेच करू परंतु तितके खंबीर वचनाचे पाहिजेत याजकरिता यजमानास लिहून येथील सर्व भाव कळवावा आणि तेथे सर्वत्र एकजागी मिळोन मनसबा ठरवून आम्हास जैसे कर्तव्य असेल तैसे लिहले जावे याप्रसंगी कोणी कोणास न मिळे असे घडो नये याअन्वये बोलणी होऊन आलो आणि उभयतांचे बोलण्याचे अर्थ वडिलांस विदित व्हावे म्हणोन विस्तारे लिहिले आहेत याजउपरी वडिली मनसबा करणे तो पोक्त केला पाहिजे गुदस्ता निश्चय केला तो आजपावेतो निभावला परंतु यावेळेस गुदस्ताप्रमाणे केल्याने निभावणी पडावयाची नाही कारण श्रीमंतांनी निखालस इंग्रजांनी लिहून मागितल्याप्रमाणे याद दिली तेव्हां इंग्रजांनीं वडिलांविसी चांगुलपणाचा आग्रह तो कशाकरिता धरावा त्यांचे साधनच होते ते कोणाची वाट येण्याविसी पहात नाहींत हातीं शस्त्र सापडले, आडवे येईल त्यास कापून काढावे असे जाहले खावंदांनीं कृपा करावी तरी ते अर्थ राहिले मनोदयानरूपच घडते याजकरिता इंग्रजासमागमे जाण्याचा निश्चय करावा तरच परिणाम नाही तर चांगला मार्ग दिसत नाही यावेळेस ओढ अगदी धरू नये राजश्री शामरावबाबा रास्ते व त्यांजकडील बाबा फडणीस यांस बळवंतराव यांणी बोलावून आणिले आणि जसे मला सांगितले त्याअन्वये त्यास सांगून विचारले त्याजवर बाबा फडणीस यांनी मुखत्यारीचे उत्तर सांगितले की सरकारची मर्जी आहे त्याप्रमाणें आम्हास करावयाचे आजच घर बुडवून घ्यावयाची नाहीत आम्ही आज्ञेप्रमाणें इंग्रजासमागमे जातो याप्रमाणें निखालस उत्तर सांगून गेले गुा रास्ते विंचूरकर आपल्याच मनसब्यावर गेले हल्ली प्रसंग ओळखून उभयतांनी एकविचार केला वरकड लहान मोठे जातच आहेत गोखले निपाणीकर यांनी टोपीकरांची मर्जी संपादिली त्यापक्षी तेही जातील रहाताना आपण राहतोत शिंदे भोसले यांच्या फौजा जातात उभयता फौज जाऊन पलटणास सामील जहाले कोणी जाण्यास रहात नाहीत ज्यामार्गे सर्व लागले त्याच पंथे जाणे प्राप्त एकल्याने ओढल्यास शेवट कसा लागेल जाण्याचा निश्चय करून रावजीस पत्र यावे म्हणजे प्रसंग जसा पडेल तसे करितील रावजीचे मनात आपण जावे असे नाहीं सरकार आज्ञेप्रमाणेच चाकरीस जातो असे पत्र आले म्हणजे कोणी चांगला माणूस फौजेत देऊन रवानगी करावी इंग्रजांचा व सरकारचा नेट खाशांनींच यावे असा पडल्यास वडिलांशिवाय त्रिवर्गातून एकाने यावें अशीच बोलणी पाहून नंतर घडणार घडेल ते घडो याप्रमाणे रावजीचे म्हणण्यांत आले आहे वडील

करवीरकरांचे पत्र येऊन लिहितील त्यास चाकरीस जाण्याचा निश्चय करून मग सरकारात व इंग्रजाकडे लिहावे म्हणजे त्याचा निर्वाह तेच करितील न करित तर जाणेही होणार नाहीं परंतु चित्तांतून जाण्याचे नाहीं म्हणोन दाखविल्यास बरे आहे म्हणतील परंतु तिकडून विघ्न उत्पन्न केल्यास त्याचाही निर्वाह करणें संकट पडेल याजकरिता जाण्याचा निश्चय जाहला असता करवीरकरही स्वस्थ राहतील इंग्रजांची व सरकारची मर्जी प्रसन्न राहील जिकडे जावयाचे तिकडे मनसबेच आहेत ते अर्थ सर्व वडिलांचे ध्यानात आहेत राजश्री बळवंतरावजी व बाळाजीपंत बाबा यांणी वडिलांस पत्रे दिल्ही ती पाठविली आहे. त्यांची उत्तरे त्यास समर्पक यावी उत्तरे लौकर आली म्हणजे येथील बोलणी कशी पडतात त्यास उत्तर करावयास ठीक पडेल जाणून विनंती लिहिली आहे सारांश सरकार दौलतीस उपयोग आपल्या दौलती कायम रहात असा सर्वांचे विचारे मनसबा पोक्त व्हावा विदित होय हे विज्ञापना

सफर २६ } श्री { श. १७२६ वैशाख वद्य १२
इ. १८०४ जून ५

सेवेसी बाळकृष्ण हरी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना

ताा छ. २६ सफर पोा/मुक्काम पुणें येथें स्वामींच्या कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष जनरेल वस्लीसाहेब बहादूर बंडांच्या पारपत्यास जावयाकरिता मुंबईहून निघोन चिंचवडानजीक मुक्काम करून राहिल्याचे पेशजी जासुदाबरोबर सेवेसी लिहिले आहे अलीकडे छ. २२ रोजीं जनरेल येथें येऊन बोलणी पडली त्यातील अर्थ व राा बळवंतरावजी व राजश्री बाळोबा यांच्या बोलण्यांतील अर्थ राजश्री बाळाजीपंत यांनीं लिहिलें ते व उभयतांची पत्रें दिल्ही तीहीं मशारनिल्हेची पाठविली आहेत ती मनन करून सर्वांच्या विचारे मनसबा पोक्त होऊन उत्तरे यावी त्या अन्वये येथें राजश्री बाळाजीपंत बोलतील व मीही जनरेल यांसी बोलेन जनरेल यांच्या मते बहुतकरून खाशांनी यावे असेच पडले झाडून सरंजामाच्या याद्या सरकारकडून इंग्रज बहादूर यांजकडे आल्या. त्यापक्षी तमा कांहींच राहिली नाहीं कोण न येईल त्याचे सरंजाम परिछिन्न जप्त होतात याप्रमाणें रा. गोविंदरावजी यांचेहि म्हणणें लिहावयास सांगितलें त्यावरून लिहिले आहे मनसबा होऊन उत्तरें येणें ती राा बाबाजीपंताकडे यावी व मजकडेहि यावी त्या अन्वये बोलावयास येईल सरंजामाच्या याद्या इंग्रजाकडे दिल्ह्या हे वर्तमान मला कळल्यावरून मी रा। बाबाजीपंत याजकडे येऊन येथील अर्थ समजोन घेऊन विनंती लिहावी असा बेत केला होता तो रा बळवंतरावजी व राा बाळोबा बाबा यांचे बोलणें जहाल्यावरून मशारनिल्हेंनीं मला येण्याविसीं लिहिलें त्याजवरून काल येथें आलो आज लष्कारास गेलो तेथें पत्रें कोणाकोणास गेलीं हा खुलासा काढतो त्यांत स्वामीकडे पत्रें गेली न गेलीं हें समजेल गेली नाहीत असें निघाल्यास न जावयाचे कारण काय हे भाव काढून त्याच्या बोलण्यात अर्थ निघतील ते सविस्तर लिहितो या पत्राची उत्तरें जलद यावी विदित होय हे विज्ञापना

१०. उचापत

(डॉ. अ. रा. कुलकर्णी, पुणें विद्यापीठ)

मराठवाड्यांत इतिहासाच्या साधनांचे संशोधन करीत असतांना माझे सहकारी श्री. प. भि. देशपांडे यांना अंबड तालुक्यासंबंधीं कांहीं हिशेबाचे कागद आढळले. १८ व्या शतकांत अंबड परगणा हा होळकरांच्या जालनापूर सरकारच्या कक्षेंत होता. इ. १८११–१२ (सु. १२१२ अथवा फसली १२२१) चे तीन 'उचापत' कागद आमच्या हाती आले. 'उचापत' हा शब्द मराठी भाषेंत चांगलाच रूढ आहे. परंतु त्याचा व्यावहारिक अर्थ आणि कागदपत्रांतील अर्थ यांत महदंतर आहे. हिशेबाच्या संदर्भात हा शब्द वापरला जातो तेव्हां त्याचा अर्थ उधारीनें गांवच्या खर्चासाठीं आणलेल्या वस्तू अथवा काढलेली कर्जाऊ रक्कम असा होतो. गांवकऱ्यांनीं कांहीं खर्च गांवच्या प्रतिष्ठेसाठीं अनपेक्षितपणें करावे लागत. तेव्हां प्रथम खर्च करून नंतर सरकारी मंजुरी मिळविली जाई. तेव्हां अशा अनपेक्षित घडलेल्या खर्चाचा तपशील असलेल्या कागदास 'उचापत' असें म्हणतात.

अशा तऱ्हेचे उचापत कागद फारसे आढळत नसले तरी डेक्कन कॉलेजांतील पारसनीस संग्रहांत थोडेसे आहेत. यांत प्रामुख्यानें संगमनेर परगण्यांतील टाकळी हाजीच्या उचापती आहेत. असे कागद पूर्वी प्रकाशित झाल्याचें आढळत नाहींत अभ्यासकांच्या माहितीसाठीं येथें पुढील कागद नमुन्यादाखल प्रसिद्ध करीत आहे. या कागदांत शके १७३४ च्या संपूर्ण आषाढ महिन्याच्या उचापतीचा विचार केला आहे.

ह्या सर्व उचापती पाहिल्यानंतर त्यांच्या स्वरूपाविषयीं कांहीं अंदाज बांधतां येतात. या कागदपत्रांत हिशेबाच्या ज्या बाबी आल्या आहेत त्या केवळ स्थानिक स्वरूपाच्या आहेत, आणि खर्च हा सामान्यतः किरकोळ बाबींवर केलेला आहे. धर्मादाय, पाहुण्यांचा शिधा, दप्तरखर्च या सारख्या बाबींची नोंद या 'झाड्यांत' आलेली आहे. एखाद्या विभागाचा सामाजिक आणि आर्थिक इतिहास समजून घेण्यास 'उचापत' हा एक अस्सल साधन प्रकार आहे असें म्हणतां येईल. उदाहरणार्थ :—

(१) या कागदांत देवपूजेवर झालेला खर्च तर आलाच आहे पण त्याचबरोबर पूजेसाठीं कोणतें साहित्य वापरलें त्याचा तपशीलही आला आहे. प्रत्येक देवतेच्या अर्चनेसाठीं निरनिराळे साहित्य वापरलें आहे. उदाहरणार्थ अंबडच्या अंबादेवीची पूजा फक्त फुलांनीं रचलेली आहे तर हनुमानाला मात्र पूजेसाठीं बरेच साहित्य दिलें आहे. त्याच्या पूजेसाठीं शेंदूर, राळ, मेण, खारीक, गूळ इत्यादि वस्तु जमविल्या आहेत. मार्तंडाची पूजा 'हळदी' वाचून पूर्ण नाही. विठ्ठलासाठीं पिवळी माती, कापूर, शेंदूर, कुंकू, सुपारी, हळद मध, साखर, तांदूळ इत्यादि साहित्य आवश्यक होतें.

१. पारसनीस संग्रह, रुमाल ६५ फा. ११.

जी गोष्ट पूजेची तीच नैवेद्याची. अंबादेवीच्या नैवेद्यासाठीं कणीक, तांदूळ, तूप आणि गूळ स्वतंत्रपणें सांगितला आहे.

व्यासपूजेसाठीं अच्युताश्रमाची बेगमी करण्यासाठीं बारा आणे मंजूर केले आहेत. तांदूळ, खारीक, खोबरे, हळद, कुंकू, गुलाल, गंध, चंदन या वस्तूंसाठीं बारा आणे त्याकाळीं पुरेसे होत असावेत.

गांवांतील मुसलमान समाजाला देखील खर्चासाठीं कांहीं रक्कम मिळत असे 'खैरात' या नांवाखाली हा खर्च आला असून गांवांतील पीर, दर्गे व फकीर यांना धार्मिक कार्यासाठीं गांवाकडून मदत मिळे. मलिदा हा कसा करीत याची कल्पना या कागदावरून येते. कणीक, तूप आणि गूळ या वस्तू या मलिद्यासाठीं लागत. पीरांच्या पूजेसाठीं शेरणी (गूळ) आणि ऊद या वस्तू आवर्जून सर्व कागदांत सांगितल्या आहेत. ब्राह्मणाप्रमाणेंच फकीरांनाही गांवच्या खर्चात वाटा मिळाला आहे. तत्कालीन मराठ्यांचे धार्मिक धोरण तसेंच निरनिराळ्या जमातींतील सामाजिक संबंध जाणून घेण्याच्या दृष्टीनें ही माहिती उपयुक्त ठरावी.

(२) गांवांत येणाऱ्या पाहुण्यांची, मग तो सरकारी कामासाठीं आलेला जासूद असो अथवा पंढरीला निघालेली अथवा तेथून परतलेली वारकरी मंडळी गांवांत मुक्कामा- साठीं आलेली असोत, त्यांच्या योगक्षेमाची जबाबदारी ही गांवाची असे. ब्राह्मण, साधुसत्पुरुष, जासूद, प्रवासी, इत्यादि लोकांच्या सरबराईची 'उचापत' गांवाला करावी लागे. या लोकांना गांवाकडून 'शिधा' मिळे. प्रत्येक व्यक्तीचा शिधा हा वेगळ्या प्रकारचा आहे. या शिध्यावरून त्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा लक्षांत यावा. तसेंच एखाद्या समाजाची जेवण पद्धति (diet system) अथवा जेवणाचे साहित्य याचीही कल्पना यावरून येईल. महार समाजांतील व्यक्तीची ज्वारीचें पीठ, डाळ एवढ्यावरच बोळवण केली आहे तर ब्राह्मणासाठीं कणीक, तांदूळ, डाळ आणि गहू इत्यादि वस्तूंची तरतूद केली आहे. महार हा सरकारी पत्रें नेण्या-आणण्याचें काम करी. तशाच प्रकारचे काम मराठा शिपायाकडे आल्यास त्याला ज्वारीऐवजी कणीक मिळे. सरकाराकडून म्हणजे पेशवे अथवा होळकर याकडून येणाऱ्या जासूदाचा बडेजाव चांगला राखला जाई. नेहमींच्या वस्तू तर मिळतच पण त्याला साखर, सुपारी, हळद, मसाले, कात धणे इत्यादि वस्तू दिल्या जात. अशा वेळीं तो धन्याची 'चिठी' घेऊन येत असे. परदेशी माणसाचा देखील गांवांत आदर सत्कार होत असे. देशावरून येणाऱ्या फिरं- ग्याला आणि त्याच्या साथीदारांना गांवानें आसरा दिला आहे. गांवांत येणाऱ्या उपऱ्या घिसाड्याला देखील ज्वारीचें पीठ आणि डाळ दिली आहे.

(३) आर्थिक इतिहासास उपयुक्त अशी सामुग्रीही या उचापतीच्या कागदांतून मिळते. उदाहरणार्थ निरनिराळ्या वस्तूंचे भाव या ठिकाणीं दिले आहेत.

शिवकालीन कागदपत्रांतून गांवखंडी, गांवटका नांवाची एक बाब वारंवार येते.[1] संतजनांच्या योगक्षेमासाठीं गांवकऱ्यांकडून जो कररूपानें पैसा वसूल केला जाई त्याला 'गांवखंडी' म्हणत. 'गांवखंडी' आणि 'गांवटका' हे शब्द समानार्थी असावेत. 'उलफापटी', 'मेजवानी पटी', 'दसरा पटी', 'बकरे पटी', 'जंग पटी', 'तोरण भेटी' इत्यादि ज्या करांचा उल्लेख कागदपत्रांतून येतो ते या 'उचापती'च्या स्वरूपाचे असावेत.

आंध्र प्रदेशांतील खेड्यांतील हिशेबाच्या कागदांत 'ग्राम खर्चुलु[2]' नांवाचा शब्द आढळतो. धार्मिक उत्सव, देवळांची देखभाल, नृत्य गायनादिसाठीं होणारा कलावंतांवरील खर्च, जत्रा, करमणूक, दानधर्म, भेटी, पूजा, नैवेद्य, या कामासाठीं लागणारा पैसा गांवातून गोळा केला जाई. 'करणम्' हा या ग्रामखर्चाचा हिशेब ठेवीत असे. या ग्रामखर्चाच्या स्वरूपावरून तो आपल्याकडील 'उचापती' सारखाच आहे असे मानण्यास हरकत नाहीं.

(४) 'उचापती' कागदांतील हिशेब ताळेबंदाप्रमाणें नेहमींच तंतोतंत जुळतीला असें नाहीं. म्हणून येथें कसर धरून हिशेब जुळविले आहेत. या कागदांवरून आपल्याला निरनिराळ्या वस्तूंचे बाजारभाव कळून येतात. कांहीं वस्तूंचे भाव पुढीलप्रमाणें आहेत.

१.	डाळ	वजनी	१२०	शेरास	१४ रु.
	चणे	"	"	"	१०॥=
	चणे	"	"	"	१०।=
	डाळ चणे	"	"	"	१०॥=
	बेसन	"	"	"	१४ .
२.	गहूं	"	"	"	१२॥=
	कणीक	"	"	"	१३
	कणीक	"	"	"	१२॥ .
३.	गूळ	वजनी	१२०	शेरास	१०।≡ रु.
	गूळ	"	६	शेरास	१
	गूळ	"	४॥	"	१
४.	ज्वारी	वजनी	१२०	शेरास	१०॥ .
	पीठ (बहुधा ज्वारीचे)	"	"	"	११॥०
५.	तांदूळ	"	"	"	१५॥०
६.	मीठ	"	"	"	५॥.

1 Kulkarni A. R., Maharashtra in the Age of Shivaji, Poona, 1969; pp 121–22.

2 Frykenberg R. E. Guntur District, 1788–1848, Oxford, 1965; p. 31.

७.	आंबाडी	” ”	”		१६
८.	तुरीची डाळ	” ”	”		१२॥
९.	सुपारी	२	शेरास		१
१०.	खारीक	३।०	”		१
११.	साखर	२ शेर ९ टाक			१
१२.	गुगल	३।०	शेरास		१
१३.	कापूर	१	”		५।०.
१४.	शिसे	२	”		१
१५.	तूप	१०॥०	”		१
१६.	राजगिरा	९	”		१
१७.	आंबी हळद	३।०	”		१
१८.	वावडिंग	३।०	”		१
१९.	राई	९	”		१
२०.	अजवाण (ओवा)	१	”		८॥.
२१.	कुटकी	१	”		१।०
२२.	घोड वाच (१)	३	”		१
२३.	काळे जिरे	५।॥०	”		१
२४.	नगदी	२।९	टके	=	१ रु.
		१३	टके	=	०=आणे
		१	टका	=	।=॥
		.॥.	टका	=	०≡॥
		०१॥	रुका	=	०।.
		००॥	रुका	=	०।.
		.॥।.३।.	टके	=	.।-॥
		.।.	टका	=	०-।॥
		० ६	टके	=	०.।॥

वर दिलेल्या निरनिराळ्या वस्तूंच्या भावांवरून स्थूलमानानें पुढीलप्रमाणें निष्कर्ष काढतां येतील.

(अ) येथें सर्वत्र वजनी माप वापरलें आहे. १२० शेरांचा पल्ला व ७२ टाकांचा १ शेर हे मोजमाप येथें वापरलें आहे. तसेंच १ टका म्हणजे ४८ रुके असे धरले आहे.

(आ) एकाच वस्तूच्या भावांत जे फरक दिसतात ते कदाचित् त्या वस्तूची निरनिराळी प्रत दर्शविणारे असावेत. डाळ, गूळ, गहूं, यांचे भाव या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत. गहूं आणि कणीक यांच्या भावांतील फरक हा दळणावळीमुळें पडला असावा.

(इ) नगद-नगदीच्या भावांतील फरक विशेष उल्लेखनीय आहेत. नमुन्या-दाखल प्रस्तुत उचापतींत आलेले सर्व 'नगदीचे' भाव येथें घेतले आहेत. त्यावरून इतर वस्तूंच्या भावांबद्दल अनुमान काढता येईल. हे सर्व भाव आषाढ या एकाच महिन्यांतील आहेत हे येथें लक्षांत ठेवले पाहिजे. नगद-नगदीच्या भावांच्या तक्त्यावरून असें दिसून येते कीं एका रुपयाचा भाव ९६ रुक्यापेक्षां कमी नाहीं. फक्त एकदा मात्र तो ३२ रुके असा आहे. कदाचित् ही हिशेब लिहिणाऱ्याची चूकही असूं शकेल. १ रुपयाचे रुके १२८, १२०, ११८, ११७, ११०, १०८, १०१, ९६, ३२ असे या तक्त्यांत दाखविले आहेत.

सु. १२१२ फ. १२२१ }
जखर–आषाढ }

श्री

{ श. १७३३ आषाढ
{ इ. १८११ जून,जुलै

उचापत सरकार सुा इसने अशर मयातैन व अलफ सन १२२१ माहे जमादिलाखर उर्फ आशाड मास छ १ ता छ ३० रोज मा वाणी केमकर बाा चिठ्या रुा

(१)

७३।॥।॥ धर्मादाय
५।॥।॥ श्रीदेवी
०॥· पूजासाहित्य बाा
५।·॥ नैवद छ १ ताा छ ३० छ ३०
२। ¯॥ कणीक ៰॥=॥
०।॥≡ दाल ៰៰७॥ दर १४
०।॥≡॥ तांदूल ៰៰७॥
दर १५॥
०।॥៰॥ तूप १।॥६
०।¯ गूळ ៰៰१।॥९
५।·॥ ៰।॥९।९ १।॥६
५।॥·॥

७।॥= अचुताश्रमस्वामीकडे
छ, ताा छ ३० रोज
४॥≡ कणीक ៰१៰५
दर १२॥
।॥= दाल ៰៰७॥ दर १४
।॥≡॥ तांदूळ ៰៰७॥
៰¯॥ मीठ ៰៰२
१। तूप ៰៰१।॥९
७।॥= ៰१॥३៰॥९

(२)

·।· श्री. मार्तंडजीकडे भंडार वजन रुा
४४៰¯। श्री देव घारेश्वर माहादेव
याजपासी
ब्राम्हण बघन्य (पर्जन्य) बाा
आनुष्ठाणास सिधा

वजन	रुा
៰៰६॥१=	छ ६ रोज
៰॥७।	छ ८ रोज
៰।७॥	छ ९ रोज
៰॥२៰६	छ १० ते छ ११
៰।॥२៰६	छ १२ रोज
៰॥៰≡	छ १३ रोज
៰।६।॥	छ १४ रोज
៰॥३।१२	छ १५ रोज
៰१៰१॥१२	छ १६ रोज
	छ १७
៰१।४।१३॥	छ १८ रोज
·।१।१।॥१३॥	

ता

१०।॥ कणीक वजन ៰२॥३
दर १२।

(३)

६।- तांदूल वजन ๕१๕८।
दर १५।।।
३।= दाल ๕।।८।। दर १४
११।- तूप
२।।≡ गूल ๕।६। दर ๕๕६
·।·।।। बेसन ๕२।। दर १४
·।-।। मीठ ๕๕५।। दर ५।।।
१।।= सुपारी वजन ๕๕३।
दर ๕๕२
.।।।≡ खारीक ๕๕३ दर ๕๕३
१।≡।।। साकर ๕๕३
दर ๕๕२๕९
๕≡।।। गुगल ๕๕।।। दर ๕๕३।
१।= कापूर ๕๕। दर ५।
२๕-।। सत्पधान ๕।।१ दर
१๕≡ नगदी २।।९ दर २।९
๕।। कात ๕๕๕३
๕-।।। नारेल १

४४๕-। .।१।१।।।१३।।। २।।९

३।।।≡। श्रीविठल काटकराचे वाडयांत
शुा ११ शुा१२ पूजासाहिंत्य
व ब्राह्मण सतरपण छ ८ ताा
छ १० रोज २
๕≡ हुरमजी ๕๕१
๕। सेंदूर ๕๕๕३
๕= पिवली माती ๕๕।।.
๕-।। जगाल ๕๕๕९
๕। डीग ๕๕๕९
·।· आवरख ๕๕๕९
๕= सुपारी ๕๕๕१३।।
๕=।।। गूळ ๕๕๕९
१๕- कणीक๕๕९ दर १२।।
๕= नगद टका ·।३
सुपार
๕।।। खारीक ๕๕๕९

(४)

๕-।।। नारेल १
๕- साकर ๕๕๕९
๕।। कुंकू ๕๕๕४।।
๕। हळद ๕๕๕९
๕=।। कापूर ๕๕।।
๕। मद ๕๕๕१।।
।।≡ तूप ๕๕१๕९
।=।। तांदूल ๕๕३
๕≡।।। मीठ ๕๕।।
๕।।

३।।।≡। ๕।९๕७।। ·।३

२।=।।। श्री मारुती पोखरणीजवळ
ब्राम्हण प्रदक्षनस पाठविला
त्यास सिधासाहित्या (त्या)
छ २१ ताा छ २८ रोज
।।=।। तूप ๕๕१।
๕=।। गूळ ๕๕१
·।।।- कणीक ๕๕८
๕= साकर ๕๕१
๕- गुगल ๕๕๕९
๕-।। कापूर ๕๕๕१।।
๕๕-।। खारीक ๕๕๕९
๕- सुपारी ๕๕๕९
।=।। नगद १
๕।। तांदूळ ๕๕।·

२।=।।। ๕।१๕।.।। .।.

४।।।≡।। श्रीपंत नारायण नेवद
छ १ ताा छ ३०
२।-।। कणीक ०।।२।।
दर १२।।
।।।≡।। तांदूळ ๕๕७।।
।।।= दाल ๕๕७।।
।।।·।। तूप १।।।६

४।।।≡।। ๕।।।·।। १।।।६

(५)

·।।।· व्यासपूजा अचुताश्रमस्वामीकडे
छ १४ रोज
ઠ= तांदूळ ઠઠ१
ઠ–। खारीक ઠઠ।
ઠ–। खोबर ઠઠ।
ઠ= सुपारी ઠઠ।
ઠ–। गेंरू ઠઠ।
ઠ–।।। नारळ १
ઠ। कुंकू ઠઠઠ४।।
ઠ। हलद ઠઠઠ४
ઠ।। गुलाल ઠઠઠ४।।
ઠ–।। गहू ઠઠ१ दर १।
·।।।· ઠઠ३ઠ१३।।

२ઠ≡ किरकोळ ब्राम्हण आले गेले
ઠઠ१ छ १ रोज आगंतूक
ઠઠ८। छ १० रोज
ઠઠ३ अवढेकर ઠ९
ઠઠ३ बोरगांवकर ब्राम्हण
ઠ९
ઠઠ२। बैरागी ઠ६
ઠઠ८। ·।।·
ઠઠ२।। छ १३ रोज
पंढरपूरकर ब्राम्हण
ઠઠ४। छ १८ रोज
ब्राम्हण

ઠ।≡

ता।
१ઠ≡ कणीक
·।– दाल ઠઠ२।९
ઠ≡।। नगद ·।।·
ઠ=।। तांदूल ઠઠ१।
·।· तूप ઠઠ९

(६)

ઠ– गूळ ઠઠ।९
२ઠ≡ ઠ।६ ·।·

·।।· अगांतुक ब्राम्हण छ २३ रोज
·।= कणीक ઠઠ३
ઠ– दाल ઠઠ।।
ઠ।।। तांदूळ ઠ६
·।।· ઠઠ४ ઠ६

१ઠ।।· अग्नहोत्री ब्राम्हण आवडकर
तांदूल दर १५।।
ઠઠ४ उतरेश्वर पाठक
ઠઠ४ भटभट सामक
ઠઠ८

७३।।।·।।।। ·।।१।४।९ ८।।६

२।≡।। खैरात खर्च
·।।≡।। फकीर
ઠઠ२ छ १० रोज
ઠઠ१।।। कणीक
ઠઠ। दाल
ઠઠ४।। जाफराबादकर
फकीर छ १६
रोज
ઠઠ२।। कणीक
ઠઠ।१ तांदूल
ઠઠ।। दाल
ઠઠ। गुळ
ઠઠ। तूप
ઠઠ१।। पीर मलंग छ २०
मलिदा
ઠઠ१। कणीक
ઠઠઠ९ तूप ઠઠઠ९
ઠઠ। गुल ઠઠ।।
ઠ१।।। नगद
ઠઠ१।।९
ઠઠ८ ઠઠ१।।

(७)

ता

ऽ॓। गुल ऽऽ॥

.।.॥ कणीक

ऽ=॥ तूप

ऽ॓। दाल ऽऽ।॥

ऽ= तांदूल ऽऽ१

ऽ।. नगद ऽ१॥

॥=॥ ऽऽ १॥। १॥

ऊद वजन ऽऽ।. छ ८

०॥≡॥। ऽऽ८। ऽ१॥

१॥≡॥। सेरणी गुल वजन

ऽऽ५ ॥ पीर चीदखान बाबद

छ ५ ता छ २६ रोज

ऽऽ१।. पचेपीर वर ४ दर

ऽ॥४॥. मा

मलग ऽ३॥।. प्रो

ऽऽ१॥९ मलिदा पीरास

छ २०

गूळ ऽऽ।.

तूप ऽऽऽ९

कणीक ऽऽ१।.

नगद

ऽऽ१॥९

ऽ॥।.

ऽऽ७॥।९

ता

१ऽ॓। गूळ ऽऽ६॥ दर ऽऽ६

ऽ= कणीक ऽऽ१।.

ऽ॓।. तूप ऽऽऽ९

ऽ।. नगद ऽऽ॥.

.।≡ ऊद ऽऽ।.

१॥≡॥

२।≡॥

१ तैवज खर्चकडे सुपारी वजन छ १२ रोज ऽऽ॥. छ २० रोज ऽऽ॥.

(८)

छ १८ छ ३० योा दर प्रो

ऽऽ॥. ऽऽ॥. ऽऽ२ ऽऽ२

.।=॥ छपरबंदीस आंबाडी वजन छ १३ रोज ता छ १९ रोज चिठ्या २

ऽऽ३ दर १६

५।· दारूखान्याकडे सिसे वजन ऽ।.।॥

दर ऽऽ२

६॥=॥। सिधे खर्च

३ऽ=॥। खंडोपंत कारकून

पडतूरकर छ ५ ता छ ७

रोज चिठ्या

.।≡॥. कणीक ऽऽ४॥ दर १२॥

.।॓। दाल ऽऽ२॥। ९ दर १४

ऽ≡ तादूल ऽऽ१॥ दर १५॥

तूप

१ऽ॓॥ पीठ ऽ।१ दर ११॥।.

.॥।. चणे ऽऽ९ दर १०।=

.।॓॥ नगद .॥। ३। दर २।

३ऽ=॥ ऽऽ३।. ऽ६

.।॓॥। अचुतराव कारकूण

नाा नाईक यास छ १६ रोज

ऽ≡।. कणीक ऽऽ२

ऽ॥. दाल ऽऽ।.

ऽ॓। दाणा चणे ऽऽ१

ऽऽ॥।. तूप ऽ६

.।॓॥। ऽऽ३।. ऽ६

.॥।=। फिरंगी याजकडील

.।=॥ नारोपंत चणे छ २८

.।≡॥। वजन ऽऽ५ दर १०।=

जासूद आा ३ छ २७

ता छ २८

.।= कणीक ऽऽ३।

ऽ॓दाल ऽऽ॥.

(९)

ᓀ⁻।॥. नगद .।.

.।≡॥ ᓀᓀ३॥ ०

.॥=।. ᓀᓀᓀ॥. .।.

·॥=॥· चेतुरभुज ब्राम्हण आा १ छ २ रोज

.।=।. कणीक ᓀᓀ४ दर १२॥

ᓀ=॥ दाल ᓀᓀ १॥

ᓀ⁻॥ तूप .॥.

.॥=॥ ᓀᓀ५॥. .।.

·।≡।· बिगारी माहर छ २ छ १५

ᓀᓀ॥ ᓀᓀ४

जोरी ᓀᓀ४॥ दर १०॥

ᓀ⁻॥· केशरसिंग माहडीक याजकडील माणूस छ २५

ᓀ⁻।. पीठ ᓀᓀ॥९

ᓀ।. दाल ᓀᓀᓀ ९

ᓀ⁻॥. ᓀᓀ १

ᓀ=।· नागोराव वकील याजकडील सिपाई जासूद छ १

ᓀ⁻॥ कणीक ᓀᓀ १

ᓀ।. दाल ᓀᓀ।

ᓀ॥ तूप ᓀ ३

ᓀ=।. ᓀᓀ१. ᓀ३

·॥= चिमाजी पाा सुरमेगावकर छ ४ रोज

ᓀ⁻॥. कणीक ᓀᓀ१

ᓀ॥. दाल ᓀᓀ। ९

ᓀ≡ पीठ ᓀᓀ २ दर ११॥.

.।. दाणाचण ᓀᓀ ३

ᓀ॥. नगद ᓀ ६

.॥= ᓀᓀ६।९ ᓀ६

ᓀ⁻॥. गणू खिलारी छ १९ रोज

ᓀ⁻॥. कणीक ᓀᓀ१

ᓀ।. दाल ᓀᓀ।.

ᓀ⁻॥ ᓀᓀ१

(१०)

ᓀ=॥ अष्टीकर सिपाई आा २ छ २८ रोज

ᓀ=।. पीठ ᓀᓀ१॥

ᓀ।. दाल ᓀᓀ।·

ᓀ=॥· ᓀᓀ२

६॥=॥ ᓀ१॥२॥. १॥६

८९॥⁻॥ ॥४ᓀ६॥५॥ १०१२.·॥· २

२५ᓀ।· खाा मुाा भोजनखर्च पौ चिठचा८ यकूण वजन रुाा

ᓀ१।·४॥ छ ४ रोज

ᓀ१।५॥५॥ छ ८ रोज

ᓀᓀ॥· छ १० रोज

ᓀᓀ३॥· छ १२ रोज

ᓀᓀ१ छ १३ रोज

ᓀ१ᓀ७ छ १९ रोज

ᓀ१।९॥ छ २४ रोज

·।·।८ᓀ५॥

ताा

६।· गहू ᓀ१॥· दर १२॥·

२॥⁻ दाल तुरी ᓀ॥२ दर १४

३॥= तांदूल ᓀ॥८ दर १५॥·

३॥· तूप ᓀᓀ५।· दर ᓀᓀ१॥·

.।⁻॥ मीठ ᓀᓀ७॥ दर ५॥·

६॥⁻। जोरी ᓀ१॥८ दर १०॥·

·॥⁻ दाल चणे ᓀᓀ७ दर १०॥=

ᓀᓀ॥· जिरे ᓀᓀᓀ४॥·

ᓀᓀ॥. राई ᓀᓀ।.

ᓀ⁻।· हिंग ᓀᓀᓀ१

ᓀ⁻।· खारीक ᓀᓀ।·

·।≡॥· गूळ ᓀᓀ२॥· दर १०।≡

·।=॥ चणे ᓀᓀ५ दर १०॥=

ᓀ≡॥ राजगिरा ᓀᓀ२ दर ᓀᓀ९

२५ᓀ।· ·।·।८ᓀ५॥.

११४॥⁻॥·

(११)

ता
११३।।≡। वाणी
•।।=।। कसर

११४।।–।।।

माहे रजब पागेकडे मसाला छ १६
रोज बा चिठी
१।।।–।।।• आंबी हलद ०८६
दर ०८३।•
१०≡।।।• गुगल वजन ०८४
दर ०८३।. प्रो
•।– वावडिंग ०८१•
दर ०८३।•
०=।।• राई वजन ०८१।।।•
दर ०८९

(१२)

•।०।।• अजवाण वजन ०८२
दर ०८५
२०≡ आफू वजन ०८।•
दर ८।।•
२।।• कुटकी ०८२ दर १।•
•।–।• घोडबाच ०८१ दर ०८३
१।।।• गूळ ०८८ दर ०८४।।•
१।•।।। कणीक ०।२ दर १३
•।।।=।। काली जिरे ०८५
दर ०८५।।।•
०≡।।। मीठ ०८५ दर ५।।।

१२।।।≡।।।

१२७।।–।।• लागू माहे मजकूर.

११. पानिपतपूर्व व पानिपतोत्तर मराठी पत्रें

(प्रा. ग. ह. खरे, पुणें.)

पुढें दिलेल्या पत्रांची हकीकत मनोरंजक आहे. येथील जुन्या पुस्तकांचे एक व्यापारी श्री. पां. रा. ढमढेरे हे इ. १९५९ च्या जूनमध्यें एका संध्याकाळीं त्यांस मिळालेल्या गळाठ्यांतील एक दोन फार्सी कागद घेऊन मजकडे आले आणि तो गळाठा विकत घ्यावा कां याविषयीं त्यांनीं मला सल्ला विचारला. मी त्यांस सर्व गळाठा मजकडे आणून देण्यास सांगितलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं ते गळाठ्याचीं चार पोतीं घेऊन मजकडे आले. तो गळाठा मी, श्री. ढमढेरे आणि माझे एक मित्र यांनीं तपासला व आम्हांला मिळालेल्या थोड्या अवधींत त्यांतून करतां आली ती निवड करून बाकीचा गळाठा त्यांस परत केला. निवडलेले कागद सुमारें ५० किलो भरले. सव्वा रुपया किलो याप्रमाणें श्री. ढमढेरे यांजकडून ते विकत घेतले. त्यांमध्यें तपासणी केल्यावर मुख्यतः दोन प्रकारचे कागद आढळले. एक मराठी हिशेबी कागद व दुसरा फार्सी व मराठी पत्रव्यवहार. इ. १७५६ मध्यें बाळाजी बाजीराव पेशव्यानें बुंदेलखंडचा मामलेदार गोविंदपंत बुंदेले यांचे हिशेब तपासण्यासाठीं त्र्यंबक कृष्ण कानिटकर व जनार्दन अप्पाजी एरंडे या दोघाना पाठविले होतें. हीं दोन्ही घराणीं सध्यां धोम व

वाई येथें आहेत. पैकीं एरंडयांच्या घराण्यांतून कै. वि. का. राजवाडे यांस त्यांनीं आपल्या पहिल्या खंडांत प्रकाशिलेले बहुतेक कागद मिळाले. हिशेबी कागदांत मुख्यत: या दोन घराण्यांचेच कागद आहेत. फार्सी कागद सुमारें ३२५ मिळाले. त्यांत मुख्यत: दिल्लीचा बादशाह, महादजी शिंदे, इस्माईलबेगखान, आसफुद्दौला, शाह निजामुद्दीन, इतिशाम व इतर यांच्या दरबारांचे अखबार, कांहीं पत्रें, कांहीं पत्रांचे मसुदे, व कांहीं अर्ज इत्यादि कागद आहेत. यांपैकीं अखबार हे तीन ठिकाणीं तरी वाटले गेले होते. त्यांचा सर्वांत मोठा संग्रह सध्याच्या पेशवे दप्तरांत असून, सुमारें पंचवीस बर्षांपूर्वीं त्या वेळच्या मुंबई राज्यानें पुण्याच्या पारसनीस घराण्यांतून घेतलेल्या फार्सी कागदपत्रांमुळें तो संग्रह आणखी मोठा झाला आहे. कांहीं संग्रह आपल्या भा. इ. सं. मंडळांत आहे. आणि कांहीं संग्रह गळाठ्यांत मिळाला. हा सर्व संग्रह मूळचा पेशवे सरकारचा असतांना कोणत्या ना कोणत्या कारणानें तीन ठिकाणीं विभागला गेला होता. आतां तो दोन ठिकाणीं सुरक्षित आहे. एरंडे घराण्याकडे जे कागद कै. राजवाडे यांना मिळाले ते बहुतेक त्यांनीं आपल्या पहिल्या खंडांत प्रकाशित केले; पण सुमारें ५५ कागद नजरचुकीनें पहावयाचे राहिले असावे किंवा महत्त्वाचे नाहींत म्हणून कै. राजवाडे यांनीं ते गाळले असावेत. त्यांपैकीं ८ कागद येथें प्रसिद्ध करीत आहे.

यांतील ५ पानिपतपूर्व व ३ पानिपतोत्तर आहेत. त्यांची कालनिश्चिती करणें अगदी सोपें असल्यामुळें तिचें विवरण येथें केलेलें नाहीं. हे कागद माझ्या हातीं आल्याबरोबर त्यांविषयीं एक लेख मी १९६० सालीं दिल्लीस भरलेल्या इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या बैठकींत वाचला होता. तो तिच्या इतिवृत्तांत पृ. १३० ते १३९ मध्यें प्रसिद्ध झाला आहे.

१
श्री

{श. १६८२ ज्येष्ठ शुद्ध ७
इ. १७६० मे २१ सुमार

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य गोविद बलाल सा। नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम जाणून स्वकीये लेखन कीजे विषश तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी लिहिले पाहिजे विशष अम्ही अतरवेदीतील रागडे याणी बहुतच लबाडी माडली सबब त्वरेने निघोन अलो अलियांसी थोडे बहुत दबले अहेत वरकड तेथे कारकून माहालकरी अहेत त्याचे हिसेब विले लाऊन घेऊन त्यास विदा करून द्यावे वरकड वर्तमान रा। मुकुंदपंतास लिहिले अहे ते सांगतील वरचेवर वर्तमान लिहीत जाऊन इकडे रोहिलें अबदाली कोलेवर आहेत जाहानखान शहानवाजखान व नजीबखान आगरे याचा किला घ्यावयास गेले कार्य साधले नाही सबब पारचा गड घाटी आहेत श्रीमत राजश्री भाऊस्वामी नखराजवल फौजसुधा आले दर मजलीनी ग्वालेर येथे येतील वरचेवर तुम्हास लिहीत जाऊन बहूत काये लिहिणे कृपालोभ असो दीजे हे विनती

भाद्रपद शुद्ध ९ } २ श्री { श. १६८२ भाद्रपद शुद्ध ९ / इ. १७६० सप्टेंबर १८

श्रियासह चिरजीव राजश्री बाबा व गंगाधर यासी गोविद बलाल आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणे विशेश तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान सविस्तर कलले त्यास तुम्ही लिहिले की **साठ वर्षाची कपिल शस्ट आ**हे त्यास श्नानास यावे याची आज्ञा पाहिजे त्यास उतम आहे. स्वार होऊन सत्वर लस्करी येणे येथून फौज समागमे देऊन श्रीब्रह्मावर्त येथे पाठऊन पत्र पावताच रवना करणे येथे आम्हा जवल आलियावर आमचे जाणे जाले उतम नाही तर पुढे रवना करणे तेथे करून वरकड चिरजीव गंगाधरास अशक्तपणा आहे त्याजला न पाठवणे तुम्ही व तीस घेऊन येणे विलब न करणे रायेपुराहून उमरगडी येणे तेथून नीट मुसानगरी आगर माऊर येथे सेगर उतरून गुलोलीस येणे मार्ग पाहातो रामजमदार फडनीस यासही लिहिले आहे तेही येतील समागमे घेऊन येणे विलब न करणे गुलोलीची पचोरी (टी ?) लागली आज उद्या सुटेल पाच गडी पैकी दोन सुटली गुलोली खाली जाली म्हणजे तेही दोनी खाली होतील चार कनाता दोन राहुटी येक निद्रेस व मुदवखास आसी घेऊन येणे सेतखाना घेऊन येणे भाडी अगत्य अगत्य घेऊन येणे स्वार समागमे–(?) ले आहेत येणे तर पाऊसापाणि याचे सत्वर येणे उमरगडीहून निघोन माहूर येथे राहणे तेथून लस्करी येणे येथे येक दोन रोज राहून सडी श्नानास जाऊन वरचेवर श्नान करून येऊन बहूत जलदीने येणे विलब न करणे कोणे दिवसी निघाला ते जासूद पुढे पाठवणे मिती भादो सुध ९ बहूत काये लिहिणे लोभ असो दीजे हे आसीर्वद

भाद्रपद शुद्ध ११ } ३ श्री { श. १६८२ भाद्रपद शुद्ध ११ / इ. १७६० सप्टेंबर २१

श्रियासह चिरजीव राजश्री बाबा व गगाधरपत यासी गोविद बलाल आसीर्वाद उपरी तुम्ही पत्र पाठविले श्नानास यावयाचे त्यास दोन पत्रे दोन माणसें पाठविली त्याजबरोबर उतर पा आहे कपिल शस्टीस यावयाविशयी लिहिले त्यास पत्र पावताच स्वार होऊन येणे चिरजीव गंगाधरास तेथे ठेऊन तुम्ही व तीस घेऊन सत्वर लस्करी येणे आम्हीही समागमे येऊन द्वितीयेचे श्राध पक्ष करून श्नान करून उमरगडी येऊन तुम्ही पत्र पावताच स्वार होऊन येणे मार्ग पाहातो रा त्रिबकपत नाना व रा जनार्दनपंत यासही लिहिले आहे तेही येतील समागमे येणे जे क्षणी पत्र पावेल ते क्षणी येणे विलब न करणे भेटीनतर सविस्तर बालोन मिती भादो सुध ११ बहूत काये लिहिणे लोभ असो दीजे हे आसीर्वाद

भाद्रपद वद्य १२ } ४ श्री { श. १६८२ भाद्रपद वद्य १२ / इ. १७६० आक्टोबर ६

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसी

पो गोविंद बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता भादो वद्य १२ मुा चचेडी जाणून कुशल लेखन करीत असले पाहिजे विशेष...हून काली

कूच करून आज चचेडीस आलो दर मजलीनी उमरगडी येऊन रा गोपालराव आले होते उदईक ते कूच करून जातील त्याजकडील रुजुवतीस कोणी कारकून पाठऊन देऊन वरकड येथे काही गुंता नाही चिरंजीव बाबास लिहिले आहे ते तुम्हास सांगतील रा मुकुदपंत यांस तुम्ही लिहिले त्याणीहि आम्हास सागितले त्यास आम्ही कूच करून आलो आता उमरगडीच येतो रा मुकुदपंत काली बिठुरास राहिले तेही अज येतील म्हणजे सविस्तर लिहून पाठऊन बहूत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनती याज उपरी उमरगडी येऊन लस्करी श्रीमंत राजश्री [मो. जा. *] स्वामीभाऊकडे जावे हाच विचार दुसरा नाही दुसरे कामास गुता नाही आम्ही येऊन पावतो भेटीनतर सविस्तर बोलोन हे विनती

भाद्रपद वद्य १२ } ५ श्री { श. १६८२ भाद्रपद वद्य १२ इ. १७६० आक्टोबर ६

श्रीयासह चिरंजीव राजश्री बाबा यासी गोविद बलाल असीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष तुम्हा पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कलले फडणिसांचा मजकूर लिहिला त्यास त्याचे उतर आलाहिदा पत्री लिहिले आहे आणि फडणिसासही लिहिले आहे त्यावरून कलेल आम्ही चचेडीहून कूच करून घाटमपूरचे रोखे गेलो गुलोलीचे कार्य आहे त्यास तेही येऊन भेटतीलच त्याचे कार्य करून सत्वरच येतो इति [कि *] याउपरी हिकडेस गुता नाही चिरंजीव गंगाधरास आराम आहे म्हणून लिहिले त्यास उत्तम आहे पथ्य उत्तम करवणे आज (?) वैद्य सांगेल त्या प्राा करणे राजश्री रामचंद्र भटजीस आराम आहे म्हणून लिहिले त्यास उत्तम आहे त्याजलाही औषध उपाये करऊन बरे होत त करणे वरकड वरचेवर तुम्हास लिहित जाऊ गुलोलीचे येऊन भेटले [नि *] येक दोन रोजी येथून निघोन येऊन वरकड दिलीकडील वर्तमान तर कुंजपुरेयावर फौज गेली कुतुबशासी लडाई जाली दोन हजार घोडे दोन हाती घेतले गाव लुटला गडी जुजत आहे परतु घेतील आपदालीकडून शापसंदखान वगैरे पांच श्रीमंत रा भाऊ स्वामीकडे गेले तह होत आहे आम्ही सत्वरच येतो श्रीमंत स्वामीकडे सत्वर जाणार मिती भादो वद्य १२ बहूत काये लिहिणे लोभ असो दीजे हे आसीर्वाद राा लक्षुमणपंत दादा व चिरंजीव कासीपंत विठलपंत यास पत्रे लिहिली आहेत त्याजकडे तावडतोब पाठऊन उतर त्याचे येईल ते आम्हाकडे पाा हे विनंती

पौ सवत १८१७ फाल्गून शुद्ध १३ } ६ श्री { श. १६८२ फाल्गून शुद्ध १३ इ. १७६१ मार्च १८

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जनार्दनपंत स्वामीचे सेवेसी पो राघो गोविंद सांा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहित आसिले पाहिजे विशेष तुम्हीं पत्र रायेपूरचे मुकामीचे पाठविले ते पावले वर्तमान सविस्तर लिहिल्याप्रमाणे कललें बरें सर्व गोष्टी आपण सुखरूप आसल्यास होतील चिंता नाहीं श्रीमंत प्रस्तूत कसबे भेलसें येथे मुकाम आहे पुढेही येतील सारांश याच राणांत

आहेत दूर, कोठे जात नाहीत तुम्ही यैवज पाठविला त्याचे वर्तमान गुदस्ता आमचा यैवज देशास न गेला सबब श्रीमंत भाऊसाहेब या प्रांते आले यैवजाची वोढ इकडेच पडली याजमुले यैवज गेला नाहीं मग राजश्री आतोबास आम्हीं पत्र लिहिलें जे तुम्हाकडून यैवज आला तो आम्ही जमा केला आसे त्याचा जाबही आम्हांस आला याप्रमाणे यैवज जमा कर्ज धरिले आसे तुम्हांस कलावे श्रीमतासमागमे राजश्री नारोपंत नानाही आहेत वरकड तिकडील वर्तमान आपणाकडे वरचेवर येतच आसेल श्रीमंत भाऊसाहेब आलियानंतर सर्व बंदोबस्त होईल चिंता नाही वरचेवर तिकडील वर्तमान लिहीत आसावे इकडे लस्कर लुटितात याजमुलें वसूलही थोडकाच येतो लोक रयेत सर्व लबाडीत सिरली आहे प्रसंग उतम दिसत नाही परंतु ते आलियावर सर्व होईल तों हिमतीचा माणूस आहे तुम्हास सूचना मात्र लिहिली आसे बहूत काये लिहिणे लोभ आसो देणे हे विनंती

पौ फाल्गून शुध १३ मुा रायेपूर सन १८१७

७
श्री

{श. १६८२ फाल्गून वद्य १३
{इ. १७६१ एप्रिल ३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री जनार्दनपंत दादा स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णाजी जनार्दन सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा फाल्गून वद १३ पावेतो आपले कृपे करून सुखरूप आसो विशेष बहूता दिवसी कृपापत्र येऊन सेवकाचा साभाल जाला बहूत समाधान जाले दिलीकडील सर्व विस्कलित गोष्टी जाल्या त्या पहिल्याच (?) यैकोन दुख जाले ते ईश्वर जाणे पत्रीं लिहावे यैसे नाहीं आपण श्रीमंत राजश्री बाबासमागमे आलो म्हणौन लिहिले बहूत समाधान जाहाले ज्यापासून आम्हीं आपला निरोप घेऊन निघालो त्यास आम्हास मार्गी गंगास्नाना सुधा येक मास लागला येथे आलो तो छत्रपुरी कोण्ही हुंडी न करीत तेव्हाच श्रीमंत राजश्री पताचे वर्तमान आले ते समईं इकडील आवस्था किंवा (?) गर्दी जाली ते लिहिता येत नाही याजमुले आम्ही रुपयास सिवलो नाहीं सागरचा यैवज सागरीच होता आम्हाकडून वराते होती तोही यैवज त्यासमईं हातास न आला त्या उपरी आटा पनरा दिवसी काहीसी सुस्ताईं आली तेव्हा यैवज आम्हीं आणून छत्रपुरी रवाना केला तो मोठ्या प्रयासें पावला तेथून हुंडी माघ वद ५ रोजी केलीं आणि येज जोडी कासिदाची पुण्यास रवाना केली त्यास आजीं पनरा रोज जाले हुंडी सकारून श्रीमंत राजश्री नारोआपा याचे हातचे हुंडी पावल्याचे जाब घेऊन आम्हाकडे येतील तेच जाब आपणाकडे पावते करू या दंग्यामुळे हुंडीस दिसगंत लागली नाहीं तरी दिसगत न लागती प्रथम श्रीमंताची ती गत जाली मागून थोरले फौजेची गत ते जाली त्यामुलें इकडे बहूतच हुवा जाला हुव्यामध्यें हुंडी करावी ठिकाणी रुपया होता तो राण्या हाती द्यावा याजकरिता हुंडी न केली आता निवल जाले याजकरिता हुंडी करून पाठविली आहें जाब जाला या उपरी सेवेसी प्रविस्ट होईल बहूत काये लिहिणे कृपा कीजे हे विज्ञापना

चैत्र शुद्ध ५ } ८ श्री { श. १६८४ चैत्र शुद्ध ५ इ. १७६२ मार्च ३०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखारामपंत स्वामी गोसावी यांसि सेवक हरी अप्पाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। चैत्र शुध ५ मु॥ इटावे जाणून स्वकीये लेखन करणे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले लिहिले वर्तमान कलले इकडील वर्तमान राजश्री मल्हारजी होलकर ह्याच्या भेटी परवा दो कोसावर जाहली काल इटावियासी येऊन गावांत रोहिले वगैरे उखळून किल्याखाली घातले किल्याभोवते मोर्चे आपले व त्याचे बसले आहेत हाती देखील किल्यात आहे आज उद्या फडच्या होईल शहर औधी पेडार यानी लुटले मोटा नास जाहला सावकाराच्या चार हावेली राहिल्या आहेत श्रीमंत राजश्री गंगाधरपंत बाबानी मुहूर्ते करून राहुटी दिल्ही स्वारीस कुऱ्याकडे जाणार बा॥ जावयाची आज्ञा लिहून पाठविणे म्हणून लिहिले तरी श्रीमंत स्वारीस जातात मग बा॥ जाणे अगत्यच जाहले येकं ब्राह्मण नवा ठेऊन फिरंगूची राहुटी व फिरंगू वगैरे चार पाच राऊत बा॥ घेऊन जाणे खर्चा वेचाचा मजकूर लिहिला तो सर्व कलला यैवज गडबाईचा आला तरी त्याजपैकी दोन चारसे मागणे उगच मागून फाइदा नाही कोचेचा यैवज आद्यापि येत नाही आपूर्व आहे तुम्ही स्वारीस गेलेत तरी मागे बुलग्यातील राहाणार यास चांगले सांगून सावधता उतम करवणे बहादरखान पिंजारी याजकडी [ल] लोक त्याचा रोजमरा मात्र देवणे दुसरा राहू देणे बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती राजश्री जिवाजीपंत व भास्करपंत व महादेव भटजी स्वामीस नमस्कार विनंती उपरी राजश्री बापू स्वारीस गेले तरी सावधपणे राहणे हे विनंती

१२. बोपदेवाचा दौलताबाद शिलालेख

(शक १५१३)

(डॉ. मधुकर केशव ढवळीकर)

अुपलब्धि :—प्रस्तुत शिलालेख दौलताबाद किल्ल्याच्या ईशान्येस सुमारें पाऊण मैलावर असलेल्या विहिरींत आहे. ही विहीर वर्तुळाकार असून तिचा व्यास सुमारें २० फूट आहे. पश्चिमेकडून विहिरींत उतरण्यास पायऱ्या असून विहिरींत सुमारें १० फूट खालीं पश्चिमेकडे तोंड करून असलेल्या एका २॥ फूट लांब आणि १॥ फूट रुंद शिलेवर हा लेख आहे.

वर्णन : महत्त्वाची गोष्ट अशी कीं प्रस्तूत लेख शिलेवर कोरलेला नाहीं; तर लेख कोरण्यापुरत्या जागेवर चुन्याचा गिलावा करून त्यावर हा लेख कोरलेला आहे. या लेखानें २। फूट लांब १। फूट रुंद जागा व्यापिली असून त्याच्या प्रत्येक ओळींतील शेवटचीं थोडीं अक्षरें गिलावा पाण्यानें धुवून गेल्यामुळें नाहींशीं झालीं आहेत.

लेख ७ ओळींचा असून त्याच्या पहिल्या ५ ओळी गद्यांत तर शेवटच्या २ ओळी पद्यांत आहेत. लेखाचें अक्षर सुवाच्य असून लिहिण्यासाठीं रेघा ओढलेल्या आहेत. अक्षरांचा आकार सुमारें १॥ × १ इंच आहे.

अक्षरवटिका : लेखाची भाषा गद्यपद्यमय संस्कृत असून लिपी नागरी आहे.

काल : लेखाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळींत नमूद केल्याप्रमाणें प्रस्तुत लेख, १५१३ खर संवत्सर, ग्रीष्म ऋतू, आषाढ महिना, शुक्ल पक्ष, या समयीं कोरलेला आहे. परन्तु वार आणि तिथी दिलेली नाहीं. इ. १५९१ च्या जून महिन्यांत शुक्रवार ता. ११ ते शनिवार ता. २६ पर्यंत आषाढाचा शुक्ल पक्ष होता. यामुळें प्रस्तूत लेख या कालांतच कोरला असावा.

सार व चर्चा : लेखांत शांडिल्य गोत्री (अंतो घोपदेवाचा पुत्र) बोपदेव नामक एका गृहस्थानें ही विहीर लोकांच्या उपयोगासाठीं खोदली एवढाच उल्लेख आहे. हा दाता कोणी ऐतिहासिकव्यक्ती नसून एखादा स्थानिक महत्त्वाचा श्रीमंत गृहस्थ असावा. लेखाचा शेवट पांडवगीतेंतील दुर्योधनाच्या तोंडीं असलेल्या एका श्लोकानें केला आहे. यावरून या दात्यानें पूर्व जीवनांत कांहीं धर्मविरोधी कृत्ये केलीं असावीत असें अनुमात करण्यास हरकत नाहीं. कारण दुर्योधनाप्रमाणेंच त्याला धर्म माहीत असून सुद्धा तो करण्याकडे त्याची प्रवृत्ति नाहीं आणि अधर्म जाणून सुद्धा त्यापासून तो परावृत्त होऊं शकत नाहीं. कारण त्याच्या हृदयांत असलेला देव त्याला आज्ञा करील त्याप्रमाणें त्याला करावें लागतें.

पाठ

१. श्री गणेशायनमः श्रीलक्ष्मीनाराय [णायनमः]
२. १५१३ खरसंवत्सरे आषाढ मासे शुक्लपक्षे [ग्री]
३. ष्मतौ शांडिल्यगोत्रोत्पन्नोहं अन्तो धोपदे [वस्य]
४. बोपदेवशर्माणं याज्ञवल्क्यशाखाय्यां (यां)
५. कृष्णार्पणबुद्धया इदं वापीं कृतं तत्स(त्सो)हं
६. जानामि धर्मं न च मे प्रवृत्ति जा [र्जा] नाम्यधर्मं [न च मे निवृत्तिः]
७. केनापि देवेन हृदि स्थितेन य[था नियुक्तो ऽस्मि तथा करोमि]

१३. वासुदेव जोशी

(श्री. य. न. केळकर)

वासुदेव जोशी मुरूडकर ही पहिल्या तीन पेशव्यांच्या राजकारणांत वावरणारी एक महत्त्वाची व्यक्ति होती. पेशवे कुटुंबाशींही त्याचा निकटचा ऋणानुबंध होता. कृष्णराव चासकराकडून कल्याणचा सुभा काढल्यानंतर तो वासुदेव जोशी मुरूडकर याजकडेच पेशव्यांनीं दिला होता. पेशव्यांच्या हर एक राजकारणांत तो मुत्सद्यासारखा

मानला जात असे. साष्टी, वसई व जंजिरा ह्या मोहिमांत त्यानें प्रत्यक्ष भागही घेतला होता. नानासाहेब पेशव्यांच्या कारकिर्दींत २३ सप्टेंबर १७५४ तो रोजीं पुण्यास वारला. तो सावकारीही करीत असे.

तो वारल्यानंतर त्याच्या ' डौला 'बद्दल म्हणजे इस्टेटीबद्दल वाद निर्माण होऊन दत्तकाचीही मोठीच भानगड झाली. तिचा निकाल अखेर सवाई माधवरावाच्या कारकिर्दींत लागला. त्या प्रकरणाची विश्वसनीय हकीगत पुढें देण्यांत येत असलेल्या वाक्यांत आलेली आहे. हा कुलगावकर जोशीदप्तरांत मिळाला.

॥ श्री ॥

असल दादा जोशी यांचे हातची त्याची नकल

यादी मागील जाहाले वर्तमान. वासुदेव जोसी यासी देवआज्ञा जाहलियावर पांडुरंग जोसी येऊन कमळाबाईसी कलह करू लागले तेव्हा कमळाबाईनी सरकारात नानासाहेब व भाऊसाहेब यांचे कानावर घातले त्याजवरून त्याणी पाडुरंग जोसी यास घरातून बाहेर काढून 'थेवरास जाणे'म्हणोन सांगोन वासुदेव जोसी याचे सर्व डऊल कमलाबाईचे स्वाधीन केले. त्याप्रमाणे कमलाबाई दोनतीन वर्षे वहिवाट करीत आली पुढे बाईस फार बरे वाटेनासे जाहले ते काळी गंगाधर जोशी धाकटे दीर साष्टीस होते त्यास बोलाऊन आणऊन त्यास सांगितले की माझी अवस्था कठीण आहे त्यास तुम्ही येथे राहून सूनबाईस मूल देऊन माझे मागे जोसीबाबाचे डऊल चालत आल्याप्रमाणे यथास्थित चालवावे व माझे उत्तरकार्य प्रथम दिवसापासून वर्षश्राद्धपावेतो तुम्ही करणे म्हणोन सांगितले त्याप्रमाणे गंगाधर जोसी याणे मान्य करून कमलाबाईस शपथपूर्वक वचन दिल्हे त्या वेलेस जयराम जोशीहि समीप होते त्याजवर आठ पंधरा दिवसानी कमलाबाईचा काळ जाहल्यावर जयराम जोशी याणी पांडुरंग जोशी यास थेऊरास लेहून पाठविले की कमळाबाईचा काळ जाहला तुम्ही पुणेयास निघून यावे ते काळी सुतकात तिसरे दिवशी पांडुरंग जोशी थेऊराहून अग्निहोत्रसुद्धा पुण्यास आले आणि मागील दारी जामदारखान्याचे दरवाज्यापुढे वेदी घालून राहिले आणि गंगाधर जोशी याचे बोलणे न मानून पांडुरंग जोशी व जयराम जोशी याणी बंदोबस्त वस्तवानीसुद्धा केला व कमलाबाई मरणार तो २–३ दिवस अगोदर मोरोबा आचवल यास सांगितले की पूर्वेकडील सोप्यात उत्तरेकडील खोलीत तांब्या मोहोरांचा पुरलेला आहे तो काढून सूनबाईचे हवाली करणे त्याने बरे म्हणोन एक दिवस तसाच घालवला दुसरे दिवशी फिरोन बाईनी पुसले की काल काय सांगितले होते ते केले की नाही तेव्हा मोरोबा म्हणाला की मला सुतक आले आहे ते वारले म्हणजे करतो म्हणोन बोलिला त्याजवर दोघा दिवसी कमलाबाई वारली व मोरोबाचे सुतकहि निवर्तले त्या दिवसी सायंकाळी मोरोबास पुसिले की मोहोराचा तांब्या माझे हवाली करावयास तुला सासूबाईनी सांगितला तो करणे तो बोलिला की या गोष्टीस साक्ष कोण आहे माझे

घर बुडविता की काय याप्रमाणे बदलोन गोष्ट सांगितली या गोष्टीस साक्षहि नाही याजकरिता तसेच राहिले व किल्ल्या मागितल्या त्याहि जयराम जोशी याणे घेतल्या म्हणोन जयराम जोशी यास मिळोन बदलून गोष्टी बोलू लागला तेव्हा मोरोबा कारभारी व पांडुरंग जोशी व जयराम जोशी कुटुंबसुद्धा राहून मन माने तसी वैवाट करू लागले आमचे काही एक चालले नाही गंगाधर जोशी याचेहि चालेना परंतु वचन गुंतले यास्तव याणी इकडून तिकडून जुलमतीने राहून वर्षश्राद्ध केले नंतर पुढे मजला पुत्र घेऊन देऊन सरकारात कानावर घालोन यथास्थित चालवावे या उद्योगात होते तों पुढे भाऊसाहेब हिंदुस्थानात गेले व पुढे नानासाहेब यांचा काळ जाला कमलाबाईचे सांगितल्याप्रमाणे वासुदेव जोशी याचे डऊल यथास्थित पूर्ववत चालवावे म्हणोन गंगाधर जोशी याणी पांडुरंग जोशी यासी सांगितले तेव्हा पाडुरंग जोशी गंगाधर जोशी यास बोलिले की तुम्हास मौजे डोंगस्ते हा गाव देतो व दातार रहातात तो वाडा देतो व ८० हजार रुपये देतो गोपिकेस मूल द्यावयाची गोष्ट बोलू नको तेव्हा गंगाधर जोशी बोलिले की वासुदेव जोशी याचा निर्वंश करून लोभाविष्ट होऊन दौलतीचा उपभोग करावा हे त्याचे मागे आपणास योग्य नाही मला काहीच नलगे परंतु गोपिकेस पुत्र देऊन चालवावयाचे वचन दिल्हे आहे त्याप्रमाणे चालवीन त्याजवरून उभयतांचा कलह लागला सरकारात कानावर घालून पुत्र घेऊन देऊन बंदोबस्त करावा या अर्थे गंगाधर जोशी याणी भाऊसाहेब यांचे कानावर घातले त्याणी सांगितले की आम्ही स्वारीस जात आहोत तेथून आलियावर कमलाबाईनी सांगितल्याप्रमाणे मूल घेऊन देऊन वासुदेव जोशी याचे डऊल यथास्थित चालवू-पुढे भाऊसाहेब स्वारीहून देशी आले नाहीत तसेच हिंदुस्थानास गेले व नानासाहेबांचाहि काल जाहला. पांडुरंग जोशी याजपुढे गंगाधर जोशी याचे चालेना तेव्हा निघोन साष्टीस गेले तेव्हा त्यानी दोन कडी सोन्याची आपले मुलाकरिता म्हणोन घेतली होती ती गोपिकेस पुत्र घेऊन देऊन वासुदेव जोशी याचे डऊल पूर्ववत चालिल्याशिवाय त्याचे दौलतीचा येक पैसा देखील मला नको म्हणोन मुलापासून कडी माघारी मुलापासून पाठवून दिली आणि ते साष्टीस गेले ते तिकडेच वारले व पांडुरंग जोशी महिना दीड महिन्याने वारले त्याचे मागे महिना दीड महिना मी घरात होते उपरांत मजबरोबर बरकशी फार लावली तेव्हा मी निघोन माहेरास शनवारात वडिलबंधू जवळ राहिले तेथून मातुश्री आनंदीबाई यांचे कानावर घातले तेव्हा त्यांनी रामचद्रपंत तुळपुळे व रामचंद्रपंत कानिटकर यास सांगून आनंदीबाई याकडून श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांचे कानावर घालविले तेव्हा श्रीमंतही बहिरव जोशी यास पुसिले की याचे कसे करावे तेव्हा जोशी बावानी सांगितले की कमलाबाई मेल्यास चिंता काय त्याची सून प्रतक्ष असता हे विभक्त यास संबंध नाही तिलाच पुत्र देवून डऊल चालवावे हे उत्तम तेव्हा जयराम जोशी व हरीराम जोशी बाहेर घालवून तुझे घर तुझे स्वाधीन करितो म्हणोन श्रीमंत बोलिले हे वर्तमान जयराम जोशी व हरीराम जोशी यास समजले तेव्हा त्याणी बाबूजी नाईक बारामतीकर पांडुरंग जोशी याचे साडू याजकडे जाऊन १२ हजार रुपये जामदारखानापैकी देऊन

श्री कै दादासाहेब यासपासी रदबदलीस पाठवले तेव्हा बाबूजी नाईक दादासाहेबाजवळ बोलिले की जयराम जोशी व हरीराम जोशी यास घरातून बाहेर काढल्यास आपण स्वारीस येणार नाही म्हणोन येवढी गोष्ट यावेळेस आम्हास बक्षीस दिल्ही पाहिजे म्हणोन दादासाहेबापुढे शेला पसरला तेव्हा श्रीमंत भिडेस पडून विचार केला की याची गोष्ट न ऐकावी तरी हे सरदार आम्हास तो स्वारीस जावयाचे हे बरोबर येणार नाही ऐसे म्हणोन समयास ऐकणे प्राप्त आहे याजकरिता त्रिंबकरावमामा यास चिठ्ठी पाठवली की तूर्त जयराव जोशी व हरी × × याजकडून गोपिकाबाईस २५ हजार रुपये खर्चास देवावे आम्ही स्वारीहून आल्यावर तिचे घरदार तिचे स्वाधीन करून देऊन यथास्थित चालवू याप्रमाणे मलाहि रामचंद्रपंत तुळपुळे याजबरोबर सांगोन पाठवले की तूर्त २५ हजार रुपये तुला देविले आहेत हे घेऊन आम्ही येऊतोपावेतो × × आम्ही आलियावर यथास्थित करून देऊ नंतर श्रीमंतस्वारीस गेले जयराम जोशी व हरीराम जोशी याणी त्रिंबकरावमामा यास ५ हजार रूपये देऊ करून मला २५ हजार रूपये द्यावयाचे मना केले श्रीमंत येथे नाहीत यास्तव मी निघोन वाईस माहेरी गेले मागे जयराम जोशी व हरीराम जोशी याणी मागील वहिवाट मोडून जयराम जोशी व हरीराम जोशी याप्रमाणे सिलकबंदास लेहून वहिवाट काही दिवस चालविली उपरांत जयराम जोशी याणी उज्जनिची मामलत केली तेव्हा येथून काही पैका व घोडी पालखी व पोरगे वगैरे काही येथून नेले काही राहिली वस्तवानी पैका अडका घरदारसुद्धा ते येथे हरीराम जोशी याने आटोपले नंतर काही दिवसानी मी पुण्यास येऊन कै माधवरावसाहेब यांचे कानावर घातले की हरीराम जोशी यास वासुदेव जोशी याणी पुत्र घेतले नसता पुत्र म्हणोन सारी दौलत आटोपली आहे मजला संबंध नाही म्हणतात याप्रमाणे समजाविले त्याजवरून श्रीमंतानी बाळाजी जनार्दन यास पत्र दिले की गोपिकाबाईचा व हरीराम जोशी याचा वासुदेव जोशी याचे पुत्रपणाविषयी कजिया आहे म्हणोन बाईनी समजाविले त्यास उभयतांचे वाजबी मनास आणोन न्याये करून फडशा करणे म्हणोन पत्र दिल्हे पुढे मनसुबी चालीस लागणार तो जयराम जोशी उज्जनिची मामलत फसली याजमुळे एका घोड्यानिशी व एक माणूस व १ ब्राह्मण याप्रमाणे पळून पायेगडाखालून मारवाडातून पुण्यास आले तो येथील दौलत हरीराम जोशी याणी आटोपिली येथे चालेनासे जाहले तिकडेहि मामलत फसऊन आले याजमुळे लौकिक वाईट जाहला लोक हसू लागले की वासुदेव जोशी याचे मुख्य संस्थान बुडवून लोभाविष्ट जाहला यामुळे अशा गोष्टी प्राप्त जाहल्या त्याजवरून जयराम जोशी यास पश्चात्ताप होऊन मजकडे बोलणे घातले की दौलत तर माझे हाती नाही परंतु पुत्र तुजला देईन मला पुत्र नाही तुझे दैवाने जाहल्यास मी आपलाच देईन म्हणोन मोहनाराणीचे विद्यमाने करार केला त्याप्रमाणे त्यास पुत्र जाहला परंतु एकच पुत्र याजकरता आपला पुत्र न दिला परंतु तुला पुत्र देईन म्हणोन करार केला पुढे माझी व हरीराम जोशी याची मनसुबी होऊन हरीराम जोशी खोटे झाले मी खरी झाले त्याप्रमाणे निर्वाहपत्र सरकारचे करून दिले

आणि घरदार सुद्धा इनाम व सरंजाम गाव देखील मजकडे चालते केले त्याप्रमाणे तुला पुत्र घेऊन देतो म्हणोन जयराम जोशी याणी करार लिहून दिल्हा तो कै नाना फडणीस यास दाखवला त्याजवरून त्याणी बरे म्हणोन वे काशीनाथशास्त्री यास कै. रामशास्त्री बावाचे मत आणोन पुत्र घ्यावयाची आज्ञा दिली त्याजवरून आम्ही नारोराम जोशी व दादंभट काणे यास बापू जोशी याजकडे पाठवून पुत्र मागितला व जयराम जोशी याणीहि बापू जोसी यास पुत्र द्यावयास सांगितला त्याजवरून त्याणी आपला तृतीय पुत्र मजला देऊन श्रीकृष्णेचे उदक माझे हातावर दिल्हे आणि कागद लेहून दिल्हा तो बजिनस आहे त्याजवरून वाईचे मुक्कामी कै. गोपीनाथ दीक्षित यांचे विद्यमाने व्रतबंध केला व पुढे लग्नसमयी वादी याणी द्वारीदुराही करावी म्हणोन उद्योग केला त्या समयी सरकारात समजाविले त्याजवरून नानाकडील कारकून व गाडदी देऊन व्रतबंधाप्रमाणे लग्न करणे म्हणोन साफ सांगितले त्याप्रमाणे लग्नहि जाहाले व्रतबंध जाहल्यावर भाद्रपदमासी पक्षाचे दिवशी जयराम जोशी येऊन पिंडदान-समयी जवळ बसोन त्रय लावून देऊन पिंडदान करविले त्याप्रमाणे आजपर्यंत चालत आहे.

१४. संशोधकाचे मित्र : ग. ह. खरे

(डॉ. अ. रा. कुलकर्णी)

भारत इतिहास संशोधक मंडळाची चार दशकांहून अधिक वर्षे सेवा केल्यावर प्रा. गणेश हरी खरे यांस आतां मंडळाच्या दैनंदिन कार्यांतून सेवानिवृत्त केलें आहे.

गेल्या चव्वेचाळीस वर्षांत मंडळाच्या कार्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. मंडळाच्या या भरभराटीस प्रा. खरे यांचा बराच हातभार लागला आहे हें येथें आवर्जून नमूद करावें लागेल.

१० जानेवारी १९०१ रोजीं श्री. खरे यांचा जन्म पनवेल येथें झाला. वयाच्या आठव्या वर्षी वडील वारल्यामुळें पुढें त्यांचे शिक्षणाची बरीच हेळसांड झाली. वाईच्या द्रविड हायस्कुलांतून मॅट्रिकपर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण करून ते सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजांत १९२० सालीं प्रविष्ट झाले. महात्मा गांधींनीं असहकारितेची चळवळ याच सुमारास पुकारली. इतर तरुणांप्रमाणें श्री. खरे यांनीं कॉलेजचा त्याग केला आणि ते या चळवळींत पडले. कोयनाखोऱ्यांत होणाऱ्या टाटाच्या धरण-योजनेला संघटितपणें त्यांनीं विरोध करण्यास प्रारंभ केला. तेव्हां ऑगष्ट १९२२ सालीं त्यांवर खटला भरून त्यांस एक वर्ष साध्या कैदेची शिक्षा फर्माविण्यांत आली. प्रथम दोन महिने विसापुरास व पुढें १० महिने येरवड्यास असे कदेंत ते राहिले. सेनापति बापट, शंकरराव देव, पां. वा. गाडगीळ इत्यादि मंडळी व मुळशी पेटा चळवळींतील बरेच सत्याग्रही त्यांच्या बरोबर येरवड्यास होते.

कैदेंतून सुटून आल्यानंतर ते परत साताऱ्यास आले व तेथ जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे एक कार्यवाह म्हणून कांहीं दिवस काम पाहिल्यानंतर जून १९२४ मध्यें राष्ट्रीय शाळेंत शिक्षक म्हणून त्यांनीं प्रवेश केला. या संस्थेंत ते ४॥ वर्षें राहिले आणि इतिहासाच्या अध्ययनास पद्धतशीर प्रारंभ त्यांनीं या काळांतच केला. वासुदेवशास्त्री खरे यांचे ऐतिहासिक लेखसंग्रह, भा. इ. सं. मंडळाचीं प्रकाशनें, राजवाड्यांचे खंड इत्यादि ग्रंथांचें सूक्ष्म वाचन त्यांनीं येथेंच केलें. या सुमारास त्यांनीं उर्दू भाषेचाही अभ्यास केला आणि शिलालेखांचा अभ्यास करून ब्राह्मी लिपी आत्मसात केली.

एवढी सिद्धता झाल्यावर जानेवारी १९२९ मध्यें ते पुण्यास आले. जागतिक मंदीचा तो काळ असल्यामुळें पुण्यांत सहजासहजी त्यांना नोकरी मिळणें शक्य नव्हतें. 'इतिहासाचें अध्ययन, संशोधन व लेखन' हें आयुष्याचें ध्येय निश्चित ठरविलें असल्यामुळें साहजिकच ते इतिहासमंडळांत आले. प्रारंभीं त्यांना शिवचरित्रकार्यालयांत कांहीं काम विशेषतः सारसंग्रहाचें देण्यांत आलें. आपणांस या संशोधनमंडळांत स्थान प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर येथें असलेल्या मंडळीहून वेगळें असें कांहीं तरी आपण केलें पाहिजे असें मनाशीं ठरवून त्यांनीं फार्सी भाषेचा अभ्यास गुरुशिवायच केला. पुढें मंडळाच्या सेवेंत आल्यावर मंडळानें सांगितल्यावरून मुन्शीबरोबर फार्सी कागदपत्रें वाचण्यास सुरवात केली. जवळ जवळ वीस वर्षें सातत्यानें फार्सी वाचनाचें काम करून त्या क्षेत्रांत त्यांनीं प्रावीण्य संपादन केलें हें विशेष कौतुकास्पद होय. अशा रीतीनें स्पर्धाविरहित क्षेत्रांत प्रवेश करून घेऊन त्यांनीं आपलें इतिहाससंशोधनाच्या क्षेत्रांतील स्थान पक्कें केलें.

फार्सी भाषेबरोबरच इतिहासास उपयुक्त अशा कानडी, अरबी, प्राकृत, इ भाषांचाही यथाशक्य अभ्यास त्यांनीं केला. इतिहासाचें सर्वांगीण ज्ञान व्हावें या दृष्टीनें या विषयाच्या विविध शाखांचा उण्या-अधिक प्रमाणांत त्यांनीं अभ्यास केला. यांत लेखविद्या, नाणकशास्त्र, मूर्तिविज्ञान, शिल्पशास्त्र, जुनी चित्रकला या ज्ञानशाखांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. इतिहासाच्या विविध शाखांवर मौलिक लेखनही त्यांनीं केलें.

आपल्या या कामगिरीबद्दल अद्याप त्यांना समाधान नाहीं. त्यांच्या 'संशोधकाचा मित्र भाग १' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात, "मात्र याबद्दल समाधान मानावें कीं नाहीं हा प्रश्नच आहे. शिक्षण अर्धवट सोडल्यानें जी कुचंबणा झाली व होत आहे, ती न होती तर गुणानें व मापानें दुप्पट तरी काम झालें असतें व अजूनही होईल असें वाटतें. मी कॉलेज सोडलें तेव्हांच कयास केला होता कीं, आपणांस पुढील सारा जन्म गरीबींत काढावा लागेल; आणि त्याविषयीं माझी तक्रारही नाहीं. श्रीमंत होऊन विलास उपभोगावे असें ध्येय मी मजपुढें कधींच ठेविलें नव्हतें. पण मनापासून इच्छीत व प्रयत्न करीत होतों, आहे व राहीन कीं, माझे जीवनांतील प्रत्येक क्षण सर्वोत्कृष्ट सत्कार्यांत खर्च व्हावा. त्यासाठीं गेलीं बावीस वर्षें अव्याहत व एकनिष्ठेनें प्रयत्नही केला (या विधानालाही आतां बावीस वर्षें होऊन गेलीं).

तरीही अर्धवट शिक्षण व तज्जन्य द्रव्याभाव यामुळें जो कोंडमारा, जो अवमान, जो कालापव्यय, जो शक्तीचा अन्यथा खर्च झाला व होत आहे तो ध्यानांत घेतला म्हणजे हृदय विदीर्ण होतें. पस्तावलों, कावलों, तप्त झालों, तरी मी कोठें आहे व आयुष्याच्या अखेरीपर्यंत तरी कांहीं भरीव सत्कार्य होणार कीं नाहीं याविषयीं संशय उत्पन्न होऊन अस्वस्थ होतों. संशोधक पैशाच्या मागें नसतो हें खरें; पण उत्साहानें काम करूं शकेल इतकें पौष्टिक अन्न, चार विद्वान लोकांत बसण्याचा संकोच वाटणार नाहीं इतपत चांगले कपडे, केवळ बाह्य हवामानाच्या त्रासानेंच काम बंद पडणार नाहीं इतकीच थंड अभ्यासिका, खरीखुरी विश्रांति मिळू शकेल अशी शांत व निवाऱ्याची जागा, आवश्यक ते वैद्यकीय उपचार करून घेण्याचें सामर्थ्य, अव्याहत योगक्षेमाची तरतूद, संशोधनाचेंच काम अडून न पडेल इतक्या सुखानें सहज प्रवास, उत्तम संशोधन होईल इतकी फुरसत व ग्रंथादींची साह्यता येवढ्या गोष्टींचीही त्यानें अपेक्षा करूं नये कां ? " — या आत्मचरित्रपर उद्गारांत श्री. खरे यांनीं आपलें जीवितविषयक तत्त्वज्ञान, त्यांना भोगाव्या लागणाऱ्या यातना आणि प्रतिकूल परिस्थिती यांचें उत्कृष्ट चित्र उभें केलें आहे. संशोधकास ज्या किमान गोष्टी मिळाव्यात असें ते म्हणतात त्या त्यांना नंतरच्या २२ वर्षांतही मिळाल्या नाहींत. पण त्याचा परिणाम त्यांच्या कार्यावर मात्र मुळींच झाला नाहीं. कदाचित् त्यांचें समाधान येवढ्यानें झालें नसेल; पण त्यांना गुरुस्थानीं मानणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांचें मात्र समाधान झालें आहे.

इतिहासाच्या ज्ञानासाठीं त्यांनीं अविश्रांत परिश्रम केले आहेत. जवळ-जवळ सर्व भरतखंड त्यांनीं पाहिला असून, प्रसिद्ध वस्तुसंग्रहालयें, दप्तरखाने, उत्खनन-केंद्रें यांना भेटी देऊन त्यांचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास केला आहे.

प्रा. खरे हे प्रारंभीं फार्सी कागदांचाच अभ्यास करीत होते. पण पुढें त्यांनीं मराठी कागदपत्रेंही अभ्यासण्यास आणि त्यांचें संपादन करण्यास प्रारंभ केला. मंडळाच्या संग्रहीं आज जो विपुल कागदपत्रांचा संग्रह आहे तो जमविण्याच्या कामीं त्यांनीं फार मोलाची कामगिरी केली आहे. तळेंगांव-दाभाडे, चांदोरी-हिंगणे, आटपाडी-चांदवड–देशपांडे; अगडी, आलमेले, एकसंबे, कोप्पळ, गदग, निपाणी, लक्ष्मेश्वर येथील देसाई, नेर्लीचे मुतालिक देसाई, नळदुर्ग व सोलापूरचे देशमुख इत्यादि कित्येक घराण्यांतून फार्सी-मराठी कागदपत्र त्यांनीं मंडळाला मिळवून दिले. या कागदांची संख्या लाखांच्या घरांत जाईल या खेरीज सुमारें २०,००० पोथ्या, ५००० नाणीं, १५० चित्रें, ३० ताम्रशिलाशासनें आणि सुमारें २०० ऐतिहासिक वस्तू त्यांनीं मंडळास मिळवून दिल्या. त्यांनीं मंडळासाठीं चार हजारांवर पृष्ठें लिहिलीं. या त्यांच्या भरीव सेवेबद्दल मंडळ त्यांचें सदैव ऋणी राहील.

संशोधकाचा मित्र भाग १ लिहिण्यासाठीं त्यांना फारच परिश्रम करावे लागले. त्यांचा विशेष गाजलेला ग्रंथ म्हणजे 'मूर्तिविज्ञान' हा होय. हा ग्रंथ आज दुर्मिळ झाला आहे. मराठींत असूनही पाश्चिमात्य संशोधक त्याचा आवर्जून उल्लेख करतात हें विशेष होय. त्यांच्या 'महाराष्ट्राचीं चार दैवतें' या पुस्तकानें देखील

संशोधनक्षेत्रांत चांगलीच भर घातली आहे. कांटेकोर आणि शास्त्रशुद्धपणें इतिहासाचें लेखन करावयाचें आणि तसें करीत असतांना इतर कशाचीही पर्वा करावयाची नाहीं हें त्यांचें ब्रीद असल्यामुळें त्यांचा साधा टिपणवजा लेखही अभ्यासकांना उपयुक्त वाटतो. आपलें ब्रीद म्हणून त्यांचा पुढील श्लोक उद्‌धृत करावासा वाटतो. तो असा–

अनेकसंशयोच्छेदि तत्त्वार्थस्यापि दर्शकम् ।
सद्‌भिश्च सेवितं नित्यं शुद्धं ज्ञानमुपास्महे ॥

त्यांच्या लिहिण्यांत, बोलण्यांत, वागण्यांत या ब्रीदाचा वारंवार प्रत्यय येतो. सतत ज्ञानाची उपासना करणारे श्री. खरे हे ज्ञानयोगी आहेत.

शिक्षणाचें शिक्कामोर्तब नाहीं म्हणून प्रा. खरे यांचा इतिहासाच्या क्षेत्रांत सन्मान व्हावयाचा राहिला नाहीं. १९५१ सालीं जयपूर येथें भरलेल्या अखिल भारतीय इतिहास परिषदेच्या 'मध्ययुग—पहिला भाग (१२०६–१५२६) या शाखेचे ते अध्यक्ष होते. १९६६ सालीं नाशिक येथें भरलेल्या महाराष्ट्रेतिहास परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनाचे ते विभागीय अध्यक्ष होते. कोठलीही पदवी वा उपाधि नसली तरी पुणें विद्यापीठानें मराठ्यांच्या इतिहासाविषयीं प्रबंध लिहूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून त्यांस मान्यता दिली आहे. प्रा. खरे हे गेलीं ३० वर्षें इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनचे मंडळप्रतिनिधि या नात्यानें सभासद आहेत. अखिल भारतीय इतिहास परिषद, अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद, इत्यादींच्या अधिवेशनास जाण्याचे ते कधीं चुकवीत नाहींत. प्रा. खरे यांच्या ज्ञानाचा, अभ्यासाचा, फायदा मिळावा म्हणून त्यांना निरनिराळ्या चर्चासत्रांसाठीं, व्याख्यानांसाठीं विद्यापीठें आणि अन्य संस्था यांकडून बोलावणीं येत असतात. यावरून इतिहास-क्षेत्रांतील लोक त्यांना किती मानतात याची कल्पना यावी.

मंडळाच्या दैनंदिन कामांतून मुक्त झाल्यानंतर आपलीं आवडतीं पण मागें पडलेलीं संशोधनाचीं कामें आपल्याला हातावेगळीं करतां येतील असें त्यांना वाटतें. संशोधकाचा मित्र दुसरा भाग अद्याप पुरा व्हावयाचा आहे. त्यासाठीं त्यांच्या चाहत्यांनीं त्यांना उत्स्फूर्तपणें कांहीं देणग्या दिलेल्या आहेत. 'मातृका,' 'मुसलमान कालीन महाराष्ट्र' 'मराठ्यांच्या इतिहासाची वाटचाल (१७०७–१७६०)' हीं त्यांचीं संकलिपत पुस्तकें आहेत. याखेरीज विद्यापीठ, इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च इत्यादि संस्थांच्या कार्याशीं ते निगडित आहेतच.

प्रा. खरे यांचा लेखनसंभार बराच विपुल आहे. गेल्या चव्वेचाळीस वर्षांच्या काळांत त्यांनीं लहान-मोठी ५३ पुस्तकें इंग्रजी आणि मराठी भाषेंत लिहिलीं-संपादिलीं असून शोधनिबंधांची संख्या ३६० वर गेली आहे. त्यांच्या या लेखांचें वर्गीकरण सामान्यतः पुढीलप्रमाणें करतां येईल: (१) पुरातत्त्व व कला, (२) लेख-विद्या, (३) वाङ्मय व भाषाशास्त्र, (४) अर्वाचीन इतिहास (मराठी काळ),

(५) मुद्राशास्त्र, (६) मध्ययुगीन इतिहास (मुसलमानी काळ), (७) शिल्पशास्त्र, (८) संकीर्ण व (९) अभिप्राय. त्यांनीं वेळोवेळीं लिहिलेले शोधनिबंध शाश्वत स्वरूपाचे आणि अभ्यासकास उपयुक्त असल्यामुळें त्यांतील कांहीं त्यांनीं दोन भागांत 'Select Articles' आणि 'निवडक लेख' या नावांनीं प्रसिद्ध केले आहेत. या लेखाच्या शेवटीं जोडलेल्या सूचीवरून त्यांच्या लेखनकार्याची कल्पना येईल.

मराठ्यांचा संकलनात्मक असा इतिहास सुमारें २५ खंड भरतील इतका विस्तृत तयार झाला पाहिजे असें त्यांना वाटतें. आतांपर्यंत म्हणजे साने, खरेशास्त्री, राजवाडे, पारसनीस, इत्यादींनीं बरेंच ऐतिहासिक साहित्य उपलब्ध करून दिलें आहे. त्याचें शास्त्रशुद्ध संकलन व्हावयास हवें. मराठ्यांच्या इतिहासाची उत्तम शकावली आणि निरनिराळे कोश यांच्या साहाय्यानें हें संकलनाचें काम व्हावें. पुढें संशोधन काय करावयाचें हें जाणून घेण्यास अशा तऱ्हेच्या संकलनाची नितांत गरज आहे. साधनांचें वर्गीकरण, त्यांची कालानुक्रमानें मांडणी करणें आणि त्यांचा अभ्यास करून वस्तुनिष्ठ असा मराठ्यांचा इतिहास तयार करणें अशी त्यांची भव्य कल्पना आहे. महाराष्ट्रांतील विद्यापीठांनीं मराठ्यांच्या इतिहासास उपयुक्त अशी देशी-परदेशी भाषा जाणणारी मंडळी नेमावीत. मराठी भाषा हा मराठ्यांच्या इतिहासाचा आत्मा असल्यामुळें तिचा नीट अभ्यास झाला पाहिजे अशी त्यांची धारणा आहे.

ज्या मंडळाची आपण ४४ वर्षें सेवा केली त्या मंडळाची प्रथम आर्थिक परिस्थिती सुधारली पाहिजे असें त्यांना वाटतें. मंडळांत काम करण्यासाठीं भरपूर माणसें नेमतां आलीं, निरनिराळे शाखाप्रमुख नेमले गेले, संशोधन-संकलनाचें काम मोठ्या प्रमाणावर सुरू झालें म्हणजे मंडळाला एखाद्या विद्यापीठाचा दर्जा प्राप्त होईल व मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाचें तें प्रमुख केंद्र बनेल असें त्यांना वाटतें.

मंडळासंबंधीं सदिच्छा मनाशीं बाळगून ते मंडळाच्या नित्य कामांतून दूर होत असले तरी मंडळाचें प्रमुख कार्य जें संशोधन त्यापासून ते दूर जाऊं शकत नाहींत. त्यांचे उर्वरित आयुष्य अंगीकृत कार्यमग्नतेंत व समाधानांत जावो हीच प्रार्थना.

१५. प्रा. ग. ह. खरे : लेखनसूची

प्रा. ग. ह. खरे यांच्या लेखनाची शक्य तेवढी समग्र सूची येथें दिली आहे. तिचे तीन भाग आहेत. पैकीं पहिल्या भागांत त्यांनीं लिहिलेल्या किंवा संपादित केलेल्या ग्रंथांची व पुस्तिकांची सूची आहे. दुसऱ्या भागांत त्यांच्या इंग्रजी लेखांची सूची आहे आणि तिसऱ्या भागांत त्यांच्या मराठी व हिंदी लेखांची सूची आहे. त्यांचे थोडेसे कानडी लेखही आहेत. ते मात्र कोणत्याच सूचींत आलेले नाहींत. या सूची-विषयीं पुढील मुद्दे अवश्य लक्षांत ठेवावे.

(१) वरींच वर्षे श्री. खरे यांनीं आपल्या लेखांची सूची तयार केली नव्हती; एवढेंच नव्हे तर प्रकाशित लेखांपैकीं आरंभींच्या कांहीं लेखांच्या प्रतीही आतां त्यांजपाशीं नाहींत. उदा. ' मराठी शब्दकोशांत न आढळणारे कांहीं शब्द ' किंवा ' बीभत्स चित्रांची प्राचीनता ' इत्यादी. पण सुदैवानें पुढील बहुतेक लेखांच्या प्रती त्यांनीं जपून ठेवल्या होत्या. तथापि, एक दोन लेख असे आहेत कीं, ते केव्हां व कोठें प्रसिद्ध झाले तें आज सांगतां येत नाहीं. अशा लेखांची सूची त्या त्या भागाच्या सूचीच्या शेवटीं जोडली आहे.

(२) यांतील कांहीं लेख प्रथम निरनिराळ्या वेळीं व स्थळीं लिहिले गेले. नंतर त्यांत आवश्यक त्या व तेथें सुधारणा करून ते ' सिलेक्ट आर्टिकल्स ' व ' निवडक लेख ' या दोन पुस्तकांत एकत्र केले गेले. तरीही त्यांचें मूळ स्थल व काल हे येथें दिले आहेत.

(३) निरनिराळ्या परिषदांचीं इतिवृत्तें ज्या वर्षीं त्या परिषदा झाल्या त्याच वर्षीं प्रकाशित झालीं असें नाहीं. तथापि लेख ज्या वर्षीं वाचला गेला अर्थात् परिषद ज्या वर्षीं झाली तें वर्ष लेखापुढें दिलें आहे. अनेक वेळा इतिवृत्ताचें प्रकाशनवर्ष परिषदेच्या वर्षानंतर एक–दोन वर्षांनींही आलेलें आहे.

(४) कांहीं छोटया पुस्तकांच्या दोन–दोन, तीन–तीन आवृत्तीही निघाल्या आहेत. पण सूचीमध्यें केवळ पहिल्या आवृत्तीचा काळ दर्शित केला आहे. कांहीं लेख दोन–दोन, तीन–तीन ठिकाणीं प्रकाशित झाले आहेत. उदा० ' पुणें व सातारा गॅझिटियरें ' हें परीक्षण प्रथम सकाळ व नंतर मराठा यांमध्यें प्रसिद्ध झालें. सूचीमध्यें जेथें प्रथम प्रसिद्ध झालें तेवढें स्थल पूर्णपणें दाखवून नंतरच्या स्थलाचा फक्त निर्देश केला आहे.

(५) या सूचींतील इंग्रजी भागांत कांहीं लेखांना Select Articles II असा संदर्भ दिला आहे. हे सर्व लेख प्राय : अप्रकाशित पण लवकरच वरील पुस्तकांत प्रकाशित होतील. ते विविध प्रसंगीं वाचलेले आहेत.

(६) एवढें करूनही या सूचीमध्यें चुका, गलंत किंवा द्विरुक्ती झाली असण्याचा अथवा लेखांचे मथळे बदलले असण्याचा संभव आहे. अभ्यासक त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे. हीमधील चुका अभ्यासकानें अवश्य कळवाव्या. या सूचीची पुनरावृत्ती काढण्याचा प्रसंग अल्यास त्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करतां येईल.

---

१. पुस्तक-पुस्तिका

१ लाठी शिक्षक भाग १ (१९२८)

२,३ शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ (१९३०) (अंशत:)

४ शिवचरित्रसाहित्य खंड ३ (अंशत:) (१९३०)

५ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ (१९३०)
६ श्रीक्षेत्र आळंदी (१९३१)
७ मंडळांतील नाणीं (१९३३)
८ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड २ (१९३४)
९ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ (१९३४)
१० भोर संस्थान, ऐतिहासिक वस्तु-संग्रहालय प्रदर्शिका (१९३५)
११ शिवचरित्रसाहित्य खंड ६ (१९३७)
१२ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड २ (१९३७)
१३ श्रीविठ्ठल आणि पंढरपूर (१९३८)
१४ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३ (१९३९)
१५ मूर्तिविज्ञान (१९३९)
१६ शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड २ (१९३९)
१७ शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड ३ (१९४१)
१८ ऐतिहासिक आख्यायिका (१९४४)
१९ हिंगणे दप्तर खंड १ (१९४५)
२० भोर संस्थान ऐतिहासिक स्थलदर्शन (१९४५)
२१ पंढरपूरचा विठोबा (१९४७)
२२ हिंगणे दप्तर खंड २ (१९४७)
२३ तुलादानविधि (१९४८)
२४ सिंहगड मराठी (१९४८)
२५ Simhagadh (1948)
२६ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड ३ (१९४९)
२७ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ४ (१९४९)
२८ शनिवारवाडा (मराठी १९४९)
Exploration at Karad (अंशत:) (१९४९)
३० पेशवे दप्तर–पत्रें : कालनिर्णय-सुधारणा (१९५०)
३१ Shanivara Palace (1950)
३२ इतिहासकर्ते मराठे (१९५१)
३३ विजयनगरसम्राट् कृष्णदेवराय (१९५१)
३४ संशोधकाचा मित्र, १ ला भाग (१९५१)
३५ इतिहासाभ्यासवर्ग–व्याख्यानें (१९५२)
३६ सिंहगड हिंदी (१९५३)
३७ सर ऑरेल स्टीन (१९५३)
३८ शिवचरित्रसंशोधनवृत्त रा. श. २७९ (१९५३)
३९ शिवचरित्रसंशोधनवृत्त रा. श. २८२ (१९५६)
४० शनिवारवाडा (हिंदी १९५७)
४१ शिवचरित्रसाहित्य खंड ११ (१९५८)
४२ महाराष्ट्राचीं चार दैवतें (१९५८)
४३ आज्ञापत्र अंशतः (१९६०)
४४ भा. इ. सं. मंडलस्थहस्तलिखित-ग्रंथानुक्रमणिका (१९६०)
४५ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ५ भाग १ ला (१९६१)
४६ शिवचरित्रसाहित्य खंड १२ (१९६४)
४७ शिवचरित्रसाहित्य खंड १३ (१९६५)
४८ Selcct Articles (1966)
४९ स्वराज्यातील तीन दुर्ग (१९६७)

५० ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ५ भाग २ रा (१९६९)
५१ महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग (संपादन) (१९७१)
५२ शिवचरित्रसंशोधनवृत्त रा. श. ३०० (१९७३)
५३ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ६ (अंशत:) (१९७३)

2. ARTICLES IN ENGLISH

संक्षेप

1. ABORI—Annals of the Bhandarkar Oriental Research Institute, Poona.
2. BISMQ—Bharata Itihasa Samshodhaka Mandala Quarterly, Poona.
3. CMV—Commemoration Volume.
4. Epi. Ind.—Epigraphia Indica : A quarterly of the Goverment of India.
5. JNSI—Journal of the Numismatic Society of India.
6. NIA—New Indian Antiquary : a now defunct monthly of Poona.
7. PAIOC—Proceedings of the All India Oriental Conference.
8. PIHC—Proceedings of the Indian History Congress.
9. PIHRC—Proceedings of the Indian Historical Records Commission, New Delhi.
10. PO—Poona Orientalist : a now defunct quarterly.
11. SA—Select Articles.

1. The Ancient Lattalura and the Modern Latur (PAIOC 1933); SA.
2. Archaeological Remains of Mangalavedhe (Sholapur) (Mahratta 8-3-1936); SA
3. Two Newly Discovered Copper-Plates (Mahratta 5--7--1936).

4. Archaeolological Remains of Kundagol (Dharwar) (Mahratta 10–7–1936); SA.
5. Krsnadevaraya and the Vitthala Image of Pandharpur (Vijayanagar CMV 12–1936); SA.
6. Find of a New Copper–Plate Grant (Mahratta 25-2-1938).
7. Find of a New Copper–Plate Grant (Mahratta 2-12-1938).
8. Shivaji's Earliest Raid into the Karnataka (Karnataka Historical Review 7–1938); SA.
9. The Myth of Gangu Bahmani etc. (in collaboration) (PIHC–1938).
10. Abhilasitarthacintamani and Silparatna (NIA–11, 1938); SA.
11. An Addendum to the above Article (NIA3–1939).
12. A New Sendraka Grant of Saka 577 (NIA3–1939).
13. Abhilasitarthacintamani and Matsya Purana (NIA 12–1939); SA.
14. The Duodenary Cycle and Mughal Documents (PIHC–1939); SA.
15. Dr. Saletore and the Authenticity of the Mudhol Farmans (NIA, Vol. III, 8–1940); SA.
16. A New Type of Padmatankas, (JNSI Vol. III, 1941).
17. The Twenty-four Varieties of Visnu image and the probable date of their innovation (P. V. Kane CMV 7-5-1941); SA.
18. A Note on the Daulatabad Plates of Calukya Jayasimha II, Saka 939. (Indian Culture 7–1941); SA.
19. Some Coins of the Peshwas (JNSI Vol. IV–1942)
20. A Note on the Family Records of the Peshwas' Agents at Delhi (BORI Silver Jubilee Volume 1942); SA.
21. Mir Khusraw or Farrukhfal (ABORI Vol. XXIV–1943); SA.

22. Dr. Chaghatai and Poona in the Muslim Period (NIA 3—1943); SA.
23. Marathas Beyond Attock (BISMQ Vol. XXIV—1943); SA.
24. A Note on the Change of P to H in Kannada (PO Vol. VIII, Nos. 3, 4—1943); SA.
25. Bahmani Dynasty : An Objective Study (ABORI Vol. XXXV—1944). SA.
26. An Adilshahi Farman against Shivaji, the Great (ABORI Vol. XXV—1944); SA.
27. An Adilshahi Farman : Correction (ABORI Vol. XXV—1944); SA.
28. Mir Khusraw : Addendum (ABORI Vol. XXV—1944); SA.
29. A Letter from the Maharatta Agent at Jaipur (PIHRC Vol. XXI—1944).
30. Hari Diksita and his Works. (PO Vol. IX—1944); SA.
31. A Note on A—Chester Beatty Collection (ABORI Vol. XXVI—1945); SA.
32. A Letter of Assuarance of Ali Adilshah I (PIHRC —1945).
33. A Phase of the North Indian Policy of the Marathas (PO Vol. X—1945); SA.
34. Some New Records of the Peshwa Period (PIHRC Vol. XXIII—1946); SA.
35. A Unique Silver Coin of Akbar (JNSI Vol. VIII—1946).
36. A Medieval Gold Coin (JNSI Vol. VIII—1946).
37. The Late Mr. T. A. Gopinathrao and the Sources of Elements of Hindu Iconography (B. C. Law CMV—1946); SA.
38. An Interesting Adilshahi Farman (Islamic Calture Vol. XXI—1947); SA.
39. Some New Records on the Mahratta-Jaipur Relations (PIHRC Vol. XIV—1948).

40. Two New Documents on the Battle of Sakharkhedle (PIHRC Vol. XXV–1948).
41. Signed Paintings in the B.I.S. Mandala (BISMQ Vol XXIX–1948); SA.
42. Some Mughal-Maratha Pacts between 1707–1759 (PAIOC–1949): SA.
43. Some Persian Records from A Sardar Natu Family of Poona (PIHRC–Vol XXVI–1949).
44. The Lohaner Plates of Calukya Pulakesin II, Saka 552 (Epi. Ind. Vol. XXVII–1949).
